## महादेव मुंडेंना न्याय मिळवून देणारच




**बीड :** मयत महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांच्या हाकेला प्रतिसाद देत आज मनोज जरांगे हे त्यांच्या परळी येथील निवासस्थानी दाखल झाले आणि मुंडेंच्या कुटुंबाची भेट घेत त्यांच्याशी संवाद साधला. मयत महादेव मुंडे यांना न्याय मिळेपर्यंत सोबत असल्याचे आश्वासनही जरांगेंनी दिले आहे. यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. जरांगे म्हणाले की, मी आता प्रशासन काय करणार हे पाहणार आहे. मला वाटले तर जिल्हा बंद करेन. काही झाले तरी महादेव मुंडेंना न्याय मिळवून देणारच, असा शब्द यावेळी जरांगे यांनी ज्ञानेश्वरी मुंडे यांना दिला.


मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

# वृत्तमानस

https://epapervrittamanas. in/

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई/ पालघर | मंगळवार, २२ जुलै २०२५ | वर्ष- ३० | अंक-३२ | पाने - ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये





राजकीय लढाई निवडणुकीत व्हावी... पण एजन्सीचा वापर का? पान ४


## म ह त्त्वा चे

### तमिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन यांची प्रकृती बिघडली



**चेन्नई :** तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांना सोमवार सकाळी मॉर्निंग वॉक दरम्यान भोवळ आल्याने तातडीने चेन्नईतील अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. रुग्णालयाने दिलेल्या माहितीनुसार, स्टॅलिन यांना भोवळ आल्याने त्यांची आरोग्य तपासणी केली जात आहे. अपोलो रुग्णालयाच्या वैद्यकीय सेवा संचालक डॉ. अनिल बी.जी. यांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे, तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांना मॉर्निंग वॉक दरम्यान भोवळ आली. त्यांच्या आवश्यक चाचण्या करण्यासाठी त्यांना चेन्नईतील ग्रीम्स रोड येथील अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. रुग्णालयात दाखल झाल्यानंतर स्टॅलिन यांच्यावर वैद्यकीय देखरेखीखाली तपासण्या सुरू आहेत आणि त्यांच्या प्रकृतीची पुढील माहिती चाचण्यांच्या अहवालानंतर मिळण्याची अपेक्षा आहे.

### डोंबिवलीत उघड्या चेंबरमध्ये पडून नागरिकाचा मृत्यू

**डोंबिवली :** रस्त्याने चालताना पाय घसरून पडल्याने उघड्या चेंबरमध्ये पडून एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना कल्याण शीळ रोडवर घडली. या घटनेमुळे डोंबिवली एमआयडीसीचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे. बाबू धर्मा चव्हाण असे मयत व्यक्तीचे नाव आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. उघड्या चेंबर्सबाबत नागरिकांनी वारंवार तक्रार करूनही एमआयडीसी त्याकडे डोळेझाक करत आहे. कल्याण पूर्वेकडील शीळ रोडवर टाटा नाका गांधीनगर परिसरातून रविवारी चालत असताना बाबू चव्हाण यांचा पाय घसरला.


सविस्तर वृत्त पान 5 वर


### नालासोपाऱ्यात प्रेमसंबंधातून पतीची हत्या

**नालासोपारा :** नालासोपाऱ्यामध्ये एका महिलेने प्रियकराच्या मदतीने पतीची हत्या केली आहे. नालासोपारा पूर्वेच्या गडगापाडा येथे विजय चौहान (३५) पत्नी कोमल(२८) सोबत रहात होते. मागील १० ते १५ दिवसांपासून विजय बेपत्ता होता. बिलालपाडा येथे राहणारे चव्हाण यांचे दोन भाऊ त्यांचा शोध घेत होते. मात्र, त्यांच्या भावाचा शोध लागत नव्हता. त्यांनी त्यांच्या मोबाईल फोनवर वारंवार संपर्क केला होता. मात्र कोणतेही उत्तर मिळत नसल्यामुळे त्यांनी घराची पाहणी केली. घरातील मुख्य हॉलमध्ये टाईल्स वेगळ्या रंगाच्या लावल्याचे निदर्शनास आले होते. त्यांनी घरातील टाईल्स काढण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी दुर्गंधी येऊ लागली. त्यांनी तत्काळ पेल्हार पोलिसांना याची माहिती दिली.मृतदेह पुरल्याची जागा पाहून सर्वजण चकित झाले. विजय यांचा मृतदेह घरातील जमिनीत गाडल्याचे सोमवारी सकाळी उघडकीस आले आहे. पेल्हार पोलिसांनी घटनास्थळावरून मृतदेह काढून मुंबईच्या जेजे रुग्णालयात तपासणीसाठी पाठवला आहे.


सविस्तर वृत्त पान 2 वर


# 2006च्या मुंबई बॉम्बस्फोटातील सर्व 12 आरोपींची निर्दोष सुटका

## फिर्यादी पक्षाला आरोप सिद्ध करण्यात अपयश - हायकोर्ट



प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई उच्च न्यायालयाने 2006 च्या मुंबई लोकल ट्रेन बॉम्बस्फोट प्रकरणात एक मोठा निकाल दिला आणि सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती एस.जी. चांडक यांच्या न्यायपीठाने हा निर्णय दिला आहे. या प्रकरणातील एकूण 12 आरोपींना यापूर्वी कनिष्ठ न्यायालयाने दोषी ठरवले होते, त्यापैकी 5 जणांना मृत्युदंड आणि 7 जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. मात्र, उच्च न्यायालयात सुनावणीदरम्यान, 11 आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले आहे. तर यातील एका आरोपीचा आधीच मृत्यू झाला आहे.

मुंबई रेल्वे बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व 12 आरोपींना उच्च न्यायालयाने निर्दोष मुक्त केले. उच्च न्यायालयाने म्हटले की, आरोपींविरुद्धचा खटला सिद्ध करण्यात सरकारी पक्ष अपयशी ठरला. घटनेला 19 वर्षे झाल्यानंतर हा निर्णय देण्यात आला आहे. न्यायाधीश अनिल किलोर आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या विशेष न्यायपीठाने म्हटले की, सरकारी पक्षाने सादर केलेले पुरावे आरोपींना दोषी ठरवण्यासाठी निर्णायक नाहीत. 11 जुलै 2006 रोजी मुंबईच्या पश्चिम उपनगरीय भागात सात गाड्यांमध्ये साखळी स्फोट झाले होते. त्यात 189 प्रवासी मृत्युमुखी पडले आणि 824 लोक जखमी झाले होते. हे स्फोट संध्याकाळी 6:24 ते 6:35 दरम्यान झाले. हा तो वेळ होता जेव्हा लाखो प्रवासी काम केल्यानंतर मुंबईच्या लोकल ट्रेनमधून घरी परतत होते.

## खडसेंची एसआयटी चौकशीची मागणी



# लोढाला हनीट्रॅपची सगळी माहिती!

## मला फक्त एक बटन दाबण्याचे काम - लोढा

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्रात सध्या हनीट्रॅपचे प्रकरणामुळे धाबे दणाणले आहे. या हनी ट्रॅपमध्ये आजी-माजी मंत्री यांसह 72 हून वरिष्ठ अधिकारी अडकल्याची खळबळ उडवून देणारी माहिती समोर येत आहे. या प्रकरणात पोलिसांनी भाजपचे नेते गिरीश महाजन यांचे निकटवर्तीय म्हणून आरोप होत असलेल्या प्रफुल्ल लोढा यांना अटक केली आहे. याचदरम्यान, माजी मंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते एकनाथ खडसे यांनी खळबळजनक दावा केला आहे. प्रफुल्ल लोढा नावाच्या व्यक्तीला हनी ट्रॅपबद्दल सगळे माहिती आहे, असं त्यांनी म्हटलं. तसेच या प्रकरणीच एसआयटीमार्फत चौकशी करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.



माजी मंत्री एकनाथ खडसे यांनी सोमवारी खळबळजनक दावा करतानाच एक जुना व्हिडिओही समोर आणला आहे. हा व्हिडिओ पोलिसांनी हनी ट्रॅप प्रकरणी अटक करण्यात आलेल्या प्रफुल्ल लोढाचा आहे. या व्हिडिओत लोढानं गिरीश महाजन यांनी आज वृत्तपत्रात पुरावे असतील तर पोलिसांना द्यावे, अशी प्रतिक्रिया दिली आहे. तसेच पण मला पुरावे पोलिसांना देण्याची आवश्यकता नाही. कारण मला फक्त बटण दाबायचं काम असल्याचं खळबळजनक विधान करताना दिसून येत आहे. तसेच व्हिडिओत लोढा म्हणाला, पण मी एक मनुष्य आहे. मी कुणाला वहिनी म्हटलं आहे, कुणाला आई म्हटलं आहे, कुणाला मुलगी म्हटलं आहे, मर्यादा पाळून मी अजून चूप आहे. पण ज्यादिवशी आपले 100 पाप पूर्ण होतील, त्या दिवशी मला आपल्या सल्ल्याची गरज लागणार नसल्याचा दावाही त्यानं खडसेंनी बाहेर काढलेल्या व्हिडिओत म्हटलं आहे.

प्रफुल्ल लोढा यानं जिवाला धोका असल्याचंही व्हिडिओत नमूद केलं आहे. तो म्हणाला, माझ्या स्वत:च्या संरक्षणासाठी 2 तारखेला जामनेर पोलीस स्टेशन आणि एसपी ऑफिस, मुख्यमंत्री यांना निवेदन दिलेलं आहे. कारण जामनेर तालुक्यातील ही जी विकृती आहे, त्यांचे बरेच पुरावे माझ्याकडे आहेत.


पान 8 वर


### लोढा सर्वपक्षीय कार्यकर्ता, महाजनांची स्पष्टोक्ती



आज सादर झालेल्या वादग्रस्त व्हिडिओवर मंत्री गिरीश महाजन यांनी पत्रकार परिषद घेत पलटवार केला आहे. पत्रकार परिषद घेत गिरीश महाजन म्हणाले, प्रफुल्ल लोढा हा सर्वपक्षीय कार्यकर्ता आहे. तो अनेक पक्षात होता. शरद पवार, जयंत पाटील, अजित दादा पवार, उद्धव ठाकरे आणि सुप्रिया सुळे यांच्या सोबत प्रफुल्ल लोढा यांचे फोटो आहेत, असे म्हणत त्यांनी मोबाईलमध्ये प्रफुल्ल लोढा याच्यासोबत नेत्यांचे असलेले फोटो दाखवले. मग उद्धव ठाकरे, शरद पवार, अजित पवार, जयंत पाटील, सुप्रिया सुळे यांचा पण हनीट्रॅपशी संबंध आहे का? या सर्वांची पण सीबीआय आणि एसआयटी चौकशी करायची का? असा सवाल गिरीश महाजन यांनी उपस्थित केला आहे. एकनाथ खडसे यांच्या मुलाचा मृत्यू कसा झाला, त्यावेळी मी खडसे यांच्या सोबत होतो, मग त्या प्रकरणाची आता चौकशी करायची का? असा पलटवार महाजन यांनी केला. मी एवढ्या खालच्या पातळीवर जाणार नाही, पण खडसे यांच्या डोक्यावर परिणाम झाला आहे. कोणत्याही प्रकरणात मीच त्यांना दिसतो. काही वर्षापूर्वी व्हिडिओ बघितले होते प्रफुल्ल लोढा अत्यंत खालच्या भाषेत एकनाथ खडसे यांना बोलताना दिसत आहे. त्याला काय म्हणावे? कोणत्याही प्रकरणात खडसे माझा संबंध जोडून माझी बदनामी करतात. त्यांच्या डोक्यावर परिणाम झाला आहे, असे महाजन म्हणाले.

## बांगलादेशात विमान शाळेवर कोसळलं, पायलटसह 19 ठार



**ढाका :** सोमवारी ढाका येथील एका शाळेवर बांगलादेश हवाई दलाचे एक प्रशिक्षण विमान कोसळले. या अपघातात पायलटसह १९ जणांचा मृत्यू झाला आहे. या अपघातात १६४ हून अधिक लोक जखमी झाले आहेत. ६० हून अधिक जखमींना बर्न इन्स्टिट्यूटमध्ये रेफर करण्यात आले आहे. किरकोळ जखमी झालेल्या अनेकांवर उत्तरा मेडिकल कॉलेजमध्ये उपचार सुरू आहेत.

जखमींना हातगाडीतून रुग्णालयात नेण्यात येत असल्याचा व्हिडिओही समोर आला आहे. अनेक जखमी मुलांना हेलिकॉप्टरने रुग्णालयात नेण्यात आले. सरकारने एक दिवसाचा राज्य शोक जाहीर केला आहे. अपघाताच्या वेळी शाळेत वर्ग सुरू होते आणि शेकडो विद्यार्थी तेथे उपस्थित होते. बांगलादेश लष्कराने हवाई दलाच्या एफ-७ बीजीआय विमानाच्या अपघाताची पुष्टी केली आहे. हे विमान चीनमध्ये बनवण्यात आले होते. नूस यांनी रुग्णालये आणि अधिकाऱ्यांना परिस्थिती हाताळण्याचे निर्देश दिले आहेत.


सविस्तर वृत्त पान 8 वर


# उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचा राजीनामा



प्रतिनिधी
■ नवी दिल्ली

जगदीप धनखड यांनी उपराष्ट्रपती पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी आपल्या राजीनाम्यामागे आरोग्याचे कारण दिले आहे.

राष्ट्रपतींना पत्रात लिहिले, आरोग्याला प्राधान्य देऊन आणि वैद्यकीय सल्ल्याचे पालन करून, मी भारताच्या उपराष्ट्रपतीपदाचा तात्काळ राजीनामा देत आहे. पत्रात त्यांनी राष्ट्रपतींचे सहकार्य आणि सौहार्दपूर्ण संबंधांबद्दल आभार मानले. त्यांनी पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाचे सहकार्याबद्दल आभार मानले. २०२२ मध्ये, जगदीप धनखड यांनी १४ वे उपराष्ट्रपती म्हणून शपथ घेतली. ६ ऑगस्ट २०२२ रोजी झालेल्या उपराष्ट्रपती निवडणुकीत धनखड यांनी विरोधी उमेदवार मार्गारेट अल्वा यांचा पराभव केला. एकूण ७२५ पैकी ५२८ मते धनखड यांना मिळाली होती, तर अल्वा यांना १८२ मते मिळाली होती. २५ जून रोजी उत्तराखंडमधील एका कार्यक्रमानंतर जगदीप धनखड यांची प्रकृती अचानक बिघडली. त्यांना ताबडतोब नैनिताल राजभवनात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी त्यांची तपासणी केली.

कुमाऊं विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून धनखड नैनितालमध्ये आले होते. कार्यक्रम संपल्यानंतर, धनखड माजी खासदार महेंद्र सिंह पाल यांच्या खांद्यावर हात ठेवून बाहेर आले. मग त्यांनी महेंद्र पालला मिठी मारली आणि रडू लागले. सुमारे १० पावले चालल्यानंतर, धनखड यांच्या छातीत अचानक दुखू लागले. माजी खासदार महेंद्र पाल आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्यांची काळजी घेतली होती.

### अजित पवारांसह मुख्यमंत्री फडणवीसही कोकाटेंवर नाराज

# माणिकराव कोकाटे राजीनामा देणार ?

प्रतिनिधी
■ सिन्नर

*आज पत्रकार परिषद*



विधानसभेत रमी खेळताना व्हिडीओ व्हायरल झालेल्या प्रकरणी राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे मंगळवारी त्यांची भूमिका स्पष्ट करणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाराजी व्यक्त केल्यानंतर कोकाटे आणि अजित पवार यांचे फोनवरुन संभाषण झाल्याचे समजते. त्यावर माणिकराव कोकाटे मंगळवारी सकाळी 9 वाजता पत्रकार परिषद घेणार आहेत.

विधानसभेत कामकाज सुरू असताना माणिकराव कोकाटे हे मोबाईलवर रमी खेळतानाचा व्हिडीओ आमदार रोहित पवार यांनी शेअर केला होता. त्यानंतर विरोधकांनी कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली. या प्रकरणावरुन राज्य सरकार बॅकफूटवर गेल्याचं दिसून आलं. या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनीही जाहीर नाराजी व्यक्त केली. सभागृहात असताना गांभीर्य असणं गरजेचं आहे. माणिकराव कोकाटे यांनी काहीही स्पष्टीकरण दिलं असलं तरी ते आमच्यासाठी भूषणावह नसल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

राष्ट्रवादीचे प्रमुख अजित पवार यांनी माणिकराव कोकाटे यांच्याशी फोनवरुन संवाद साधला. अजित पवार यांच्या फोननंतर माणिकराव कोकाटे यांनी महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांची सिन्नर येथील दूध संघाच्या कार्यालयात बैठक घेतली. अजित पवार आणि कोकाटे यांच्यात नेमकी काय चर्चा झाली, तसेच माणिकराव कोकाटेंनी बोलावलेल्या बैठकीत काय चर्चा झाली हे अद्याप गुलदस्त्यात आहे. मंगळवारी सकाळी 9 वाजता माणिकराव कोकाटे सिन्नरला पत्रकार परिषद घेणार आहेत. पत्रकार परिषदेत काही निर्णय जाहीर करतात का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागलं आहे.

## आरबीआयकडून देशातील चार सहकारी बँकांना आर्थिक दंड

### महाराष्ट्रातील तीन बँकांचा समावेश

प्रतिनिधी
■ मुंबई



बँकिंग संदर्भातील कायद्यांचं आणि नियमांचं पालन न करणाऱ्या बँकांवर रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कडून विविध प्रकारची कारवाई केली जाते. काही बँकांना आर्थिक दंड केला जातो. आरबीआयनं जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार द शहादा पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, शहादा, मोतिराम अग्रवाल जालना मर्चंटस को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, जालना आणि सह्याद्री सहकारी बँक लिमिटेड, मुंबई आणि द गव्हर्मेंट एम्प्लॉइज को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, धारवाड या चार बँकांना आर्थिक दंड आरबीआयकडून करण्यात आला आहे. द शहादा पीपल्स को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, शहादा या बँकेवर आरबीआयनं 16 जुलैच्या आदेशानं 2 लाख रुपयांच्या दंडाची कारवाई केली आहे. बँकेने आरबीआयच्या इनकम रिकनिशन, असेट क्लासिफिकेशन, प्रोव्हिजनिंग अँड अदर रिलेटेड मॅटर्स यूसीबीएसच बाबतची पूर्तता केली नव्हती.

# शक्तिपीठ महामार्ग साकारण्यासाठी आमदारांच्या डोक्यावर बंदूक !

### आमदार सतेज पाटलांचा हल्लाबोल

प्रतिनिधी
■ कोल्हापूर



"नागपूर ते गोवा 800 किलोमीटर लांबीच्या शक्तिपीठ महामार्ग समर्थनार्थ शनिवारी कोल्हापुरात मोर्चा निघाला होता. मात्र महायुतीचे जिल्ह्यातील आमदार राजेश क्षीरसागर आणि शिवाजी पाटलांच्या डोक्यावर बंदूक आहे. आंदोलन करा, पाठिंबा द्या... आमदार क्षीरसागर यांना खासगीत विचारा ते सांगतील. शक्तिपीठाची गरज आहे का नाही? परंतु वरुन आदेश आल्यानं त्या बिचाऱ्याला दुसरा पर्याय नाही. शक्तिपीठ महामार्गाला शेतकऱ्यांचा पाठिंबा आहे. तर मग एवढ्या हरकती आल्या, त्यांनी नीट माहिती घ्यावी. त्यामध्ये शेतकरी किती आहेत? मोबदला विषय वेगळा त्याची आमच्यापुढं चर्चाच नाही. सहापट रक्कम मागण्यामागचं कारण म्हणजे त्यांच्या डोक्यावरही बंदूक असणार आहे, " असा हल्लाबोल आमदार सतेज पाटील यांनी केला. तसेच, "यापुढंही शक्तिपीठ विरोधात संघर्ष सुरूच राहणार आहे", असंही आमदार सतेज पाटील यांनी म्हटलं आहे.

"नुकत्याच झालेल्या विधिमंडळाच्या अधिवेशनात मंजूर झालेल्या जनसुरक्षा विधेयकामध्ये आम्ही काही सूचना सांगितल्या होत्या. त्याची अंमलबजावणी झालेली नाही. विधानपरिषदेत जेव्हा हे विधयक आलं तेव्हा डिसेन्ट नोट देऊन जनसुरक्षा विधयक रद्द करण्याची भूमिका आम्ही मांडली.


पान 8 वर


# 'डिजिटल गव्हर्नन्स' ही गरज नाही तर आवश्यकता – मुख्यमंत्री

### माहिती तंत्रज्ञान संचालनालय आणि 'समग्र' संस्थेदरम्यान सामंजस्य करार



प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्राने डिजिटल रेग्युलेशन आणि प्रणालीमध्ये आघाडी घेतली आहे. त्यामुळे डिजिटल गव्हर्नन्स ही गरज नाही तर आवश्यकता आहे. त्यामुळे सर्व शासकीय सेवा, शासकीय योजना ह्या ऑनलाईन प्रणाली माध्यमातून लोकांपर्यत सहज पोहोचतील. सामान्य लोकांना एकाच ठिकाणी सर्व शासकीय सेवा मिळतील. 'नो ऑफीस डे' म्हणजे कोणत्याही व्यक्तींला कार्यालयात यावे लागणार नसल्याने ऑफलाईन प्रक्रिया संपेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.


मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत 'समग्र' या संस्थेसोबत यासंदर्भात सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी सांस्कृतिक कार्य, माहिती व तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इकबालसिंग चहल, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, माहिती तंत्रज्ञान संचालनालयाचे व्यवस्थापकीय संचालक कान्हुराज बगाटे, विकास आयुक्त दिपेंद्रसिंग कुशवाह, 'समग्र'चे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव गोयल, मुख्य तंत्रज्ञ राहुल कुलकर्णी, व्यवस्थापक अनय गोगटे, संचालक अल्केश वाढवाणी आदी उपस्थित होते.

या ऑनलाईन प्रक्रियेत सर्व व्यक्तींनी सहभागी होणे आवश्यक असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, व्हॉट्सॲपसारख्या प्लॅटफॉर्मवर सर्व शासकीय सेवा आणल्या जात आहेत. कारण सर्वसामान्य व्यक्तींना व्हॉट्सॲपचा वापर करणे सोपे ठरते आहे. या प्रक्रियेसाठी वेळापत्रक ठरवून काम करण्यात येईल तसेच


पान 8 वर


# आम्ही तुम्हाला उद्ध्वस्त करु अमेरिकेची हिंदुस्थान, चीन आणि ब्राझीलला धमकी

वृत्तसंस्था
■ वॉशिंग्टन



अमेरिकन रिपब्लिकन सिनेटर लिंडसे ग्राहम यांनी रशियन तेल आयात करणाऱ्या देशांना कडक इशारा दिला आहे. हिंदुस्थान, चीन आणि ब्राझील या देशांनी त्यांनी ट्रम्पच्या व्यापार कारवाईला सामोरे जावे लागू शकते, असा इशारा दिला आहे. ट्रम्प हिंदुस्थान, चीन आणि ब्राझीलसारख्या रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवर शुल्क लादणार आहेत. आम्ही तुम्हाला उद्ध्वस्त करू अशी धमकीही त्यांनी दिली आहे.

रशियाच्या कच्च्या तेलाच्या खरेदीत हिंदुस्थान, चीन आणि ब्राझील या 3 देशांचा वाटा सुमारे 80 टक्के आहे. ग्राहमचा असा युक्तिवाद आहे की त्यांचा सततचा व्यापार व्लादिमीर पुतिन यांच्या युक्रेनविरोधातील युद्धाला चालना देतो आणि युक्रेनमधील संघर्ष संपवण्याच्या प्रयत्नांना कमकुवत करतो. जर हिंदुस्थान, चीन आणि ब्राझील यापुढेही रशियाकडून तेल खरेदी करत राहिले तर आम्ही त्यांना उद्ध्वस्त करू, अशी धमकीही त्यांनी दिली.

फॉक्स न्यूजला दिलेल्या मुलाखतीत ते म्हणाले, आपण चीन, हिंदुस्थान आणि ब्राझीलला इशारा देत आहेत की, हे युद्ध सुरू ठेवण्यासाठी स्वस्त रशियन तेल खरेदी करत राहिलात तर आम्ही तुम्हाला नष्ट करू आणि तुमची अर्थव्यवस्था नष्ट करू. ट्रम्प प्रशासन निर्णायक कारवाई करण्यास तयार आहे आणि पुतिन यांना 14 जुलैपर्यंत लष्करी कारवाई थांबवण्यासाठी 50 दिवसांचा अल्टिमेटम देण्यात आला आहे, अन्यथा त्यांना कठोर निर्बंधांना सामोरे जावे लागेल. ज्यामध्ये तेल खरेदी करून रशियाच्या अर्थव्यवस्थेला पाठिंबा देणाऱ्या देशांवर दंड आकारण्याचाही समावेश आहे. ग्राहम म्हणाले की पुतिन, तुमची वेळ येत आहे. डोनाल्ड ट्रम्प हे अमेरिकन राजकारण आणि परराष्ट्र धोरणाचे स्कॉटी शॅफलर आहेत आणि ते तुम्हाला पराभूत करतील, असेही ते म्हणाले.

वसई : माजी युवा आमदार क्षितिज ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त खोचीवडे व परिसरातील विद्यार्थ्यांना वह्या वाटप करताना प्रमुख पाहुणे आणि बहुजन विकास आघाडीचे पदाधिकारी. कार्यक्रमाला मा. सभापती संजय म्हात्रे , उपसरपंच जितेंद्र तांबडे, सदस्य प्रज्ञेश कडू, मा. पोलीस पाटील रवींद्र राऊत, कमलेश राऊत, नया वैती आदी मान्यवरांची उपस्थिती होती.



## थोडक्यात

### दादर स्मशानभूमी परिसरात मानवी हाडांमुळे दहशत

**मुंबई:** दादरमध्ये चैत्यभूमीच्या शेजारी असणाऱ्या हिंदू स्मशानभूमीत मृतदेहांची हेळसांड केली जात असल्याचं समोर आलं आहे. मुंबई महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाचा निष्काळजीपणा यानिमित्ताने समोर आला आहे. स्मशानभूमीच्या आजुबाजूला हाडांचा खच झाला आहे. मृतदेहावर अंत्यविधी व्यवस्थित न झाल्याने स्मशानभूमी परिसरात मानवी हाडे आणि सांगाडे दिसत आहेत. स्मशानभूमीच्या बाजूला मानवी हाडे आणि सांगाडे असल्याने अंत्यविधिला येणाऱ्या लोकांमध्ये भीतीचे वातावरण दिसत आहे. दादर येथील चैत्यभूमीच्या बाजूला असलेल्या स्मशानभूमीत मृतदेहांचे मानवी अवशेष बाहेर विखुरलेले दिसत आहेत. लहान मुलं तसंच आपल्या परंपरेप्रमाणे ज्यांना त्या ठिकाणी मृत्यूनंतर पुरलं जातं त्यांच्या शरीराचे अवशेष बाहेर विखुरलेले पडल्याचे दिसत आहेत. मुंबई महापालिकेच्या वतीने या ठिकाणी दफनभूमी आहे. दफन केल्यानंतर हे मानवी अवशेष बाहेर कसे आले असा प्रश्न निर्माण होत आहे. अनेकदा कमी जागा असल्यामुळे या ठिकाणी पुरलेले मृतदेह बाहेर काढले जात असल्याची माहिती समोर येत आहे. आता पालिका नेमकं काय पाऊल उचलणार हे पाहावं लागणार आहे.

### ... तरीही मुंबईत सरासरीपेक्षा कमी पाऊस

**मुंबई:** सांताक्रूझ केंद्रात आतापर्यंत झालेल्या पावसाचा आकडा वाढत असला, तरी उर्वरित महिन्याच्या दिवसांत अपेक्षित प्रमाणात पाऊस पडेल का, याबाबत हवामान विभागाने अद्याप स्पष्ट अंदाज व्यक्त केलेले नाहीत. जुलै महिन्यात मुंबईत मुसळधार पाऊस पडणे अपेक्षित असते. यंदा मोसमी पाऊस लवकर दाखल झाला असला तरी अपेक्षेप्रमाणे पाऊस अजून पडलेला नाही. जून महिन्याच्या सुरुवातीपासून पावसाने उघडीप दिली होती. त्यानंतर शेवटच्या दिवसांत पडलेल्या पावसामुळे सरासरी गाठता आली. जुलै महिन्यातही हीच परिस्थिती आहे.जुलै महिन्यात कुलाबा येथे ७७४.१ मिमी तर, सांताक्रूझ येथे ८५५.७ मिमी पाऊस अपेक्षित असतो. हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात १ ते २१ जुलैपर्यंत १५४ मिमी तर, सांताक्रूझ केंद्रात ३९९.५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. दोन्ही केंद्रावरील आत्तापर्यंतची नोंद लक्षात घेता जुलै महिन्याची सरासरी पावसाला गाठता येईल का असा प्रश्न निर्माण झाला आहे. साधारण सुरुवातीचे १५ दिवस मुंबईत फारसा पाऊस पडलेला नाही.यंदाच्या तुलनेत गतवर्षी दोन्ही केंद्रांवर सरासरीपेक्षा अधिक पावसाची नोंद झाली होती. हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात जुलै २०२४ मध्ये १४०१.८ मिमी तर , सांताक्रूझ केंद्रात १७०२.८ मिमी पावसाची नोंद झाली होती.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# सोशल मिडियाच्या मदतीने आदिवासी विकास योजना कार्यान्वित

## शबरी महामंडळाच्या जव्हार कार्यालयाची आदर्श कामगिरी

प्रतिनिधी
**जव्हार**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित शाखा जव्हार (जि. पालघर) यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा, विशेषतः सोशल मिडियाचा प्रभावी वापर करून योजनांच्या अंमलबजावणीत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या शाखेने आपल्या कामगिरीतून राज्यातील इतर कार्यालयांसमोर आदर्श उभारला आहे. लाभार्थ्यांशी थेट संवाद, कर्ज वसुली प्रक्रियेतील सुलभता, योजनांचा पारदर्शक अंमल आणि माहितीचा वेगवान प्रसार यामुळे या कार्यालयाने आपल्या कार्यक्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणला आहे.

जव्हार कार्यालयाने डिजिटल माध्यमातून विविध उपक्रम प्रभावीपणे राबवत 'गाव तिथे योजना' हा दृष्टिकोन प्रत्यक्षात उतरवला आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय निहाय WhatsApp गटांचा वापर करून, लाभार्थी, अधिकारी व कर्मचारी यांच्यातील संपर्क सुलभ व पारदर्शक झाला आहे. केंद्र शासन पुरस्कृत NSTFDC योजना अंमलबजावणीत जव्हार कार्यालयाने गेल्या तीन वर्षांपासून राज्यात अव्वल क्रमांक कायम राखला आहे.

सोशल मिडिया प्लॅटफॉर्मचा कर्ज वसुलीत सकारात्मक उपयोग करणे, हप्त्यांची माहिती वेळेवर देणे, कर्ज मंजुरी स्थिती अपडेट करणे यामुळे लाभार्थ्यांच्या अडचणी कमी झाल्या आहेत. त्याचप्रमाणे लाभार्थ्यांच्या यशोगाथा व शासकीय शिबिरांची माहिती मोठ्या प्रमाणात पोहोचवण्यात आली आहे. राज्यातील शबरी महामंडळाच्या सर्व प्रकल्प कार्यालयांमध्ये सोशल मिडियाचा वापर करून कर्ज वसुली सुरू करणारे पहिले कार्यालय म्हणून जव्हार शाखेची ओळख निर्माण झाली आहे. या साऱ्याचा लाभ थेट तळागाळातील आदिवासी लाभार्थ्यांपर्यंत पोहोचला असून, शासकीय योजनांची जाणीव व उपलब्धता वाढली आहे.या यशामागे जवळून कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांचा सातत्यपूर्ण प्रयत्न, दूरदृष्टीपूर्ण नियोजन आणि नेतृत्वाचा मोलाचा वाटा आहे.




"शबरी महामंडळाच्या जव्हार कार्यालयात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून योजनांची अंमलबजावणी सक्षमपणे केली आहे. WhatsApp व सोशल मिडिया प्लॅटफॉर्मचा नियोजन, कर्ज वसुली व माहिती आदानप्रदानासाठी सकारात्मक उपयोग करून शबरी कार्यालय जव्हार राज्यस्तरावर आदर्श ठरले आहे."

**– लिना बनसोड, व्यवस्थापकीय संचालिका**
**शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक**

"ही संपूर्ण प्रक्रिया लिना बनसोड मॅडम यांच्या दूरदृष्टीपूर्ण मार्गदर्शनामुळे शक्य झाली. सोशल मिडियाच्या वापरातून लाभार्थ्यांशी थेट संवाद साकारला गेला, योजनांबद्दल जागरूकता वाढली. भविष्यात या मॉडेलचा उपयोग इतर शाखांना देखील नक्की होईल."

**– राजेश पवार शाखा व्यवस्थापक, कोकण विभाग**
**शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., शाखा जव्हार,**

"आम्हाला आता शासकीय योजनांची माहिती वेळेवर मिळते, कर्ज प्रक्रिया पारदर्शक झाली आहे. WhatsApp वरून हप्त्यांची आठवण आणि शिबिरांची माहिती मिळत असल्यामुळे खूप सोय झाली आहे. शबरी महामंडळाच्या या नविन पद्धतीमुळे आम्हाला खूप फायदा झाला."

**- गनेश पडवले, धानिवरी लाभार्थी**

# वसई ग्रामीणच्या विद्यार्थ्यांची शिक्षणासाठी 'धावाधाव'

## दर्जेदार महाविद्यालयांअभावी मुंबईकडे 'पलायन'

प्रतिनिधी
**वसई**

वसई-विरार शहर प्रगतीपथावर असले तरी शिक्षणाच्या मूलभूत गरजांकडे अजूनही दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. विशेषतः वसई तालुक्यातील ग्रामीण भागात पदवी महाविद्यालयांची तर शहरात पदव्युत्तर शिक्षण संस्थांची कमतरता जाणवत आहे. परिणामी, तालुक्यातील शेकडो विद्यार्थ्यांना दररोज लांबचा प्रवास करत मुंबई, पनवेल वा पुणे गाठावे लागत आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पदवी शिक्षणासाठी दररोज वसई-विरारपर्यंत २५ किलोमीटरचा प्रवास करावा लागतो. त्यानंतर पदव्युत्तर शिक्षणासाठी मुंबई गाठणे हे त्यांच्या दैनंदिन संघर्षाचा भाग बनले आहे. या प्रवासात केवळ वेळच नव्हे तर आर्थिकदृष्ट्याही त्यांना मोठा भुर्दंड सहन करावा लागत आहे. परिणामी अनेक विद्यार्थी शिक्षणापासून दूर राहत आहेत किंवा इतर पर्यायांचा विचार करू लागले आहेत.वसई-विरार परिसरात सध्या २५ लाखांच्या घरात लोकसंख्या आहे. मुंबईतील महागाईमुळे अनेक नागरिकांनी वसई-विरारकडे स्थलांतर केल्याने येथील लोकवस्ती वाढली आहे. या झपाट्याने वाढणाऱ्या शहरात शिक्षणाच्या सुविधा अद्याप मागेच आहेत. शिक्षणाच्या अभावामुळे विद्यार्थ्यांमध्ये नैराश्य निर्माण होत असून त्याचा परिणाम त्यांच्या गुणवत्तेवरही होत असल्याचे पालक व शिक्षकांनी सांगितले. दर्जेदार महाविद्यालयांची उभारणी केल्यास वसई तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्थानिक स्तरावरच गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळू शकते. त्यामुळे शिक्षणातील गळती थांबेल आणि नव्या पिढीला उज्वल भविष्याची संधी मिळेल, असे पालकांनी सांगितले.त्यामुळे राज्य शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन वसई-विरार परिसरात तसेच ग्रामीण भागात दर्जेदार महाविद्यालयांची उभारणी करावी, अशी सर्वसामान्य नागरिकांची मागणी आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज मासळी मंडई वाचविण्यासाठी डहाणूत मोर्चाची तयारी

## मार्केट लिलाव प्रक्रियेच्या एसआयटी चौकशीची मागणी

प्रतिनिधी
**डहाणू**

करेंगे या मरेंगेचा नारा देत क्रॉफर्ड मार्केट येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज मासळी मंडईला स्थलांतरापासून वाचविण्याकरिता मच्छिमार जन-आक्रोश मोर्चाची धाकटी डहाणू गावातून मच्छिमारांनी केली नव्या जोमाने सुरुवात केली आहे. लिलाव प्रक्रियेत घोटाळ्याची एसआयटी चौकशी करण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.



मासळी व्यवसायाचा आर्थिक केंद्र बिंदू असलेल्या मुंबईतील श्री छत्रपती शिवाजी महाराज मासळी मंडईचे अस्तित्व पालिकेच्या चुकीच्या धोरणांमुळे तसेच अकार्यक्षम अभियंत्यांमुळे धोक्यात आले असल्याचा आरोप आंदोलक मच्छीमारांनी केला आहे. त्यामुळे राज्यभरातील मच्छिमार एकवटले असून २२ जुलै रोजी पुकारलेल्या मच्छिमार जन-आक्रोश मोर्चा जरी तूर्तास स्थगित करण्यात आला असला तरी सरकार आणि पालिकेबरोबर येत्या १५ दिवसांत होणाऱ्या चर्चेतून तोडगा निघाला नाही तर मच्छिमार आंदोलनावर ठाम आहोत असे सांगण्यात आले.

आक्रोश मोर्चाची तयारी जोमाने करण्याकरिता तसेच जास्तीच्या संख्येने मच्छिमार बांधवांची मोर्च्यात सहभाग होण्याकरिता धाकटी डहाणू पासून नव्या जोमाने मोर्चाच्या मोहिमेला सुरुवात करण्यात आली असून येणाऱ्या दिवसात ही मोहीम पालघर, ठाणे, मुलुंड, भांडुप, नवी मुंबई, उत्तन, गोराई, मनोरी, मार्वे, मालवणी, वसई, अर्नाळा, वर्सोवा, कुलाबा, कफपरेड, खार दांडा, जुहू गावात सभा आयोजित करण्यात आल्या असल्याचे समितीकडून सांगण्यात आले.

मच्छिमारांच्या आक्रोशाची धार कमी न होण्याकरिता मोर्चाची मोहीम सुरू ठेवण्याचा निर्णय अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती, दि मुंबई फ्रेश फिश डीलर्स असोसिएशन, मुंबई जिल्हा कोळी महिला कार्यकारी सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघ, ठाणे जिल्हा मच्छिमार संघ ह्यांनी घेतला असून रविवार २०/०७/२०२५ रोजी धाकटी डहाणू येथील राम मंदिरातून मोर्चाचे शंखनाद वाजविण्यात आला असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष देवेंद्र दामोदर तांडेल यांनी दिली.

# प्रेमसंबंधातून पतीची निर्घृण हत्या

## नालासोपाऱ्यात घरातच पुरण्यात आला मृतदेह

प्रतिनिधी
**नालासोपारा**

नालासोपाऱ्यातील धानीवबाग परिसरात पत्नीने प्रियकराच्या मदतीने नवऱ्याची हत्या करून घरातच प्रेत पुरल्याचा थरारक प्रकार उघडकीस आला आहे. तब्बल १५ दिवसांनंतर हा प्रकार उघडकीस येताच परिसरात एकच खळबळ माजली आहे.

धानीवबाग येथील ओमसाई वेल्फेअर सोसायटीच्या चाळीत विजय चौहान (वय ३५) हा पत्नी गुडिया उर्फ चमनदेवी आणि ८ वर्षीय मुलासह वास्तव्यास होता. तो ६ जुलैपासून बेपत्ता झाला होता. विजयचा भाऊ अखिलेश हा शेजारच्या घरात राहतो. अनेक वेळा चौकशी करूनही गुडियाने 'विजय कुर्ल्याला कामासाठी गेला आहे' असे सांगून वेळ मारून नेली होती.दरम्यान, विजयच्या घरात काही दिवसांपूर्वी टाईल्स लावण्याचे काम सुरू होते, जे अचानक थांबले होते. अखिलेशला संशय आल्याने त्याने सोसायटीचे अध्यक्ष धनंजय मिश्रा यांच्यासमवेत घराची पाहणी केली. त्या वेळी नव्याने लावलेल्या टाईल्सबद्दल त्याला शंका आली. पोलीसांच्या उपस्थितीत टाईल्स काढून खोदकाम केल्यावर जमिनीखाली विजयचा कुजलेला मृतदेह आढळून आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुडिया आणि तिचा प्रियकर मोनू विश्वकर्मा (२०) यांच्यात प्रेमसंबंध होते. या दोघांनी आपल्या मैत्र गिरी या व्यक्तीच्या मदतीने हा खून केल्याचा आरोप आहे. विजयचा मृतदेह घरातच पुरल्यास कोणी शंका घेणार नाही, या हेतूने त्यांनी हा क्रूर कट रचला होता. मात्र नव्या टाईल्समुळे अखिलेशच्या संशयाला पुष्टी मिळाली आणि अखेर खून उघडकीस आला.खून झाल्यानंतर गुडिया, मोनू व गिरी हे तिघेही फरार झाले असून पोलिसांनी त्यांच्या अटकेसाठी शोधमोहीम सुरू केली आहे. पोलिसांनी संबंधित दोन्ही घरे सील केली असून पुढील तपास सुरू आहे. या थरारक हत्येने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**PUBLIC NOTICE**

This is to inform general public that the land mentioned in "The Schedule of Property" is purchased by my clients **Mr. Mukul Pathak, Mr.Mihir Sanjay Seth & Mr.Sandesh Pashte** - Gut No.94 and **Smt. Mangal Mohite and Mr. Sandesh Pashte** - Gut No.88 and rest of the land is being purchased by my clients **Shriram Sawant, Sandesh Pashte.** All My clients have verified the title and rights of the sellers to sell all the land and are satisfied with the same.

However, by this public notice I am on behalf of my above clients (buyers) do hereby invite objection from General Public or Any person(s), institution(s), bank(s), or authority(ies) or firms or any company of having any claim, objection, lien, mortgage, charge, easement right, agreement, litigation, or interest of any nature in respect of the said land/property, is hereby requested to make such claim or objection in writing along with supporting documents to the undersigned within 7 (seven) days from the date of publication of this notice, failing which, the proposed transactions shall be completed and claims or objections (if any) or any rights or interests in respect of the said land shall be deemed to have been permanently waived, relinquished and abandoned which shall not be entertained thereafter

**The Schedule of Property**

| Village Name | Gat No. | Total Area of land | Asst | Name of Seller |
|---|---|---|---|---|
| Village, Chargaon Tal Ambernath Dist Thane | 87 | 13-10-20 | 11-44 | Hemant Jayantilal Bhuta Jatin Jayantilal Bhuta Tushar Jayantilal Bhuta |
| | 69/A | 0-40-20 | 0-56 | Hemant Jayantilal Bhuta Jatin Jayantilal Bhuta Tushar Jayantilal Bhuta |
| | 71 | 0-20-70 | 1-37 | Hemant Jayantilal Bhuta Jatin Jayantilal Bhuta Tushar Jayantilal Bhuta |
| | 72 | 0-14-40 | 1-50 | Hemant Jayantilal Bhuta Jatin Jayantilal Bhuta Tushar Jayantilal Bhuta |
| | 89 | 0-77-40 | 12-62 | Hemant Jayantilal Bhuta Jatin Jayantilal Bhuta Tushar Jayantilal Bhuta |
| | 97 | 0-72-30 | 7-25 | Hemant Jayantilal Bhuta Jatin Jayantilal Bhuta Tushar Jayantilal Bhuta |
| | 99 | 0-39-00 | 0-45 | Hemant Jayantilal Bhuta Jatin Jayantilal Bhuta Tushar Jayantilal Bhuta |
| | 121 | 1-55-00 | 1-86 | Hemant Jayantilal Bhuta Jatin Jayantilal Bhuta Tushar Jayantilal Bhuta |
| | 129 | 0-04-00 | 0-19 | Hemant Jayantilal Bhuta Jatin Jayantilal Bhuta Tushar Jayantilal Bhuta |
| | 830 | 0-90-00 | 0-19 | Hemant Jayantilal Bhuta Jatin Jayantilal Bhuta Tushar Jayantilal Bhuta |
| | 88 | 17-53-00 | 14-50 | Niranjan Bhuta Already sold to Mangal Mohite and Sandesh Pashte |
| | 94 | 12-92-00 | 6-31 | Hemant Jayantilal Bhuta Already sold to 1) Mihir Sanjay Seth, 2) Sandesh Pashte, 3) Mukul Pathak |

**Advocate Office at :-** Trimurti Apartment, First Floor, Near Karnavat Class, Opp.Maruti Temple, Gandhi ChowkKulgaon Badlapur (E) Tal- Ambernath Dist- Thane. 421 503.

Sign/-
**MR. K. B. BANOTE**
**ADVOCATE HIGH COURT**

# आषाढसरींनी वसईकर सुखावले मुसळधार सरींनी सखल भाग जलमय

## शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण

**वसई**

जुलै महिन्याच्या पहिल्या दोन आठवड्यांपासून विश्रांती घेतलेल्या पावसाने सोमवारपासून वसईत पुन्हा जोरदार पुनरागमन केले आहे. सकाळपासूनच कोसळणाऱ्या मुसळधार सरींमुळे शहरातील सखल भाग जलमय झाले असून जनजीवन काहीसे विस्कळीत झाले आहे. दुसरीकडे, रखडलेल्या लावणी हंगामामुळे चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

जून महिन्यात समाधानकारक पावसामुळे शेतकऱ्यांनी भातपेरणीला सुरुवात केली होती. मात्र, त्यानंतर पावसाने पाठ फिरवल्याने काही भागांत पेरणीचे काम रखडले होते. आता पुन्हा जोरदार पावसाची हजेरी लागल्याने शेतीसाठी आवश्यक असलेली ओल निर्माण झाली असून शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.सोमवारी सकाळपासून कोसळणाऱ्या पावसामुळे शहरातील तापमानात घट होऊन गारवा पसरला. मात्र, मुसळधार पावसामुळे शहरातील अनेक सखल भागांमध्ये पाणी साचले. परिणामी, वाहतूक संथ झाली असून काही भागांमध्ये वाहतूककोंडीची स्थिती निर्माण झाली होती.दरम्यान, पावसामुळे रस्त्यांवरील आधीच असलेले खड्डे अधिकच खोल झाले आहेत. हवामान विभागाने आगामी काही दिवसांत जोरदार पावसाचा इशारा दिला आहे. त्यामुळे नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सध्या वसईत पुन्हा एकदा पावसाळी वातावरण अनुभवायला मिळत असून निसर्गाच्या या सरींनी ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांना पुन्हा एकदा भिजवून टाकले आहे.

# शासकीय अनुदानाचा पत्ताच नाही... रेशीम शेतीसाठी शेतकऱ्यांची चिंता वाढली



प्रतिनिधी
**मोखाडा**

मोखाडा तालुक्यातील सूर्यमाळ येथील २० शेतकऱ्यांनी तुतीची लागवड केलेली आहे मात्र एक वर्षाचा कालावधी उलटत असून रेशीम शेतीसाठी लागणारे अनुदान अद्याप उपलब्ध न झाल्याने येथील शेतकऱ्यांना रेशीम अळी पालन थांबवावे लागत आहे. यामुळे तुतीच्या झाडांचे संवर्धन करणे देखील आव्हानात्मक ठरत असून शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत.शासनाने या विषयाकडे तातडीने लक्ष द्यावे,अशी मागणी माजी पंचायत समिती सभापती प्रदीप वाघ हे करत आहेत.

रेशीम अळी संगोपनासाठी आवश्यक असणाऱ्या साधनसामुग्री, खते,औषधे आणि देखभालीसाठी शासकीय अनुदान अत्यावश्यक असते. मात्र सध्या अनुदान न मिळाल्यामुळे रेशीम शेतीची साखळीच थांबली आहे."शेतकऱ्यांनी तुतीची झाडे लावली,त्यांची निगा राखली; पण अळी पालन थांबल्यामुळे संपूर्ण मेहनत वाया जात आहे.शासनाने तात्काळ निधी जाहीर करून रेशीम शेतीला चालना द्यावी," अशी प्रदीप वाघ यांची मागणी आहे.

यापूर्वीही शेतकरी वर्गाने प्रशासनाकडे अनेक तोंडी मागणी केली आहे.मात्र अद्याप ठोस पावले उचलली गेली नाहीत. त्यामुळे रेशीम शेती करावी की नाही हा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. रेशीम शेतीसाठी स्वतंत्र योजना आणि वेळेवर निधी द्यावा अशी मागणी माजी सभापती प्रदीप वाघ हे शासनाकडे करणार आहेत.

# 'युवा स्वराज' प्रकल्पांतर्गत दिगंत स्वराज फाउंडेशन, मेट्रो पोलीस फाउंडेशनचे मुले- मुलींसाठी संयुक्त उपक्रम

प्रतिनिधी
**मोखाडा**

दिगंत स्वराज फाउंडेशन आणि मेट्रोपॉलीस फाउंडेशन व मेट्रोपॉलीस हेल्थकेअर लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने मागील वर्षात किशोरवयीन मुलामुलींसाठी घेण्यात आलेल्या जीवन कौशल्य विकास कार्यशाळेत अनेकांचे सहकार्य,प्रेरणा, मार्गदर्शन लाभले यानिमित्त मोखाडा येथे 'युवा स्वराज प्रकल्प'अंतर्गत विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

मोखाडा तालुक्यातील साखरी, वाशाळा,आसे,खोच,डोल्हारा व जव्हार मधील वडोली, घिवंडा येथील ग्रामपंचायती हद्दीतील किशोरवयीन मुला मुलींमध्ये नेतृत्वगुण,स्व जाणीव,समस्या निराकरण,निर्णय क्षमता,व्यक्ती~व्यक्तिमधला सहसंबंध,परिणामकारक संभाषण हे विकसित करण्याचा या प्रकल्पाचा उद्देश आहे. या प्रकल्पांतर्गत विद्यार्थ्यांना विविध कार्यशाळा मधून सामाजिक बदलासाठी ॲक्शन प्लॅन,चर्चासत्रे, संवादमंच,तसेच गावपातळीवरील समस्या ओळखून उपाययोजना करण्यासाठी प्रशिक्षण दिले जात आहे.ग्रामीण भागातील मुलींनी बालविवाहविरोधात मोठा आवाज उठवत गावोगावी जनजागृती मोहीम राबवली आहे. रॅली, पथनाट्य,घोषणाबाजी यांच्या माध्यमातून त्यांनी बालविवाहाचे दुष्परिणाम समाजासमोर मांडले आहेत.

"बालविवाह रोखा–शिक्षणास प्रोत्साहन द्या","आम्ही शिकू,आम्ही वाढू, लवकर लग्न नको" अशा संदेशांनी संपूर्ण परिसर दुमदुमत आहे.शालेय वयातील मुलींच्या या सक्रिय सहभागामुळे नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात जागृती निर्माण झाली आहे. या उपक्रमाची सकारात्मक दखल घेत अनेक ग्रामपंचायतींनी बालविवाहविरोधी ठराव एकमताने मंजूर केले आहेत.कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी दोन्ही संस्थांचे प्रमुख प्रतिनिधी,सर्व टीम,स्थानिक सामाजिक कार्यकर्ते,सरपंच व अशा कार्यकर्ते,अंगणवाडी सेविका,पत्रकार,वैद्यकीय अधिकारी,गावकरी,शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमास सहभागी असलेल्या सर्वांचा सत्कार करण्यात आला व दिलेल्या योगदानाची दखल घेण्यात आली.



### महिलांसाठी सॅनिटरी पॅड बँकेचा आगळा उपक्रम

साखरी ग्रामपंचायत हद्दीतील धांगडेवाडी येथे महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने एक स्तुत्य उपक्रम मोखाडा तालुक्यात पहिल्यांदा या संस्थांच्या माध्यमातून राबविण्यात येत असून.येथे सॅनिटरी पॅड बँक पेटी स्थापन करण्यात आली आहे.या पेटीत दानकर्त्यांनी सॅनिटरी पॅड्स ठेवायचे असून, गरजूंनी–विशेषतः ग्रामीण भागातील स्त्रिया आणि मुलींनी–त्याचा उपयोग करावा,असा उद्देश या उपक्रमामागे आहे. या सॅनिटरी पॅड बँकेमुळे ग्रामीण भागात मासिक पाळी विषयी असलेले गैरसमज दूर होण्यास मदत होणार असून, आरोग्याची काळजी घेण्यास महिलांना प्रोत्साहन मिळेल.या उपक्रमाचे ग्रामस्थांनी स्वागत केले असून,अधिकाधिक दानकर्त्यांनी पुढे येण्याचे आवाहन दिगंत स्वराज फाउंडेशन व मेट्रोपॉलीस फाउंडेशन यांनी केले आहे.

**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी**
**वसई विभाग वसई यांचे कार्यालय**
जूने शासकीय सभागृह, किल्ला बंदर रोड, मालांडे, वसई गांव, ता. वसई, जि. पालघर पिन ४०१२०१
दुरध्वनी क्रमांक ०२५०-३२०८८० Email ID vasaisdo@gmail.com

**जाहीर सुचना**

याद्वारे जाहीर अवाहन करण्यांत येत की, श्री. लक्ष्मण नाना पाटील रा. नारिंगी, ता. वसई, जि. पालघर तर्फे कुळमुखत्यारधारक श्री. नवनीत मधुकर पाटील रा. नारिंगी, विरार पूर्व, ता. वसई, जि. पालघर यांनी मोजे डोंगरे, ता. वसई, येथील स.नं. १८६ (जुना स.नं. ६) या मिळकतीवरील चौकशी अधिकारी तथा तहसिलदार वसई यांचे न्यायालयातील तक्रार रजिस्टर क्र. २५/२०२३ दिनांक १९/०७/२०२३ रोजीच्या आदेशाविरुध्द अपिलाची यांनी इकडील न्यायालयात क्र. व्हीडी/टेनन्सी/अपिल/संकिर्ण नं. १७३/२०२३ दाखल केलेले आहे. प्रस्तुत अपिलामधील जमिन मिळकतीचा तपशील खालील प्रमाणे

| गावाचे नाव | स.नं..हि.न. | क्षेत्र (ह. आर) | आकार |
|---|---|---|---|
| डोंगरे | १८६ (जुना स.नं. ६) | ८००० चौ.मी | - |

प्रस्तुत प्रकरणी खालील सामनेवाले यांस खलील नमुद पत्यावर तलाठी रजिस्टर ए.डी पोस्टाने वांचे मार्फत नोटीस पाठविण्यात आल्या होत्या सदर खातेदार हे नमूद पत्यावर रहात नसल्याचे अहवाल प्राप्त झाला आहे, तरी सदर आरटीएस अपिलाची सुनावणी या कार्यालयात दिनांक ३०/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा ठेवण्यात आलेली आहे.

त्यामुळे प्रस्तुत अपिल प्रकरणांत खालील नमुद सामनेवाले यांनी अगर त्यांचेतर्फे कायदेशीर बारस आगर हितसंबधित अन्य कोणताही व्यक्ती यांनी जाहीर नोटीसद्वारे उपविभागीय अधिकारी कार्यालय वसई यांचे न्यायालयात नेमुत दिलेल्या तारखेस व वेळेस आवश्यक त्या कागदपत्रासह न चुकता हजर रहावे. अन्यथा उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे गुणवत्तेवर निर्णय घेणेत येईल याची नोंद घ्यावा.

**सामनेवाले यांचे नावे:-**
**राकेश रामचंद्र अग्रवाल**
**रा. कीला राजप्रभा, अंबाडी रोड, वसई पश्चिम, ता. वसई, जि. पालघर**

सही/-
**उपविभागीय अधिकारी, वसई**

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Thirty**
**Issu - 32**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- तीसावे**
**अंक - ३२**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

३ वृत्तमानस मुंबई
मुंबई, मंगळवार, २२ जुलै २०२५

## कोकणच्या ओसाड घरांना नवसंजीवनी देणार 'वास्तू लक्ष्मी उपक्रम'

**मुंबई :** कोकणातील रिकामी घरे घेणार मोकळा श्वास , टिकणार संस्कृती, परंपरा आणि देणार आर्थिक स्रोत कोकणाची शाश्वत जीवनशैली अशी होती ज्यात तिथला रोजगार शाश्वत होता. पण आजचा कोकणचा तरुणवर्ग रोजगार शोधत मुंबई, पुण्यासारख्या शहरात स्थायिक झाला आहे. कधी काळची श्रीमंत निसर्गरम्य गावे ओसाड पडू लागली आहेत. मानवी राबत्याविना माती-चिऱ्याची कौलारू घरे श्वास सोडू लागली आहेत. ही घरे जर कोकणात येणाऱ्या पर्यटकांसाठी उपलब्ध झालीत तर ती नव्याने तग धरू शकतील. पर्यटकांना तेथील शाश्वत जीवनशैली व अस्सल कोकण अनुभवता येईल. याचा आर्थिक फायदा घरमालकांना तर होईलच शिवाय इतर रोजगार सुद्धा या माध्यमातून उभे होतील. शिव उद्योग संघटना कोकणातील रिकामी घरे आणि त्यांच्या वाड्या ह्यांचे संगोपन, निगा आणि पर्यटन ह्यासाठी 'वास्तू लक्ष्मी उपक्रम' सुरू करीत आहे. ज्यामुळे तुमची घरे, वाड्या मोकळा श्वास घेतील, तुम्हाला आर्थिक लाभ, मानसिक समाधान मिळेल.इच्छुक असणाऱ्यांनी नाव, पूर्ण पत्ता, फोन नंबर आणि घरचा, वाडीचा फोटो खालील नंबर वर पाठवा.प्रत्येक तालुक्यात महिला, पुरुष पदाधिकारी नियुक्त करणे आहेत.त्यासाठी दीपक विठ्ठल काळीद ९८२०३१७१५० यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.



# मुंबई किनारी रस्ता प्रकल्पावरील वाहतुकीवर सीसीटीव्हीचा 'वॉच'

### एकूण २३६ सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित, कुठेही अपघात झाल्यास नियंत्रण कक्षाला तात्काळ माहिती मिळणार

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

यंदाचा बृहन्मुंबई महानगरपालिकेने उभारलेला महत्त्वाकांक्षी प्रकल्प धर्मवीर, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता (दक्षिण) हा वाहतुकीच्या दृष्टीने पूर्ण होवून वाहतुकीसाठी टप्प्याटप्प्याने खुला करण्यात आला आहे. पालिकेने या प्रकल्पावर ठिकठिकाणी मिळून, निरनिराळी वैशिष्ट्ये असलेले २३६ सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित झाले आहेत.





या प्रणालीमुळे मुंबई किनारी रस्त्यावर कोठेही अपघात झाला तर नियंत्रण कक्षाला त्याची त्वरित माहिती मिळते आणि अपघातग्रस्तांना मदत उपलब्ध होते. तसेच दिवसभरात किती वाहनांनी या मार्गाचा वापर केला, त्या वाहनांचे प्रकार कोणते, किती वाहनांनी वेगाची मर्यादा ओलांडली, याचीही नोंद या कॅमेरा प्रणालीमुळे ठेवण्यात येत आहे. मुंबईकरांना जलद, सुलभ आणि सुरक्षित वाहतूक सुविधा उपलब्ध व्हावी, हा दीर्घकालीन दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबई किनारी रस्ता प्रकल्प उभारला आहे.

शामलदास गांधी मार्ग (प्रिन्सेस स्ट्रीट) उड्डाणपूल ते वरळी-वांद्रे सागरी सेतूच्या वरळी टोकापर्यंत हा प्रकल्प उभारण्यात आला आहे. या प्रकल्पाची लांबी १०.५८ किलोमीटर इतकी आहे. या प्रकल्पावर दोन्ही बाजूने वाहतूक सुरू झाली आहे. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून संपूर्ण प्रकल्पावर ठिकठिकाणी विविध प्रकारचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. शामलदास गांधी मार्ग (प्रिन्सेस स्ट्रीट उड्डाणपूल) ते वरळी वांद्रे सागरी सेतूच्या वरळी टोकापर्यंत चार प्रकारचे वैशिष्ट्य असलेले, एकूण २३६ सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित झाले आहेत.

मुंबई सागरी किनारी रस्त्यावर वेगमर्यादांचे पालन न करणे, शर्यती लावणे, आवाज नियंत्रणात न ठेवणे अशा तक्रारी स्थानिकांकडून प्राप्त होत होत्या. कॅमेरे लावल्यामुळे महानगरपालिका तसेच वाहतूक पोलिस यांना या प्रकारांवर नियंत्रण ठेवता येईल. हे कॅमेरे कार्यान्वित झाल्यामुळे आता हा महामार्ग २४ तास सुरू ठेवण्याचे महानगरपालिका प्रशासनाने नियोजन पूर्ण झाले आहे. या सुविधेमुळे मुंबई किनारी रस्ता प्रकल्पावरील संभाव्य अपघात टाळण्यासाठी तसेच दुर्दैवाने अपघात घडल्यास त्यावर त्वरित नियंत्रण मिळवण्यासाठी मोठी मदत होत आहे. मुंबई किनारी रस्त्यावरून जाणाऱ्या सर्व वाहन चालकांनी वाहतुकीच्या सर्व नियमांचे पालन करावे, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### असे आहेत कॅमेरे आणि त्यांची वैशिष्ट्ये

**१. अपघात ओळखणारे कॅमेरे**
मुंबई किनारी रस्त्या प्रकल्पात जुळे बोगदे बांधण्यात आले आहेत. या दोन्ही बोगद्यांमधील आंतरमार्गिका जवळ प्रत्येकी ५० मीटर अंतरावर अपघात ओळखणारे कॅमेरे बसविण्यात आले आहेत. दोन्ही बोगदे मिळून असे एकूण १५४ कॅमेरे आहेत. जुळ्या बोगद्यांमध्ये कार अपघात, चुकीच्या दिशेने जाणारी वाहने इत्यादी घटनांची हे कॅमेरे आपोआप ओळख करतात. तसेच अशी घटना घडल्यानंतर नियंत्रण कक्षाला तात्काळ सूचना देतात.

**२. निगराणी कॅमेरे**
सामान्यपणे वाहतूक सुरक्षेसाठी ७१ निगराणी कॅमेरे बसविले आहेत. हे कॅमेरे फिरवता, झुकवता व झूम करता येतात. जेव्हा एखादा अपघात होतो तेव्हा या कॅमेऱ्यामधील व्हीआयडीएस प्रणाली स्वयंचलित पद्धतीने सदर घटना ओळखते आणि आपोआप त्या घटनेकडे लक्ष केंद्रित करते. दोन्ही भूमिगत बोगद्यांमध्ये असे ७१ कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

**३. वाहन मोजणी कॅमेरे**
मुंबई किनारी रस्ता प्रकल्पातील भूमिगत बोगद्यांचे प्रवेशद्वार व निर्गमद्वारावर एकूण चार कॅमेरे बसविण्यात आले आहेत. भूमिगत बोगद्यांमध्ये जाणाऱ्या वाहनांची संख्या मोजणे, त्यांचे वर्गीकरण करणे, यासाठी हे कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

**४. वाहन क्रमांक ओळखणारे कॅमेरे**
मुंबई किनारी रस्ता प्रकल्प हा नव्यानेच उभारण्यात आला असल्यामुळे या ठिकाणी वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि अशी वाहने ओळखण्यासाठी सात कॅमेरे बसविण्यात आले आहेत. वेग मर्यादा ओलांडणाऱ्या वाहनांची छायाचित्रे व त्यांच्या वाहन क्रमांकाची (नंबर प्लेट) नोंद हे कॅमेरे करतात.

## पालिका आयुक्त गगराणी यांची माहिती

# मत्स्य विभागाकडून मरोळ फिश मार्केटचा पुनर्विकास, पालिका आपला हिस्सा देणार!

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार रखडलेली कामे पार पडणार

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

गेल्या अनेक वर्षापासून रखडलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारातील विविध मार्केटच्या पुनर्विकासाचे काम लवकरच सुरु करण्यात येणार असून यात मरोळ फिश मार्केट, नवलकर मार्केट, दत्ताजी साळवी मंडई, निर्मलाताई रागिणवार मंडईच्या पुनर्विकासाचे काम लवकरच सुरु करण्यात येणार असल्याचे आश्वासन मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांनी उपमुख्यमंत्री, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे व खासदार रविंद्र वायकर यांच्या संयुक्त बैठकीत दिले. मरोळ फिश मार्केटचा पुनर्विकास मत्स्य विभागातर्फे करण्यात येणार असून त्यासाठी मुंबई महापालिका आपल्या हिस्स्याची रक्कम मत्स्य विभागाला देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

२७ मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा मतदार क्षेत्रात प्रलंबित समस्या सोडवण्यासाठी नुकतीच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विधिमंडळातील दालनात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला नगर विकास विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता, म्हाडाचे उपमुख्य अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक संजीव जयस्वाल, पालिका आयुक्त भूषण गगराणी, एसआरएचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र कल्याणकर, मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी, अतिरिक्त सीपी मीना, एमएमआरडीएचे आयुक्त संजय मुखर्जी, म्हाडाच्या मुंबई मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद बोरीकर, विभाग प्रमुख अल्ताब पेवेकर,



ज्ञानेश्वर सावंत तसेच विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या लोकसभा क्षेत्रा अंतर्गत येणाऱ्या विविध विधानसभा क्षेत्रात मुंबई महानगरपालिकेची मार्केट आहेत. यात मरोळ फिश मार्केट, नवलकर मार्केट, निर्मलाताई रागिनवार, दत्ताजी साळवी मार्केट, जे.व्ही.पी.डी मार्केट, वर्सोवा मार्केट आदी मार्केटचा समवेश आहे. यातील अनेक मार्केट जुनी असल्याने त्याच्या दुरवस्थेत वाढ झाली आहे. तर काही मार्केट प्लॉटच्या विकासासाबाबत अद्याप कुठलाच निर्णय महापालिकेने घेतलेला नाही. मरोळ फिश मार्केटच्या वाढत्या दुरवस्थेमुळे याचा पुनर्विकास करण्यात यावा अशी मागणी येथील मासे विक्रेते यांनी केली होती. त्यानुसार याचा पुनर्विकास करण्यात यावा अशी मागणी खासदार वायकर यांनी बैठकीत केली.

याला उत्तर देताना मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांनी याचा पुनर्विकास मत्स्य विभागातर्फे करण्यात येणार असून त्यासाठी महापालिका आपल्या हिस्स्याची रक्कम मत्स्य विभागाला देणार असल्याची माहिती दिली. तर नवलकर मार्केटच्या पुनर्विकासाचा आराखडा मंजूर करण्यात आला असून लवकरच त्याचे टेंडर महानगर पालिका काढणार असल्याची माहितीही त्यांनी उपमुख्यमंत्री व खासदार यांना दिली.

**आरेतील अंतर्गत रस्त्यांवर दिवाबत्तीची सोय होणार**

आरेमध्ये २७ आदिवासी पाडे असून अन्य लोकवस्ती हि आहे. याठिकाणी जंगली प्राण्यांचा वावर ही मोठ्याप्रमाणात असतो. या प्राण्यांनी मानवी वस्तीत हल्ला केल्याच्या घटनाही घडल्या आहेत. त्यामुळे आरेतील ४५ कि.मीच्या अंतर्गत रस्त्यांवर स्ट्रीटलाईटची सुविधा करण्याच्या सुचना उपमुख्यमंत्री, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांना दिल्या.

**वनविभागातील रहिवाश्यांना मिळणार मुलभूत सोयी सुविधा**

गेल्या अनेक वर्षापासून वनविभागात राहणारी जनता ही पण माणसे आहेत. त्यांना मुलभूत सुविधेपासून वंचित न ठेवता मुलभूत सुविधा देण्यात याव्यात अशी मागणी खासदार वायकर यांनी बैठकीत केली. त्यानुसार मुलभूत सुविधा देण्याची जबाबदारी ही महानगरपालिकेची असल्याने वनविभागात रहाणाऱ्या रहिवाश्यांना पाणी, रस्ते, शौचालय आदी मुलभूत सुविधा द्या त अशा सूचना उपमुख्यमंत्री, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी महापालिका आयुक्त यांना दिल्या.



**मुंबई :** रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार रिपब्लिकन पक्षाच्या महिला आघाडी च्या मुंबई प्रदेशच्या उपाध्यक्षपदी सौ.प्रितमाला साळवी यांची अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे. रिपब्लिकन पक्षाच्या महिला आघाडीच्या मुंबई अध्यक्षा उषाताई रामलु यांच्या हस्ते सौ.प्रितमाला साळवी यांना नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले.यावेळी रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश जाधव ;महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष रेश्मा खान आदि मान्यवर उपस्थित होते.

# '1916 चे' टिशर्ट घालून दहिहंडी उत्सवात 1 हजार स्वयंसेवक तैनात करा!

### मंत्री ॲड. आशिष शेलार यांचे महापालिकेला निर्देश

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मुंबई महापालिकेच्या आपत्कालीन कक्षाने गोविंदासाठी सुरु केलेल्या 1916 या हेल्पलाईनचे टिशर्ट परिधान केलेले स्वयंसेवक दहिहंडी उत्सवाच्या दिवशी शहरात तैनात करा, असे निर्देश मुंबई उपनगर पालकमंत्री तथा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी काल मुंबई महापालिकेला दिले.

दहिहंडी समन्वय समिती आणि मुंबई महापालिका, मुंबई पोलीस, ट्राफिक पोलीस, आरटीओ, जे. जे रुग्णालय, अग्निशमन दल अशा सर्व यंत्रणांसोबत पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी आढावा बैठक घेतली. पु.ल. देशपांडे कला अकादमी मध्ये झालेल्या बैठकीला समन्वय समितीचे अध्यक्ष बाळा पडेलकर, सरचिटणीस गीता झगडे, खजिनदार डेव्हिड फर्नांडिस, तुषार वावेकर, चेतन बेलकर, राजेश सानवडेकर, जितेंद्र राऊत यांच्यासह सहाय्यक पोलीस आयुक्त दिनेश पल्लेवाड, महापालिका आपत्ती व्यवस्थापन प्रमुख अधिकारी रश्मी लोखंडे, पोलीस उपायुक्त अकबर पठाण, जे. जे. रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत पारडे यांच्यासह सबंधित अधिकारी यावेळी उपस्थितीत होते.

मुंबईतील दहीहंडी उत्सवाचे यशस्वी आणि सुरक्षित नियोजन करण्यासाठी उत्सव काळातील गर्दी नियंत्रण, सुरक्षा उपाययोजना, वैद्यकीय सुविधा, स्वच्छता व्यवस्था आणि आपत्कालीन प्रतिसाद व्यवस्था यासंबंधी सविस्तर आढावा या बैठकीत घेतला. विविध विभागांमधील समन्वय आणि दक्षता वाढवून उत्सव शांततापूर्ण, शिस्तबद्ध आणि पारंपरिक उत्साहात पार पडावा यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले. परवानगी देताना सुलभता असावी, रुग्णालयाचे मार्गाचा मॅप तयार करा असेही निर्देश दिले. पंधरा दिवसाच्या आत पुन्हा आढावा बैठक घेऊ, असेही त्यांनी सांगितले.

# कट्टरता दूर केल्याशिवाय धार्मिक सलोखा शक्य नाही!

### साहित्यिक चंद्रकांत झटाले यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**



कट्टरता दूर झाल्याशिवाय धार्मिक सलोखा शक्य नाही, असे प्रतिपादन करतानाच, सर्व धर्मातील कट्टरता दूर करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन 'मजबुती का नाम महात्मा गांधी' या गाजलेल्या पुस्तकाचे लेखक चंद्रकांत झटाले यांनी येथे केले. मूलभूत अधिकार संघर्ष समिती (मास) या संघटनेच्या वतीने ताडदेव येथील जनता केंद्रात आयोजित करण्यात आलेल्या धार्मिक सलोखा परिषदेत झटाले बोलत होते. परिषदेच्या अध्यक्षपदी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ होते.

धार्मिक कट्टरता दूर केल्याशिवाय सलोखा होणे शक्य नाही. धार्मिक द्वेष रोखणे ही आपली जबाबदारी आहे. हिंदू धर्म धोक्यात आहे म्हणजे नेमके काय, असा सवाल करीत मुघलांनी ७०० वर्ष राज्य केले, ब्रिटिश दिडशे दोनशे वर्षे होते, त्यावेळी धर्म धोक्यात आला नाही. मग सगळ्या महत्वाच्या पदांवर हिंदूच असताना आज धर्म धोक्यात कसा येऊ शकतो, असा सवाल करून, हा समाजाचे मन भटकवणारा प्रचार आहे, असे झटाले म्हणाले.

परिषदेच्या अध्यक्षपदावरून बोलतांना हर्षवर्धन सपकाळ यांनी शाहू-फुले-आंबेडकर यांचा विचार, वारकरी संप्रदाय यांची उदाहरणे देत बहुजन समाजातील संत परंपरेचा आढावा घेतला. खरा हिंदू धर्म संत परंपरेचा धर्म आहे. हे आपण ठणकावून सांगितले पाहिजे, असे ते म्हणाले. परिषदेची प्रस्तावना व सूत्रसंचालन मूलभूत अधिकार संघर्ष समितीचे कार्याध्यक्ष दिनेश राणे यांनी केले. तर आभार प्रदर्शन उपाध्यक्ष चित्रा राणे यांनी केले. परिषद यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष गिरीश कटारिया, सचिव संग्राम पेटकर, खजिनदार डॉ यु. व्ही. महाडकर, निरंजनी शेट्टी व कार्यकारी मंडळाने विशेष परिश्रम घेतले.

## E-TENDER NOTICE

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**E-Tenders are invited on line from experienced and reputed Manufacturers/Suppliers/Contractors for the supply/ works of following at Gas Turbine Power Station, Uran:**

| e-Tender / RFx No. | Description | Estimated Cost/ EMD (Rs) | Sale Period | Last date of submission (up to 11.00 hrs) |
|---|---|---|---|---|
| RFx No. 3000058853 | Carrying out the work of Annual Medical check up of GTPS Employees. | 15.67 Lakhs<br>19,170/- | 22.07.2025 To 04.08.2025 | 05.08.2025 |
| RFx No. 3000058925 | Supply of A0 Steam turbine HPCV and LPCV MicroPulse Linear Position Feedback Transmitter at GTPS, Uran. | 11.55 Lakhs<br>15,052/- | 22.07.2025 To 31.07.2025 | 01.08.2025 |
| RFx No. 3000059731 | Work of overhauling of M/s Kirloskar Pneumatic make HVAC compressors at GTPS, Uran. | 08.74 Lakhs<br>12,247/- | 22.07.2025 To 04.08.2025 | 05.08.2025 |
| RFx No. 3000059090 | Hiring of Hydra Crane of 12 MT capacity, JCB and Tipper on as and when required basis at GTPS, Uran | 05.95 Lakhs<br>9,459/- | 22.07.2025 To 04.08.2025 | 05.08.2025 |
| RFx No. 3000059097 | Work of servicing and repair of load hangers and supports of WHR boilers and Steam Turbine pipelines of B1 & B2 units at GTPS, Uran. | 14.25 Lakhs<br>17,759/- | 22.07.2025 To 04.08.2025 | 05.08.2025 |

Tender Cost Rs.1180/- for all tenders. Tender cost and EMD to be paid online only. Tenders are available for sale on our website from dt. **22.07.2025** for more details, pl. visit our website https://eprocurement.mahagenco.in. Contact Details:- EE (P&C) - 91-9167007841.

Vendors are requested to register their firms for E-Tendering, Please log on to our website **https://eprocurement.mahagenco.in**

**Sd /-**
**Chief Engineer**
**GTPS Uran**

## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जिल्हा - रायगड, पनवेल - ४१०२०६.
कार्यालय :- २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं:- ०२२- ७४५२२३३
ई मेल:- panvelcorporation@gmail.com

जा.क्र. पमपा/ जनसंपर्क./३१२५/प्र.क्र.३४२/३५२/२०२५ दिनांक :- २१/०७/२०२५

**PANVEL MUNICIPAL CORPORATION**
**TENDER**
**SOLID WASTE MANAGEMENT DEPARTMENT**
**PMC/SWM/2525/SR.NO.76/453/2025**

Tender Notice for the work of Applying wall painting and writing slogans on public walls in panvel municipal corporation area.

| Sr. No. | PMC Stage | Vendor Stage | Start Date & Time | Expiry Date & Time |
|---|---|---|---|---|
| 1. | Release of Tender | -- | 22/07/2025, at 3.00 Pm | 29/07/2025, at 3.00 Pm |
| 2. | | Pre bid meeting | 24/07/2025 at 12:00 Pm | |
| 3. | -- | Tender Download & Bid Preparation | 22/07/2025, at 3.00 Pm | 29/07/2025, at 3.00 Pm |

Panvel Municipal Corporation
E-Tendering website https://mahatenders.gov.in

- Estimated cost of Work: Rs. 8,72,25,862/-
- Earnest Money: Rs. 4,36,129/- (Payable through online payment gateway by Debit/Credit Card of any Bank or by Net Banking from bidders/ Agencies bank account only, in favor of Panvel Municipal Corporation. Online receipt for the same should be uploaded with the technical documents. Fixed EMD is notconsidered for any tender.)
- Cost of each tender form: Rs. 3540/-(3000/- + 18% GST) (through online payment gateway by Debit/Credit Card of any Bank or by Net Banking from bidder/ Agencies Bank Account only, in favour of Panvel Municipal Corporation. Online EMD Receipt Should uploaded with Technical Document)
- Period of work: 2 years

संदर्भ :- जा.क्र. पमपा/घकवि/२५२५/प्र.क्र.७६/४५४/२०२५
दिनांक :- २१/०७/२०२५ रोजीचे पत्रान्वये.

**Sd/-**
**Additional commissioner**
**Panvel municipal corporation**

## मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ (म्हाडाचा घटक)

म्हाडा MHADA

### निविदा सुचना

कार्यकारी अभियंता ई- १ विभाग, मुं. इ. दु. व पु. मंडळ, यांच्या कार्यालयामार्फत खालील दर्शविलेल्या इमारतीच्या दुरूस्ती कामाकरीता म्हाडा / मुं.म.पा./ सा.बां. विभाग/ कें. सा.बां.वि./ रेल्वे / बीपीटी, अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांचेकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र बी - १ ( टक्केवारी दर) निविदा मागविण्यांत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम | इसारा रक्कम १% | सुरक्षा अनामत ५०% सुर्वातीस ५०% चालू देयकातून | कोऱ्या निविदेची रक्कम (विना परतावा) (जीएसटी सह) | कोऱ्या निवीदा विकीची तारीख व वेळ | मोहरबंद निविदा स्विकृतीची तारीख व वेळ | काम करावयाचा कालावधी | ठेकेदाराचा नोदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | इमारत रोड, क्र. ३९- सी, म्हातारपाखडी , माझगाव, मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणे (ई - ५८८१ (३) ( मंडळ निधिचे काम ) ( ३ री बोली) | १,८५,१४१/- | १८५१/- | 2000/-<br>2000/- | २३६/- | २४/०७/२०२५ ते २८/०७/२०२५ सकाळी ११ ते दुपारी १.०० | ३१/०७/२०२५ ते ०५/०८/२०२५ सकाळी ११ ते दुपारी १.०० | ०४ महिने | वर्ग - ९ व त्यावरील |
| २ | इमारत क्र. ११४ सी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणे (ई - ७५८८ (३) (मंडळ निधिचे काम) | २,६४,४८०/- | २६४५/- | 3000/-<br>3000/- | २३६/- | | | ८ महिने | वर्ग - ९ व त्यावरील |
| ३ | इमारत क्र. २८०-२८० ए, रे रोड, माझगांव, माझगाव, मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणे (ई - ५३६०) ( मंडळ निधिचे काम ) | २,८५,८०३/- | २८५८/- | 3000/-<br>3000/- | २३६/- | | | ८ महिने | वर्ग - ९ व त्यावरील |
| ४ | इमारत क्र. २ - ए म्हातारपाखडी रोड, माझगाव, मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणे (ई -५८०२ (२) ( मंडळ निधिचे काम) (३री बोली) | ४,८६,००९/- | ४८६०/- | 5000/-<br>5000/- | ५९०/- | | | १० महिने | वर्ग-८ व त्यावरील |
| ५ | इमारत क्र. ३९-४५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणे (ई - ७४६२) ( मंडळ निधिचे काम ) ( ३ री बोली) | ६,०४,५७३/- | ६०४६/- | 6500/-<br>6500/- | ५९०/- | | | १५ महिने | वर्ग-७ व त्यावरील |
| ६ | इमारत क्र. ३३ - ए सिग्नल एवेन्यु हाऊस डिलिमा स्ट्रीट, माझगाव, मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणे (ई - ६३५८(1A) (मंडळ निधिचे काम ) (३ री बोली) | ८,६०,८३२/- | ८६०८/- | 8600/-<br>8600/- | ५९०/- | | | १५ महिने | वर्ग -७ व त्यावरील |
| ७ | इमारत क्र. ११४ जी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणे (ई - ७५८८ (३) (मंडळ निधिचे काम) | ९,७७,७७७/- | ९७७८/- | 10000/-<br>10000/- | ५९०/- | | | १५ महिने | वर्ग-७ व त्यावरील |
| ८ | इमारत क्र. १ बी. म्हातारपाखडी रोड माझगाव,मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणे (ई - ५२१९(१) (मंडळ निधिचे काम ) ( ३ री बोली) | ९,९४,४४५/- | ९९४४/- | 10000/-<br>10000/- | ५९०/- | | | १५ महिने | वर्ग-७ व त्यावरील |


१. जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्यून्तम देकर सादर करणाऱ्यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम निविदा उघल्याचा दिनांकापासून ८ दिवसांच्या आत भरली नाहीतर द्वितीय नूनतम देकाराच्या निविदाकास लेखी विचारणा करुन त्यानी प्रथम न्यूनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असले तर त्याची निविदा मूंजर केली जाईल. अतिरिक्त सुरक्षा अनामत बाबत सविस्तर निविदा सुचना पहावी
२ कोऱ्या निविदा म्हाडा / मुं.म.पा./ सा.बां. विभाग / कें. सा.बां.वि./ रेल्वे / बीपीटी, अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांच्याकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र वर्गात असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्या, पॅन कार्ड व पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मिळू शकतील.
३. म्हाडाकडे नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदारांनी निविदा भरतांना ते कुठल्याही सरकारी / निमसरकारी संस्थेमध्ये काळ्या यादीत नांव समाविष्ठ नसल्याचे नोटरी पुढील शपथपत्र सादर करावे.
४. निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले सादर करावे
५. इसारा रक्कम फक्त राष्ट्रीयकृत / शेडयुल बँकेच्या १ वर्षाच्या अल्प मुदतीची अनामत राशी मुख्य लेखाधिकारी, मुं. इ. दु. व पु. मंडळ यांच्या नांवावर द्यावी.
६. कोऱ्या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता ई - १ विभाग, मुं. इ. दु. व पू. मंडळ, इ. क्र. ३४, तळ मजला, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई - ३३ यांचेकडून रकाना क्र. ६ मध्ये विहीत केलेल्या दिनांक व वेळेप्रमाणे कोऱ्या निविदांची विक्री केली जाईल व सिलबंद निविदा याच कार्यालयात रकाना क्र. ७ प्रमाणे स्विकृती केली जाईल. तसेच स्विकृती केलेल्या मोहरबंद निविदा शक्य झाल्यास रकाना क्र. ७ मधील शेवटच्या दिवशी कार्यकारी अभियंता ई-१ विभाग, मुं. इ. दु. व पु. मंडळ, यांच्या कार्यालयात संध्या २.३० वा. नंतर उघडल्या जातील.
७. संयुक्त बोलीदाराची बोली स्विकारली जाणार नाही.
८. एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्यांचे अधिकार सक्षम अधिकाऱ्यांकडे ठेवण्यांत येत आहे.
९. निविदा स्विकृतीच्या दिनांकाच्या शेवटच्या दिवसापासून ३ महिने किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीपर्यंत कंत्राटदाराचे नोंदणी प्रमाणपत्र ग्राह्य असले पाहिजे अन्यथा त्या कंत्राटदाराचा विचार केला जाणार नाही.
१०. भाडेकरु / रहिवाशी यांनी ना हरकत प्रमाणपत्राद्वारे संरचनात्मक दुरुस्तीसाठी किंवा पुनर्विकासासाठी प्रस्ताव दाखल केल्यास ठेकेदारास जरी देकारपत्र/आदेश देण्यात आले असतील तरी कुठल्याही नुकसानीबद्दल हक्क किंवा दावा ग्राह्य धरण्यात येणार नाही.
११. मागविण्यात आलेली निविदा सन २०२० - २१ च्या एसएसआर वर आधारीत असून त्यामध्ये जीएसटी अंतर्भूत नाही. जी. एस. टी. ची अदायगी स्विकृत करारनामा मुल्यावर होईल.
१२. जीएसटी अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे .

CPRO/A/ 597

**सही/-**
**कार्यकारी अभियंता ई-१ विभाग,**
**मुं. इ. दु.व पु. मंडळे, मुंबई**

म्हाडा - गृहनिर्मान क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था    Follow us : mhadaofficial

स्वत:च्या अज्ञानाची जाणीव असणे, हीच ज्ञानाची पहिली पायरी आहे.



- स्वामी विवेकानंद

वृत्तमानस

मुंबई, मंगळवार, २२ जुलै २०२५

# हुशार मार्ग सापडला

प्लास्टिकचे कचऱ्याचे विघटन होत नाही. त्यामुळे नदी-नाले तुंबतात, शहरांमध्ये पूरस्थिती निर्माण होते. त्यावर मात करण्यासाठी प्लास्टिक वापरावर बंदी आणण्याचे प्रयत्नही फारसे यशस्वी होताना दिसत प्लास्टिकचा वापर विधायक पद्धतीने करण्यासाठी जगभरात विविध प्रयोग केले जात असून रस्त्यांच्या उभारणीत प्लास्टिकचा वापर करणे हा त्याच प्रयत्नांचा एक भाग आहे. डांबरात प्लास्टिकचा वापर केल्याने अशा मिश्रणापासून तयार झालेला रस्ता टिकाऊ, मजबूत असून, अनेक वर्षे वापरायोग्य राहतो. प्लास्टिकमुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याच्या निर्मूलनासाठी हा उत्तम आणि फायदेशीर पर्याय ठरत आहे. देशभरात विविध राज्यांमध्ये रस्त्यांसाठी प्लास्टिकचा वापर सुरू झाला आणि विविध प्रकारच्या तापमानामध्ये तो यशस्वीही झाला. हिमाचल प्रदेशात पावसाचे प्रमाण अधिक असते. तेथे दरवर्षी पावसामुळे रस्त्यांची होणारी दुर्दशा आणि खड्ड्यांवर उपाय म्हणून टाकाऊ प्लास्टिकपासून 112 किलोमीटरचे टिकाऊ रस्ते तयार करण्यात आले. पाण्यामुळे डांबराचे 90 टक्क रस्ते खराब होतात; मात्र प्लास्टिकच्या रस्त्यांवर पाण्याचा काहीही परिणाम होत नसल्याचे सिद्ध झाले. तेथे प्लास्टिक कचरा खरेदी करण्याची जबाबदारी नगरपालिका आणि महापालिकांवर सोपवण्यात आली. हिमाचल प्रदेश राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मदतीने, थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिमल्यात चार मोठे रस्ते प्लास्टिक कचऱ्याच्या वापराने बनवण्यात आले आहेत. त्यामुळे प्लास्टिकच उपयोग झाला, प्रदूषण टळले आणि प्लास्टिकचा विशिष्ट पद्धतीने वापर केल्याने उष्मा वाढवणाऱ्या वायूंच उत्सर्ग टळला असा दावा केला जात असून त्यात किती तथ्य आहे ही बाब तपासावी लागेल. परिणामी सिमल्यातील तापमानात फरक पडला असेही सांगितले जाते. हिमाचलच्या धर्तीवर दिल्ली आणि तामिळनाडूनेही प्लास्टिकचे रस्ते तयार केले. यामुळे रस्त्याची मजबुती तीन पट वाढते आणि प्रदूषणाचे संकटही टळते, असा दावा केला जात आहे. गेल्या काही काळात मुंबई व ठाण्याचे तसेच अन्य शहराचे वाढत तापमान हा चिंतेचा विषय असताना हा पर्याय जर फायदेशीर ठरत असले तर त्याचा वापर करण्यास काहीही हरकत नाही असा अनेक तज्ञ दावा करतात. अर्थात त्याची खात्री तपासावी लागेल. प्लास्टिकच्या एकदा केलेल्या रस्त्याला किमान पाच वर्षे दुरुस्ती करावी लागत नाही. वाया जाणारे प्लास्टिक महिला बचत गटांकडूनही खरेदी केला जावू शकतो. बचत गटाच्या महिला 30 किलो दराने गावातून प्लास्टिक गोळा करतील असे सांगितले जाते. डांबर सध्या खूप महाग झाले आहे. त्या तुलनेत प्लास्टिक स्वस्त दरात उपलब्ध होईल. बचत गटांनी गोळा केलेल्या प्लास्टिकचा वापर रस्ते बांधणीसाठी करता येईल. हे प्लास्टिक बचत गटांकडून बाजारभावापेक्षा जास्त किमतीने खरेदी करून ते सरकारला रस्तेबांधणीसाठी वापरता येईल. त्यामुळे पर्यावरणाचे संवर्धन आणि बचत गटांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे सहज शक्य होणार आहे. केंद्र सरकारच्या वाहन धोरणामुळे प्रदूषण कमी होऊ शकते. कमी खर्चात या क्षेत्राची उत्पादन क्षमता वाढेल. वाहने जुनी झाल्यावर त्यातून मिळणाऱ्या भंगारातील काही वस्तूंचा वापर रस्ते निर्मितीसाठी करण्यात येईल का हे सुद्धा पाहावे लागेल. रस्ते डांबरापासून, सिमेंट काँक्रिटपासून तयार केले जातात. डांबर, जो प्रत्येकाला परिचित आहे, त्यात शेल, कोळसा आणि तेल यांसारख्या खनिजांपासून मिळवलेल्या रेव, वाळू आणि बिटुमन यांचा समावेश होतो. ही सर्व संसाधने वर्षानुवर्षे अधिकाधिक कमी होत आहेत, अधिकाधिक महाग होत आहेत. त्यामुळेच डांबर, सिमेंट काँक्रिटचे रस्ते तयार करण्यासाठी येणारा खर्च अधिक असतो. हे रस्ते दीर्घकाळ टिकतही नाहीत. मात्र लवकरच देशात टायर आणि प्लास्टिकचे रस्ते दिसू लागतील. त्यासाठी केंद्र सरकार काम करत आहे. देशातल्या प्रत्येक जिल्ह्यात दोन-तीन स्क्रैपिंग सेंटर उघडण्याची सरकारची योजना आहे. वाहन स्क्रैपिंग युनिटमध्ये, स्क्रैप केलेल्या वाहनांमधील स्टील आणि प्लास्टिक काढून वेगळं केलं जातं. स्टील आणि प्लास्टिक वितळून त्याचा पुनर्वापर केला जातो. या धोरणाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे तांबे, स्टील, अँल्युमिनियम, रबर आणि प्लास्टिक सहज उपलब्ध होणार आहे. स्क्रॅपेज धोरणामुळे जुनी वाहने रस्त्यांवर येणार नाहीत. त्यामुळे प्रदूषण कमी होईल. नव्या वाहनांची मागणी वाढेल. त्यामुळे वाहन निर्मिती क्षेत्राला चालना मिळेल असा अंदाज आहे येणाऱ्या काही काळात स्क्रैपेज धोरण देशातील प्रत्येक जिल्ह्यात लागू होईल. जुन्या टायर्सचा वापर रस्ते निर्मितीसाठी करण्यासंदर्भात व्यापक चर्चा सध्या सुरू असल्याचे समजते. एकूणच या प्लास्टिकचा योग्य वापर करणे ही काळाची गरज आहे यात शंका नाही. प्लास्टिक पर्यावरणासाठी हानिकारक असले तरी याच प्लास्टिकचा वापर हा उत्तम रस्ते निर्मितीसाठी होत असल्याचे सिद्ध झाले असल्याने त्याबाबत अपेक्षित चर्चा करणे आवश्यक ठरते. याचा एक भाग म्हणून जिओसेल तंत्रज्ञानचा वापर करून राजधानी दिल्लीत प्लास्टिकचा रस्ता तयार केला जात असून भविष्यात ही योजना देशभर सुरू होऊ शकते असा अंदाज आहे. एका माहितीनुसार जगभरात सुमारे 8300 दशलक्ष टन व्हर्जिन प्लास्टिकचे उत्पादन झाले आहे. यापैकी फक्त 9 टक्के पुनर्वापर केले जाते आणि सुमारे 12 टक्के जाळले जाते आणि त्यामुळे एकूण 79 टक्के कचरा कचराभूमीत किंवा नैसर्गिक वातावरणात सोडला जातो. प्लास्टिक कचऱ्याच्या विल्हेवाटीच्या वाढत्या समस्येवर मात करण्यासाठी असंख्य अभ्यास आणि संशोधने झाली आहेत. पुढील काही वर्षांत रस्ते बांधणीसाठी प्लास्टिकचा वापर हा एक संभाव्य उपाय ठरला आहे. भारतात अंदाजे 16.5 दशलक्ष टन प्लास्टिक वापरले जाते. याव्यतिरिक्त, उद्योग संघटनानुसार, भारतातील 43 टक्के प्लास्टिक पॅकेजिंगमध्ये वापरले जाते आणि ते एकदाच वापरता येणारे प्लास्टिक आहे. परिणामी, भारतात उत्पादित होणाऱ्या एकूण प्लास्टिकपैकी जवळजवळ 80 टक्के प्लास्टिक टाकून दिले जाते. त्यातील काही प्लास्टिक जाळले जाते ज्यामुळे वायू प्रदूषण होते, ते लँडफिलमध्ये जाते किंवा नाले बंद होतात. ते प्लास्टिक पिशव्या खाणाऱ्या प्राण्यांना गुदमरते. शेतात आढळणारे प्लास्टिक उगवण रोखते आणि पावसाचे पाणी शोषण्यास प्रतिबंध करते. जगभरातील देश प्लास्टिक कचऱ्याच्या समस्येशी झुंजत आहेत. जैवविघटन न होणारे प्लास्टिक वन्यजीवांना हानी पोहोचवते, महासागर प्रदूषित करते आणि लँडफिल भरते. तथापि, सिंगापूरने प्लास्टिक कचऱ्याचे रस्ते बनवून या समस्येवर मात करण्याचा एक हुशार मार्ग शोधला आहे. देशभरात मोठ्या प्रमाणात प्लास्टिकचा कचरा निर्माण होत असतो. गेल्या काही वर्षांत प्लास्टिक कचऱ्याच्या समस्येने उग्र रूप धारण केले आहे. भारतात दररोज सुमारे 26 हजार टन प्लास्टिक कचरा तयार होतो. हा कचरा 4300 हत्तींच्या वजनाएवढा आहे असे सांगितले जाते. त्यापैकी सुमारे 40 टक्के कचरा जमवलाही जात नाही अथवा त्यावर पुनर्वापरासाठी प्रक्रियाही केली जात नाही, तो जमिनीवर पडून राहतो. दररोज जमा होणाऱ्या हजारो टन प्लास्टिक कचऱ्याची विल्हेवाट लावणे हे एक आव्हान आहे. मात्र प्लास्टिक पासून रस्ते बनवण्याचा उपक्रमामुळे हे आव्हान कमी होऊ शकते. त्यामुळे प्लास्टिकच्या विल्हेवाटाचे आव्हान देशासमोर उभे असतानाच रस्ते तयार करण्याचा उपक्रम फायदेशीर ठरणार आहे.

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्ष सर्वसामान्यांचा आधार

मा.मुख्यमंत्री कार्यालयातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडून अनेक दुर्धर आजारांवरील उपचारांसाठी येणाऱ्या खर्चाकरीता रुग्णांना संबधीत रुग्णालयामार्फत अर्थिक सहाय्य देण्यात येते. या अनुषंगाने मदत मिळविण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामध्ये असंख्य अर्ज प्राप्त होतात सदर अर्जाचा पाठपुरावा करण्यासाठी रुग्ण व त्यांचे नातेवाईक मंत्रालयात येत असल्याने नागरीकांना या सेवा सहजपणे उपलब्ध व्हाव्यात याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून दि.01 मे 2025 रोजी औपचारिक उद्घाटन करुन सुरु करण्यात आलेला आहे.

यामुळे राज्यातील गरजू रुग्णांना उपचारासाठी प्रत्येक जिल्हयातच जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या माध्यमातून अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे आणि माहिती सहज उपलब्ध, संलग्न रुग्णालयाची यादी, अर्ज आणि पाठपुराव्यासाठी मंत्रालयात जाण्याची गरज नाही तसेच अर्ज स्विकृती व सध्यस्थिती इत्यादी मदत पुरवली जाणार आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी मिळवण्यासाठी लागणारे आवश्यक कागदपत्रे :-अर्ज (विहीत नमुन्यात), रुग्ण दाखल




असल्यास Geo Tag फोटो.3. वैद्यकिय खर्चाचे अंदाजपत्रक / प्रमाणपत्र मुळप्रत डॉक्टरांच्या सही व शिक्यासह (रुग्णालय खाजगी असल्यास जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष-वैद्यकीय अधिकारी, अधिष्ठाता, अधिक्षक, संबंधीत विषयातील प्राध्यापक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय) यांचेद्वारे प्रमाणित केलेले असावे. तहसिलदार कार्यालयाचा उत्पन्नाचा दाखला. (रु.1.60 लाखपेक्षा कमी उत्पन्न असणे आवश्यक आहे.) रुग्णाचे आधारकार्ड. (महाराष्ट्र राज्याचे) लहान बालकांसाठी आईच्या आधार कार्ड, संबंधित आजाराचे रिपोर्ट असणे आवश्यक आहे. रुग्णालयाची नोंद मुख्यमंत्री सहाय्यता निधी कार्यालयाच्या संगणक प्रणालीवर असल्याची खात्री करावी. अपघात असल्यास, FIR असणे आवश्यक आहे. अवयव प्रत्यारोपण असल्यास रुग्णालयाचे मान्यता प्रमाणपत्र अथवा ZTCC येथे नोंदणी केल्याची पावती जोडणे आवश्यक आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी मिळणाऱ्या आजारांची नावे :-कॉकलियर इम्प्लांट (वय वर्ष 2 ते 6), हृदय प्रत्यारोपण,. यकृत प्रत्यारोपण, किडणी प्रत्यारोपण, बोन मॅरो प्रत्यारोपण, फुफ्फुस प्रत्यारोपण, हाताचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, अपघात शस्त्रक्रिया, लहान बालकांचे शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायलिसिस, अपघात, कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन), नवजात शिशुंचे आजार, गुडघ्याचे प्रत्यारोपण, बर्न रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण

योजने संबंधित महत्त्वाच्या बाबी:-महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम RBSK, धर्मदाय रुग्णालये या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. मुख्यमंत्री सहाय्यता निधी मध्ये उपलब्ध सीमित निधीचा वापर करून वरील योजनांचा लाभ मिळू न शकणाऱ्या रुग्णांना लाभ देण्यात येतो.रुग्णालयातून रुग्ण डिस्चार्ज झाल्यामुळे त्याची शहानिशा करणे शक्य नसल्याने अशा रुग्णांना अर्थसहाय्य देणे शक्य नाही.

राज्याबाहेरील रुग्णालयांवर राज्य शासनाचे नियंत्रण नसल्यामुळे त्यांच्याकडून उपयुक्तता प्रमाणपत्र घेणे शक्य नसल्याने राज्याबाहेरील रुग्ण/रुग्णालयांसाठी अर्थसहाय्य करणे प्रतिबंधित करण्यात आलेले आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय समितीच्या शिफारशीनुसार 25000/-, 50000/-, 1 लाख व महत्तम 2 लाख पर्यंत आजारनिहाय मर्यादित रक्कम प्रदान करण्यात येते.

**संकलन**
**जिल्हा माहिती कार्यालय, रायगड-अलिबाग**

# महान पार्श्वगायक मुकेश

आज २२ जुलै, हिंदी चित्रपट सृष्टीतील महान पार्श्वगायक मुकेश यांची आज जयंती. २२ जुलै १९२३ रोजी मुकेश यांचा जन्म झाला. मुकेश यांचे संपूर्ण नाव मुकेश चंद माथूर असे होते. दिल्लीतील दारियागंज आणि चांदणी चौकात त्यांचे बालपण गेले. त्यांच्या वडिलांचे नाव जोरावर चंद माथूर असे होते ते इंजिनिअर होते तर आई राणी या गृहिणी होत्या. मुकेश यांना बालपणापासून संगीताची आवड होती. त्याकाळातील प्रख्यात गायक कुंदनलाल सहगल यांचे ते प्रशंसक होते. त्यांनाही कुंदनलाल सहगल यांच्याप्रमाणे अभिनेता व गायक व्हायचे होते त्यासाठी त्यांनी लहान वयातच त्यांची संगीताचे प्राथमिक धडे गिरवले. त्याकाळातील गाजलेले अभिनेते मोतीलाल यांनी मुकेश यांना त्यांच्या दूरच्या बहिणीच्या लग्नात गाताना पाहिले. "मुकेश यांचा आवाज ऐकता क्षणीच ते त्यांच्या आवाजाच्या प्रेमात पडले. एक दिवस हा आवाज हिंदी चित्रपट सृष्टिचा आवाज बनेल असे ते त्यांच्या आई वडिलांना म्हणाले. त्यांनी मुकेश यांना मुंबईत आणले आणि गायक पंडित जगन्नाथ यांच्याकडून गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेण्यास सांगितले. त्यांनीही गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतले.



या दरम्यान त्यांना काही चित्रपटात अभिनयाच्या ऑफर्स आल्या. मुकेश यांचा राजबिंडा चेहरा आणि स्मितहास्य यामुळे त्यांना थेट नायकाच्या भूमिका मिळाल्या. १९४१ साली निर्दोष या चित्रपटात त्यांनी पहिल्यांदा अभिनय केला. त्यानंतर चार पाच चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या मात्र त्यांनी अभिनय केलेले चित्रपट काही विशेष चालले नाही त्यामुळे नायक बनण्याचे आपले स्वप्न बाजूला ठेवून त्यांनी गायनावर लक्ष केंद्रित केले. गायक म्हणून मुकेश यांना पहिला ब्रेक मिळाला तो १९४५ साली आलेल्या पहिली नजर या चित्रपटात. या चित्रपटात त्यांनी गायलेले दिल जलता है तो जलने दो हे गीत खूप लोकप्रिय झाले. या गीतामुळे चित्रपट सृष्टित त्यांची ओळख निर्माण झाली. या गाण्यावर कुंदनलाल सहगल यांच्या शैलीचा प्रभाव होता. १९५८ साली आलेल्या यहुदी या चित्रपटातील ये मेरा दिवानापन है हे गाणे देखील खूप गाजले या गाण्याद्वारे त्यांनी स्वतःची वेगळी शैली निर्माण केली आणि कुंदनलाल सहगल यांच्या प्रभावातून ते बाहेर पडले. त्यानंतर हिंदी चित्रपट सृष्टित मुकेश युग सुरू झाले. त्यांनी अनुनासिक शैलीत गायलेले गाणे हिट होऊ लागले. मेला आणि अंदाज या चित्रपटात त्यांनी गायलेले सर्व गाणी लोकप्रिय झाले. अंदाज हिट झाल्यानंतर मुकेश रणजित नावाच्या स्टुडिओत गायनाचा रियाज करीत होते तेंव्हा तिथे एक देखणा तरुण आला आणि म्हणाला किती भावनाप्रधान आहे तुझा आवाज. मला तुझा आवाज खूप आवडतो. तो तरुण होता राज कपूर. पुढे राज कपूर आणि मुकेश हे हिंदी चित्रपट सृष्टीतील यशाचे समीकरण बनले. या जोडीने अनेक हिट गाणी दिले. आग, आवरा, श्री ४२०, बरसात, परवरिश, अनाडी, संगम, मेरा नाम जोकर या आर के बॅनरच्या चित्रपटातील मुकेश यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. राज कपूर यांचा आवाज अशीच मुकेश यांची ओळख निर्माण झाली.

राज कपूर यांच्या सत्यम शिवम सुंदरम या चित्रपटातल्या गाण्याचे रेकॉर्डिंग करून ते अमेरिकेला गेले होते. डेट्रॉय मिशिगन मध्ये २७ ऑगस्ट १९७६ रोजी ते लवकर उठून अंघोळीसाठी गेले असता अचानक त्यांच्या छातीत कळ आली आणि त्यांची प्राणज्योत मावळली. त्यांच्या निधनानंत राज कपूर यांनी आज माझा आवाज कायमचा हरपला! अशी प्रतिक्रिया दिली. मुकेश यांनी तीन दशकांहून अधिक काळ आपल्या अनोख्या गायन शैलीने रसिकांवर मोहिनी घातली. मुकेश यांचा दर्दभरा आवाज रसिकांच्या मनावर कायमचा कोरला गेला आज इतक्या वर्षानीही त्यांचा दर्दभरा आवाज रसिकांना मोहित करतो. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. रजनिगंधा या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला मात्र ते रसिकांच्या मनात त्यांचे जे स्थान आहे त्याला सर्व पुरस्काराहून श्रेष्ठ आहे मानत. त्यांच्यासारखा महान पार्श्वगायक पुन्हा होणार नाही. जयंतीदिनी मुकेश यांना भावपूर्ण आदरांजली!

- श्याम ठाणेदार
पुणे

# पत्र मानस

## गटारी नव्हे, 'दीप अमावास्या' !

श्रावण मासारंभाच्या आदल्या दिवशी म्हणजे आषाढ अमावास्येला अखेरचे मांसाहार आणि आणि दारू ढोसण्याची प्रथा गेल्या काही वर्षांपासून पडली आहे, काहींच्या मते या अमावास्येला 'गतहारी अमावास्या' म्हटले जाई म्हणून पुढे गतहारी शब्दाचा अपभ्रंश म्हणून 'गटारी' नाव प्रचलित झाले. गटारी या नावाला कोणताही शास्त्राधार नाही त्यामुळे हा हिंदु धर्मातील सण किंवा उत्सव नाही, तर ती केवळ एक अनिष्ट प्रथा आहे. हिंदु धर्मात आषाढ अमावास्या ही 'दीप अमावास्या' म्हणून प्रचलित आहे. या दिवशी घरातील सर्व समया, निरांजने, दिवे स्वच्छ धुऊन पुसून सभोवती रांगोळी काढून पाटावर त्यांना आसनस्थ केले जाते. दिवे प्रज्वलित करून त्यांची मनोभावे पूजा केली जाते. त्यांना पक्वानांचा नेवैद्य दाखवला जातो. 'तमसो मा ज्योतीर्गमय' म्हणजे अंधारातून प्रकाशाकडे वाटचाल करण्याची महान शिकवण दीप आपल्याला देत असतो. दीपच नसता तर मानवाचे जीवन अंधकारमय झाले असते त्यामुळे दिव्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस आहे. काळाच्या ओघाने आणि भारतीयांवरील पाश्चिमात्यांच्या प्रभावामुळे या सणावर भोगवादाचे सावट आले, परिणामी सध्याच्या ३ पिढ्यांपैकी अनेकांना या दिवसाचे खरे महत्व ज्ञात नाही. किमान नव्या पिढीला तरी आषाढ अमावास्या ही गटारी अमावास्या नसून दीप अमावस्या आहे याविषयीची माहिती ती योग्यरीत्या साजरी करूनच देऊया.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

## संसदेचे पावसाळी अधिवेशन वादळी होण्याऐवजी लोक हिताचे व्हावे

लोकसभेचे संसदेचे पावसाळी अधिवेशन गोंधळी,वादळीअधिवेशन होण्याऐवजी लोक हिताचे व्हावे अनेक प्रश्न व्यवस्थित मांडुन त्याची उकल करण्यासाठी पाठपुरावा करावा. देशासमोर अनेक समस्या "आ "वासून आहेत. पंतप्रधान मोदींचे परदेश दौरे हा एक रेकॉर्ड ब्रेक विषय असु शकतो. जनतेलाही कळुन यायला हवे.पावसाळी अधिवेशन सुरु झालेले आहे.पूर्व नियोजित मोदी यांचा 23 ते 26 जुलै 2025 पर्यंत परदेश दोरा आहे. खरं तर अधिवेशन काळात परदेश दौरे उचित नाही. देशासमोर अनेक प्रश्न असताना मुख्य नेताच सभागृहाच्या बाहेर असणे हे गांभीर्याने घेतले पाहिजे. ऑपरेशन सिन्दुर हा प्रश्न देशाच्या दृष्टीने महत्वाचा विषय आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बेरोजगारी, महागाई, ईपिएस 95 निवृत्त कामगार यांचे वाढीव पेन्शनचा प्रश्न, देशातील कामगारांच्या समस्या व मागण्या , महिलांवरील अत्याचार, गुन्हेगारी, भाषिक वाद याकडे लोक प्रतिनिधीनी लक्ष वेधी सुचना यावर चर्चा व उपाय याकडे प्रशासनाचे लक्ष हवे आहे.

**- अनंत दत्ताराम दाभोळकर, अंधेरी**

## तंत्रज्ञान असावे मात्र त्याचा गैरवापर नको...

आपल्या देशाने विविध तंत्रज्ञानामध्ये साधलेली प्रगती निश्चितच कौतुकास्पद आहे त्यामुळे माणूस चंद्रावर जाण्याचे स्वप्न आगामी काळात पुर्ण करेल अशी शाश्वती वाटतं आहे तरीपण विघ्नसंतोषी लोक या तंत्रज्ञानाचा गैरवापर करत असल्याचे समोर आले आहे त्यामुळे याचा संपूर्ण देशवासीयांना फटका बसल्याशिवाय राहणार नाही सद्या सगळीकडे डीपफेक तंत्रज्ञानाबद्दल मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे डीपफेक म्हणजे बनावट घटनांच्या प्रतिमा, ऑडिओ,बनावट सामग्री तयार करणे असा होत असला तरी आज कोणीही उठतो आणि एखाद्याला डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर करून बदनाम करतो यातून राजकीय बडे नेते, अभिनेते, अभिनेत्री सुद्धा सुटलेले नाहीत हि विचार करायला लावणारी बाब आहे या तंत्रज्ञानाचे अनेकजण बळी पडले आहेत हे डीपफेक तंत्रज्ञान एखाद्या व्यक्तीची प्रतिमा मलिन करण्यासाठी सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे तंत्रज्ञानामुळे जग जरी जवळ आले असले तरी याचा गैरवापर होत असल्याने सगळ्यांचीच चिंता वाढली आहे त्यासाठी भारत सरकारने तंत्रज्ञान वापरण्यासाठी कडक नियमावली लागू करणे कधीही हिताचे ठरणारे आहे !

**- राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

## दोन शिफ्ट मध्ये काम करावे

मुंबईची लाईफलाईन असलेल्या मुंबई लोकल ट्रेनमधील गर्दी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. मुंबईच्या लोकलमधून रोज 68 लाख प्रवासी प्रवास करतात.त्यातील जास्तीत जास्त प्रवासी ठराविक वेळेला एकाच दिशेने प्रवास करीत असल्याने अफाट गर्दी होते.या वाढत्या गर्दीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहेत.मागील तीन वर्षात मुंबईच्या उपनगरातील रेल्वेमधील दुर्घटनांध्ये तब्बल ७ हजार ५६५ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे.रेल्वेला लोकलच्या संख्या वाढवण्यावर मर्यादा आहेत. कार्यालयांच्या वेळा बदलून रेल्वेमधील गर्दी कमी होण्याची शक्यता नाही. कार्यालयांच्या वेळा बदलण्याच्या दृष्टीने ब-याच वेळा अभ्यास झालेला आहे.

सरकारी, खासगी कार्यालये,बॅंका व शेअर बाजार दोन शिफ्टमध्ये काम केल्यास रेल्वेवरील बोजा कमी होईल. रेल्वेमधील गर्दी कमी हाईल. युवकांना नोक-या मिळतील. कार्यालय जास्त वेळ उघडी राहतील. आपल्या धारणक्षमतेपेक्षा कैकपटींनी अधिक प्रवासी वाहणाऱ्या मुंबई लोकल्सच्या सुधारणांचे अनेक प्रयत्न, अनेक चर्चा कित्येक वर्षं होत असले तरीही अपघात वाढतच आहेत. मुंबई शहरातील वाहतुकीची साधन वाढली पण त्या वेगाने शहर व शहराची लोकसंख्या वाढत असल्याने वेळेचे नियोजन करावे लागेल.

**- विवेक तवटे , कळवा ,ठाणे**

## गड-किल्यांचे पावित्र्य भंग होऊ देऊ नका !

श्रावण महिना हा हिंदू धर्मातील पवित्र महिना मानला जातो. या महिन्यात अनेक व्रतवैकल्ये येतात. श्रावण महिन्याला जोडूनच भाद्रपदात गणपती तर अश्विन महिन्यात नवरात्री येतात. या अडीच-तीन महिन्यांत अनेक जण मांसाहार ग्रहण करत नाहीत. त्यामुळे श्रावण महिना सुरु होण्याआधी गटारी(खरे नाव गतहारी) साजरी करण्याची प्रथा गेल्या काही वर्षांत पडली आहे. हा हिंदू धर्मातील कोणताही उत्सव किंवा सण नसला तरी दरवर्षी तो मांसाहारी जेवणावर आणि मद्यपानावर यथेच्छ ताव मारून साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्यासाठी कुठे जायचे याचे नियोजन तरुणवर्गाकडून १५ दिवस आधीपासूनच केले जाते. बऱ्याचदा ही कार्यक्रम करण्यासाठी एखादी निर्जन किंवा पुरातन जागा शोधली जाते. अनेकदा दुर्लक्षित असलेल्या पुरातन गडकिल्यांवर सुद्धा अशा पार्ट्या आयोजित केल्या जातात. आजमितीला काही हाताच्या बोटांवरील दुर्ग किल्ले सोडले, तर असे अनेक किल्ले आहेत ज्यांचा इतिहास आपणाला ठाऊकही नाही. असे असले तरी हे दुर्ग किल्ले म्हणजे आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाची साक्ष देणारे पुरावे आहेत. आपल्या एका पिढीने यासाठी आपले रक्त सांडले आहे, सर्व सुखांचा त्याग केला आहे ही बाब ध्यानात घ्यायला हवी. त्यामुळे त्याचे पावित्र्य जपणे, त्यांचा योग्य तो मान ठेवणे हे आपले आणि आपल्या नंतर येणाऱ्या पिढ्यांचे अलिखित कर्तव्यच आहे. पार्ट्यांसाठी गड किल्यांची निवड करणाऱ्या इतरांनाही वेळीच रोखून त्यांचे प्रबोधन करा !

**- मोक्षदा घाणेकर, काळाचौकी**

वृत्तमानस
ठाणे-रायगड
मुंबई, मंगळवार, २२ जुलै २०२५

## भिवंडी, मिराभाईंदरमध्ये शुक्रवारी पाणी नाही

**ठाणे :** ठाणे, मिरा-भाईंदर तसेच भिवंडी महापालिका क्षेत्रासह ग्रामीणच्या काही भागाचा पाणी पुरवठा मंगळवारऐवजी शुक्रवार, २५ जुलै रोजी बंद ठेवण्याचा निर्णय स्टेम प्राधिकरणाने घेतला आहे. मीरा-भाईंदर महापालिका क्षेत्रात जलवाहिनी तातडीच्या दुरुस्तीच्या पार्श्वभूमीवर पाणी कपात असून त्यात पाणी बंदमुळे आणखी टंचाईची समस्या निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. उदंचन केंद्रातील वीज मीटर बदलण्याचे तसेच जलवाहीनीची गळती बंद करण्याच्या कामासाठी हा पाणी पुरवठा बंद ठेवला जाणार आहे. ठाणे, मिरा-भाईंदर तसेच भिवंडी महापालिका क्षेत्रासह ठाणे ग्रामीणच्या काही भागात स्टेम कंपनीकडून पाणी पुरवठा करण्यात येतो. स्टेमच्या शहाड येथील अशुध्द जल उदंचन केंद्रावर वीज मीटर बदलण्याचे काम करण्यात येणार आहे. त्यासोबतच शहाड येथील अशुध्द जल उदंचन केंद्र येथील जल वाहिनीवर गळती होत असून त्याच्या दुरुस्तीचे काम करण्यात येणार आहे. या कामासाठी २२ जुलै रोजी ठाणे, मिरा-भाईंदर तसेच भिवंडी महापालिका क्षेत्रासह ठाणे ग्रामीणच्या काही भागाचा पाणी पुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय स्टेम प्राधिकरणाने घेतला होता.



## म ह त्वा चे

### मोबाईल सीमकार्ड बंद करून दोन लाखांची फसवणूक

**कल्याण :** कल्याण पूर्व भागात राहत असलेल्या आणि शहापूर तालुक्यातील खर्डी परिसरातील ठाणे जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षिका असलेल्या एका शिक्षिकेच्या मोबाईलचे सीम कार्ड परस्पर बंद करून या मोबाईलच्या माध्यमातून सायबर भामट्याने गेल्या आठवड्यात शिक्षिकेच्या राष्ट्रीयकृत बँक खात्यामधून टप्प्याने दोन लाख रूपये काढून घेऊन अपहार केला आहे. या शिक्षिकेने या फसवणूक प्रकरणी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे.
अनिता खाडे असे फसवणूक झालेल्या शिक्षिकेचे नाव आहे. त्या कल्याण पूर्वेतील देवळेकरवाडी भागात कुटुंबीयांसह राहतात.

### ठाणे स्थानकातील प्रतिक्षालयाच्या जागेत कॅफेटेरिया

**ठाणे :** ठाणे रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक दोनवरील प्रतिक्षालयामध्येय प्रतिक्षालयासह कॅफेटेरिया सुरु करण्यात आला. पूर्वी या जागेत केवळ प्रतिक्षालय होते. कॅफेटेरिया सुरु झाल्याने आता अर्ध्या जागेत प्रतिक्षालय आणि अर्ध्या जागेत कॅफेटेरिया असेल. या कॅफेटेरियात खाद्य पदार्थ, चहा, शीत पेय उपलब्ध होईल. या कॅफेटेरिया बाबत प्रवाशांमध्ये संमिश्र प्रतिक्रिया आहे. काही प्रवाशांनी प्रतिक्षालयाच्या जागेत कॅफेटेरिया सुरु केल्याने नाराजी व्यक्त केली. मध्य रेल्वे मार्गावरील सर्वाधिक गर्दीच्या रेल्वे स्थानकांपैकी एक ठाणे रेल्वे स्थानक आहे. या स्थानकातून दिवासाल पाच ते सहा लाखाहून अधिक प्रवासी प्रवास करतात. अनेकदा रेल्वेगाड्यांची वाहतुक विस्कळीत झाल्यावर प्रवाशांची या स्थानकात तुफान गर्दी होते. ठाणे रेल्वे स्थानकात एकूण १० फलाट आहेत.

# कल्याण न्यायालयात विजेचा खोळंबा

## वकिलांचा युक्तिवाद देखील फोनच्या टॉर्चमध्ये

प्रतिनिधी
■ कल्याण

कल्याण न्यायालयात सध्या एक विचित्र पण अत्यंत गंभीर स्थिती निर्माण झाली आहे. संपूर्ण न्यायालय विजेविना काम करत असल्याचे चित्र सोमवारी पहायला मिळाले. जवळपास साडेतीन हजार वकील कार्यरत असलेल्या या महत्त्वाच्या न्यायालयात तब्बल २१ न्यायदान कक्ष असूनही विजेचा पुरवठा नसल्यामुळे संपूर्ण यंत्रणाच ठप्प झाली होती. परिणामी तारखा देण्याव्यातिरिक्त कोणतेही कामकाज करता आले नसल्याचे वृत्त आहे.

१०-१२ वर्षांपूर्वी मिळालेला जनरेटर पूर्णतः निष्क्रिय ठरला आहे. या जनरेटरमध्ये इंधन कुणी टाकायचे ? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. या जबाबदारीच्या



अभावामुळे तो जनरेटर सडत पडला आहे. दुरूस्ती अभावी निष्क्रिय ठरलेल्या या जनरेटरच्या अभावामुळे न्यायालय अंधारात आहे. अशा परिस्थितीत पक्षकारांना न्याय कसा मिळणार ? वकिलांनी मोबाईलच्या टॉर्चच्या उजेडात आपले युक्तिवाद करायचे ? आणि न्यायाधीशांनी ते ऐकायचेही त्या अंधारातच ? हे न्यायाचे मंदिर आहे की व्यवस्थेचा उपहास ? असा सवाल उपस्थित करत कल्याण जिल्हा न्यायालय वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. प्रकाश जगताप यांनी अशी बिकट परिस्थिती निर्माण करणाऱ्या शासन/प्रशासनावर ताशेरे ओढले आहेत.

लोकशाहीचा स्तंभ असलेल्या न्यायपालिकेला आज लाईट मिळत नसेल तर आपण खरोखरच लोकशाहीत आहोत का ? हा केवळ वकिलांचा किंवा पक्षकारांचा नाही, तर प्रत्येक जागरूक नागरिकाचा प्रश्न आहे. तात्काळ वीज पुरवठा सुरळीत करावा. जनरेटरला इंधन पुरवठा करणारी यंत्रणा उभी करावी.

न्यायालयासाठी स्वतंत्र इन्फ्रास्ट्रक्चर फंड निर्माण करावा. या गंभीर परिस्थितीची उच्चस्तरीय चौकशी व्हावी, अशा मागण्यांसह अंधारात न्याय शोधणे म्हणजे अन्यायाला संधी देणे अनिवार्य असल्याचे मत ॲड. प्रकाश जगताप यांनी व्यक्त केले आहे.

# रस्त्याने चालताना पाय घसरला आणि व्यक्ती थेट उघड्या चेंबरमध्ये पडला

## डोंबिवली एमआयडीसीचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर

प्रतिनिधी
■ ठाणे

रस्त्याने चालताना पाय घसरून पडल्याने उघड्या चेंबरमध्ये पडून एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना कल्याण शीळ रोडवर घडली. या घटनेमुळे डोंबिवली एमआयडीसीचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे. बाबू धर्मा चव्हाण असे मयत व्यक्तीचे नाव आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. उघड्या चेंबर्सबाबत नागरिकांनी वारंवार तक्रार करूनही एमआयडीसी त्याकडे डोळेझाक करत आहे.





कल्याण पूर्वेकडील शीळ रोडवर टाटा नाका गांधीनगर परिसरातून रविवारी चालत असताना बाबू चव्हाण यांचा पाय घसरला. यामुळे ते शेजारी उघड्या असलेल्या चेंबरमध्ये पडले. यात त्यांच्या डोक्याला जबर मार लागला. नागरिकांनी एक व्यक्ती चेंबरमध्ये पडल्याचे पाहताच तात्काळ धाव घेत चव्हाण यांना बाहेर काढले. चव्हाण यांना तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. चव्हाण यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी रुग्णालयात गर्दी केली होती. याप्रकरणी एमआयडीसी प्रशासनाविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात 'ग्रीन गटारी'

## पर्यावरणवादी संघटनेने जंगलातून काढला शेकडो किलो कचरा



प्रतिनिधी
■ ठाणे

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान हे मुंबई आणि ठाणे शहराचे फुफ्फुस म्हणून ओळखले जाते. परंतु फेरफटका, पार्ट्यांसाठी जंगलात जाणाऱ्या नागरिकांकडून कचरा टाकला जातो. या कचऱ्यामुळे परिसंस्थेला धोका निर्माण होतो. त्यामुळे येऊर एनव्हायर्नमेंटल सोसायटी या संस्थेने पर्यावरणपूरक उपक्रम 'ग्रीन गटारी' साजरा करत शेकडो किलो कचरा जंगलातून बाहेर काढला. या मोहीमेत विविध महाविद्यालय, शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात जैवविविधता आहे. या जंगलात दुर्मिळ वृक्ष, प्राणी-पक्षी आढळून येतात. परंतु बेकायदेशीररित्या जंगलात प्रवेश करुन मद्यपींकडून जंगलामध्ये पार्ट्या केल्या जातात. पार्ट्या केल्यानंतर निर्माण होणारा कचरा जंगलामध्येच टाकला जात होता. त्यामुळे मद्यपींच्या प्रवेशाला प्रतिबंध घालण्यासाठी आणि प्रदूषण रोखण्यासाठी २०१५ मध्ये 'ग्रीन गटारी'ची सुरुवात झाली होती. यावर्षी ग्रीन गटारीच्या ११ वा वर्धापनदिन होता. त्यानिमित्ताने १९ जुलैला बोरीवली येथे तर २१ जुलैला येऊरच्या जंगलात विविध प्रशासकीय संस्था व महाविद्यालये यांच्या मदतीने ग्रीन गटारी मोहीम आखण्यात आली.

या वर्षी वनभ्रमंतीनंतर येऊर येथील प्रमुख भेंडीनाला येथे सखोल स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. ए. पी. शाह इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधील ५० विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी सहभाग घेतला होता. ठाणे महापालिका, वन विभागाच्या सहकाऱ्याने ही मोहीम पार पडली. तर बोरीवली येथे फॉर फ्युचर फाउंडेशन, गो ग्रीन्स फाउंडेशनमधील स्वयंसेवी आणि पाटकर महाविद्यालयाच्या विद्यार्थांनी सहभाग घेतला होता.

# आदिवासी भागातील माध्यमिक विद्यालयांना अनुन्या व अझीम प्रेमजी फाऊंडेशनतर्फे मदतीचा हात

■ शहापूर

ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील अंदाड येथे अनन्या फाऊंडेशन व अझीम प्रेमजी फाऊंडेशन यांच्या माध्यमातून विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येणार असून तेथील मूलभूत समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे. शहापूर तालुक्यातील शाळांसाठी अनन्या फाऊंडेशन आणि अझीम प्रेमजी फाऊंडेशन अंतर्गत शिक्षण परिषद व मुख्याध्यापक सहविचार सभा संपन्न झाली. यावेळी अझीम प्रेमजी फाऊंडेशनच्या प्रमुख एलिना डिसोझा, फातिमा सत्तार मुल्ला, अनन्या फाऊंडेशनच्या प्रमुख ऍना उषा अब्राहम तसेच 30 शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते.



यावेळी ऍना, फातिमा व एलीना यांनी प्रमुख विषयांवर मार्गदर्शन केले. शिक्षण परिषदेत पाणी समस्या व विद्यार्थ्यांचे आरोग्य, बालकांचे कुपोषण ग्रामीण भागतील समस्या, शाळेतील मुख्याध्यापकांना भेडसावणाऱ्या समस्या, पालकांची शिक्षणविषयक मानसिकता, विद्यार्थ्यांना देणगीतून मिळणाऱ्या शैक्षणिक साहित्याची उपलब्धता अनन्या फाऊंडेशनकडून विद्यार्थ्यांना मिळणारे मध्यान्ह भोजन या विषयांवर चर्चा करण्यात आली तसेच विविध उपक्रम घेण्याचे निश्चित करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री देसले यांनी केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभारप्रदर्शन अंदाड येथील शाळेच्या मुख्याध्यापिका सौ दीपिका विशे यांनी केले. श्री सूर्यवंशी, श्री मिलिंद मोगरे यांनी सहकार्य केले.

# दीड कोटींचे एमडी ड्रग्स जप्त

■ ठाणे

मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या मोठ्या शहरामध्ये मागील काही दिवसात एमडी ड्रग्स आढळून आले आहे. हे सर्व ड्रग्स जप्त करण्याची कारवाई पोलिसांकडून करण्यात आली होती. यानंतर आता ठाणे शहरात देखील कारवाई करण्यात आली असून या कारवाईत तब्बल १ कोटी ६९ लाख २६ हजार रुपयांचे एमडी ड्रग्स जप्त करण्यात आले आहे.

ठाणे पोलिस आयुक्तालय परिक्षेत्रामध्ये अंमली पदार्थांच्या सेवांमध्ये तसेच विक्रीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने तरुण पिढी या अंमली पदार्थांच्या आहारी जाताना दिसत आहे. या अंमली पदार्थांच्या सेवन व विक्रीवर तसेच नशामुक्त तरुण पिढी करण्याच्या अनुषंगाने ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी सर्व विभागांना आदेश देत कारवाईचे निर्देश दिले होते.

# चार दिवसात 13 कोटी जमा

## अभय योजनेचा लाभ घेण्याचे आयुक्तांचे आवाहन



प्रतिनिधी
■ पनवेल

मालमत्ता करांवरील शास्तीमध्ये सवलत देत पनवेल महापालिकेने दिनांक 18 जुलै पासून ते 20 सप्टेंबर या कालावधीकरीता 'अभय योजना' विविध टप्प्यामध्ये लागू केली आहे. या योजनेचा नागरिकांनी लाभ घेऊन आपला मालमत्ता कर पुर्ण भरावा असे आवाहन पनवेल महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी केले होते.या आवाहनाला महापालिका कार्यक्षेत्रातील चा प्रचंड प्रतिसाद दिसून येत आहे. अवघ्या चार दिवसात पालिकेच्या तिजोरीत 13 कोटी 16 लाख मालमत्ता कर जमा झाला आहे.

येत्या काळामध्ये महानगरपालिकेने अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले आहेत. विविध विकास कामांमध्ये प्रस्तावित कामांमध्ये नवीन मुख्यालय बांधणे, मच्छी मार्केट, बहुमजली वाहनतळ, शाळा ,दैनिक बाजार, प्रभाग कार्यालये 'हिरकणी' हे माता व बाल संगोपन रूग्णालय-सर्व समावेशक ४५० बेडचे हॉस्पीटल उभारत आहे. या सर्व प्रस्तावित कामांसाठी मालमत्ता कर हा प्रमुख स्त्रोत आहे. त्यामुळे मालमत्ता कर भरून महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. शास्ती सवलत अभय योजना थकीत मालमत्ता करांवरील शास्तीमध्ये सवलत देण्याबाबत अभय योजनेमध्ये चार महत्वाचे टप्पे आहेत. यामध्ये प्रामुख्याने 18 जुलै ते 15 ऑगस्ट 2025 या कालावधीत संपूर्ण मालमत्ताकर एकरकमी भरल्यास शास्तीमध्ये 90 टक्के सूट मिळणार आहे. त्यामुळे मालमत्तांधारकांनी या संधीचा लाभ घेऊन लवकरात लवकर आपला पुर्ण मालमत्ता कर भरावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

# ठाण्यात ऑनलाईन शिक्षक बदली प्रक्रीया सदोष

## मंजुरपदापेक्षा जास्त शिक्षकांची नेमणुक

■ ठाणे

राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत जिल्हा परिषद शाळा मधील शिक्षकांच्या ऑनलाईन बदली प्रक्रिया सुरू आहे. मात्र, हि प्रक्रीया सदोष असल्यामुळे त्याचा फटका अनेक दुर्धर आजारी, दिव्यांग तसेच इतर शिक्षकांना बसल्याचे समोर आले आहे. अनेक शाळांमध्ये मंजुर पदांपेक्षा जास्त शिक्षकांच्या नेमणुका करण्यात आल्या असून यामुळे या जास्त नेमणुकांमुळे अनेक शिक्षक अतिरिक्त ठरल्याने ते पुन्हा बदलीस पात्र ठरत आहेत. या सर्व प्रकारामुळे शिक्षकांमधून संताप व्यक्त होऊ लागला आहे. या विरोधात न्यायालयात दाद मागितली जाईल, असा इशारा शिक्षक संघटनेने दिला आहे.

राज्य शासनाने जिल्हा परिषद शिक्षकांच्या ऑनलाइन बदली प्रक्रिया राबविण्याचे कंत्राट ''विन्सी' या खाजगी सॉफ्टवेअर कंपनीला दिले आहे. या कंपनीकडून शिक्षकांना मार्गदर्शन करताना शाळांमध्ये मंजूर पदसंख्या विचारात घेऊन शिक्षकांच्या बदल्या केल्या जाणार असल्याचे स्पष्ट केले होते.

# कोकण युवा प्रतिष्ठानकडून कोकणरत्नांचा सन्मान

■ डोंबिवली

कोकण भूमी प्रतिष्ठानच्या संजय यादवराव व इतर मान्यवरांना कोकण युवा प्रतिष्ठानच्यावतीने कोकणभूषण पुरस्कार प्रदान करून डोंबिवलीत गौरविण्यात आले.

यावेळी साहित्य अकादमी युवा पुरस्कार विजेते प्रदीप कोकरे, दिग्दर्शक, लेखक राजेश देशपांडे (कला), रोहित शर्माचे प्रशिक्षक दिनेश लाड (क्रीडा), शैलेंद्र शिर्के (पत्रकारिता), अजय आयरे (उद्योग), संदीप परटवलकर (शिक्षण), पोलिस सेवेतील मनिष शिंदे (शौर्य), काजूची नवी जात विकसित करणाऱे अमर खामकर (कृषी), श्रध्दा कळंबटे (सामाजिक) यांनाही कोकणरत्न पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात आले. डोंबिवली येथील मराठा मंदिर संस्थेच्या सभागृहात झालेल्या शानदार कार्यक्रमात राजापूर-लांजा तालुका नागरिक संघाचे अध्यक्ष सुभाष लाड, शिव प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुहास चव्हाण यांच्या हस्ते हे पुरस्कार वितरीत करण्यात आले. यावेळी उद्योजक सुनील नारकर, मंदार हळबे, राहुल कामत उपस्थित होते. यावेळी सीए परीक्षेत देशात तिसरा आलेल्या शार्दूल विचारे यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. माजी विश्वस्त श्रीराम चाळके यांचाही सन्मान करण्यात आला.

यावेळी आषाढी एकादशीनिमित्त मराठा मंदिरच्या सभागृहात भव्य संगीत भजनोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. दोन दिवस चाललेल्या या भजनोत्सव स्पर्धेत ३१ भजन मंडळांनी सहभाग घेतला. २१ पुरुष भजन मंडळ आणि १० महिला मंडळांचा यात समावेश होता. यावेळी परीक्षक म्हणून छाया गद्रे, मंदार दीक्षित, सौरभ करडीकर यांनी तर भजनोत्सवाचे स्पर्धाप्रमुख म्हणून रोशन मोरे, सच्चिदानंद हांदे यांनी काम पाहिले. संस्थेचे संस्थापक धनंजय चाळके यांनी प्रास्ताविक केले. सचिव विराज चव्हाण, खजिनदार रोहन मोरे यांनी आभार मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनेश मोरे यांनी केले.

# महापालिकेचा आपत्ती व्यवस्थापन कक्षाची उल्लेखनीय कामगिरी

## गेल्या दोन महिन्यात 1100 घटनेत नागरिकांच्या मदतीला

■ ठाणे

पावसाच्या दोन महिन्यांत ठाण्यात निसर्ग कोसळला... झाडं मोडली, रस्त्यावर ऑईल पडले, आगी भडकल्या, रस्ते जलमय झाले, भिंती खचल्या, आणि संकटांच्या सावलीत सामान्य माणूस अडचणीत आला. पण या प्रत्येक संकटाच्या मागे एक 'न दिसणारा हात' होता. ठाणे महापालिकेचा आपत्ती व्यवस्थापन कक्षाचा मे ते जुलै या कालावधीत या कक्षाच्या फोनवर सुमारे ११०० मदतीसाठी कॉल आले.

या अडीज महिन्यांत ठाण्यात ३०० पेक्षा अधिक झाडे उन्मळून पडली, २०० हून अधिक फांद्या तुटल्या, तर ७५ ठिकाणी आगीच्या घटना घडल्या. कुठे पाणी तुंबलं, कुठे स्लॅब कोसळला, कुठे गॅस गळला, तर कुठे झाडावर अडकलेल्या पक्ष्यानंसाठी मदतीची हाक आली. पण यातील एकही कॉल दुर्लक्षित झाला नाही. आपत्ती व्यवस्थापनाच्या पथकाने प्रत्येक ठिकाणी हजर राहून मदतीचा हात पुढे केला.

> या कक्षात काम करणारे कर्मचारी कोणत्याही वेळेला, कोणत्याही परिस्थितीत धाव घेतात. कधी रात्रीचा फोन, कधी मुसळधार पावसात धाव, कधी आगीच्या धुरात प्रवेश, तर कधी अडकलेल्या पक्ष्याला वाचवण्यासाठी रोपवर चढणं. ही त्यांची फक्त ड्यूटी नसते – ही त्यांची जबाबदारी, त्यांचा धर्म असतो.
>
> **- गजानन गोदेपुरे (उपायुक्त ठाणे महापालिका)**

> मा. आयुक्त सौरभ राव व अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे यांच्या मार्गदर्शना खाली वर्षभर आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे अधिकारी व कर्मचारी सतर्कतेने कामं करत असतात. एखाद्या घटनेसाठी मदतीसाठी कक्षाला कॉल आल्यावर आमचे कर्मचारी आणि ठाणे अग्निशमन केंद्राचे अधिकारी आणि फायरमन मिळून घटनेच्या ठिकाणी नागरिकांची मदत करत असतात व त्यांना संकटातून बाहेर काढतात. तसेच प्राणी व पक्षी यांना ही मदत केले जाते.
>
> **- यासीन एम. तडवी (आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, ठाणे महानगर पालिका)**

## वसई-विरार शहर महानगपालिका

**मुख्य कार्यालय, विरार**
विरार (पूर्व), ता. वसई, जि. पालघर - ४०१३०५.
दुरध्वनी : ०२५० - २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स: ०२५० - २५२५१०७ ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./मा.व.ज./२८८/२०२५ दिनांक : २१/०७/२०२५

**प्रभाग समिती (ई)**
**बांधकाम विभाग**
**ई-निविदा सुचना (सन २०२५-२६)**

वसई - विरार शहर महानगरपालिका विभागकडील ०२ कामांकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुज्ञाप्राप्त ठेकेदारांकडून दरपत्रक पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत. जाहीर निविदा सुचना व निविदा या शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर दि. 22/०७/२०२५. रोजी दु. ३.०० वाजलेपासून ते दि. २८/०७/२०२५ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध होणार आहेत. ऑन लाईन निविदा (https://mahatenders.gov.in) या संकेतस्थळावर दि. २९/०७/२०२५ रोजी दु. ३.०० वाजलेपासून ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा शक्य झाल्यास दि. २९/०७/2024. रोजी दु. ३.०१ मि. नंतर अथवा इतर सोयीच्या दिवशी ऑनलाईन पद्धतीने उघडण्यात येतील.

जावक क्र. व.वि.श.म./नासो/बांध/ १०४२/२०२५
दिनांक :- १८/०७/२०२५

सही/-
सहा. आयुक्त
प्रभाग समिती (ई)
वसई- विरार शहर महानगरपालिका

## बृहन्मुंबई महानगरपालिका

**विषय:** एन विभागातील सार्वजनिक शौचालयांच्या दैनंदिन स्वच्छतेकरीता मनुष्यबळ ( श्रमदिन) उपलब्ध करुन देण्यासाठी स्वारस्य अभिव्यक्ती द्वारे सोडत पध्दतीने एन विभागातील स्थानिक संस्थांची नियुक्ती करण्याबाबत...

**स्वारस्य अभिव्यक्ती**
**जाहिरात**

'एन' विभागामध्ये विषयांतर्गत कामाकरीता 'एन' विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणा-या इच्छुक स्थानिक नोंदणीकृत मजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, अशासकीय संस्था इ. संस्थेमार्फत कामगारांचा / श्रमदिनांचा पुरवठा करण्याकरीता प्रत्येक युनिट निहाय स्वतंत्र संस्थेची सोडत पद्धतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागवीत आहे.

| युनिट क्र. | प्रभाग क्र. | निवड करावयाची संस्था | युनिट क्र. | प्रभाग क्र. | निवड करावयाची संस्था |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 123 | 1 | 6 | 128 | 1 |
| 2 | 124 | 1 | 7 | 129 | 1 |
| 3 | 125 | 1 | 8 | 130 | 1 |
| 4 | 126 | 1 | 9 | 131 | 1 |
| 5 | 127 | 1 | 10 | 132 व 133 | 1 |

टिप:- विषयांकीत काम प्रभावीपणे नियमानुसार होणे अपेक्षीत आहे व नागरिकांच्या अरोग्याशी निगडीत असल्यामूळे अर्जदार संस्थेला मनपा मध्ये स्वच्छतेचे काम केलेचा अनुभव असणे बंधन कारक आहे.

**अनामत रक्कम रु.12,000/- व निविदा शुल्क रु.3630/- + 18% जीएसटी = रु.4284/- प्रत्येक युनिटच्या कामाकरिता स्वतंत्र सोडत काढली जाईल.**

अर्जाचा नमुना 'एन' विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे अर्जाचे शुल्क रोख स्वरुपात किंवा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. **'बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त** (BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION ) या नावाने (ना-परतावा) नागरिक सुविधा केंद्र (C.F.C.) येथे जमा केल्यानंतर दि.22.07.2025 ते दि.28.07.2025 पर्यंत सकाळी 10.30 ते दुपारी 03.00 यावेळेत मिळु शकेल (दि.28.07.2025 रोजी दुपारी 12.00 वाजेपर्यंत). अर्ज जमा करताना अर्जा सोबत दिलेल्या Annexure मध्ये नमूद सर्व कागदपत्रे, निविदा शुल्क रु. 4284/- व अनामत रक्कम रु. 12,000/- भरल्याची पावती सादर करणे गरजेचे आहे. सोडतीचा दिनांक एन विभाग कार्यालय येथे सुचना फलकावर लावण्यात येईल. सोडत पद्धतीने यशस्वी झालेल्या संस्थेस कामाचे वाटप सहाय्यक अभियंता (घकव्य) एन अटी व शर्तीनुसार करतील. तसेच सदर कामाकरीता युनिटनिहाय एक स्वतंत्र संस्था प्रतिक्षा यादीमध्ये घेण्यात येईल. सोडतीमध्ये यशस्वी झालेल्या संस्थांचे काम समाधानकारक नसल्यास किंवा कामामध्ये त्रुटी आढळुन आल्यास म.न.पा.च्या प्रचलित पध्दतीनुसार प्रतिक्षा यादीतील संस्थेस सदर काम करण्यासापेक्ष देण्यात येईल.

इच्छुक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी 'एन' विभाग घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क करावा. संस्थेने 'एन' विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख दि. 28.07.2025 दुपारी 03.00 वाजेपर्यंत आहे.

मूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

पीआरओ/१०७५/जाही/२०२५-२६

सही/-
सहाय्यक आयुक्त 'एन'

जेथे जेथे पाणी साचते, तेथे तेथे डासांचे फावते.

६ वृत्तमानस
महाराष्ट्र
मुंबई, मंगळवार, २२ जुलै २०२५

# कोकण रेल्वेची 'कार ऑन ट्रेन' सेवा सुरु

**रत्नागिरी :** कोकणरेल्वे मार्गावर प्रवाशांसाठी 'कार ऑन ट्रेन' अर्थात रो-रो सुविधा सुरु होत आहे. या सुविधेमुळे आता कार थेट रेल्वेनेकोकणात किंवा गोव्यात नेता येणार आहे. या बहुप्रतिक्षित सेवेसाठी आरक्षणाची प्रक्रिया येत्या २१ जुलै २०२५ पासून सुरू होणार आहे. कोलाड (महाराष्ट्र) येथून या सेवेला २३ ऑगस्ट २०२५ पासून तर वेरणा (गोवा) येथून २४ ऑगस्ट २०२५ पासून सुरुवात होणार आहे. गेली अनेक वर्षे मालाने भरलेले ट्रक रेल्वे वॅगनवरुन वाहून नेणारी रो-रो सेवा यशस्वी ठरली आहे. याच धर्तीवर खासगी चारचाकी वाहनांसाठी ही सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. यामुळे लांब पल्ल्यात कार चालवण्याच्या त्रासातून सुटका होईल. कोकण रेल्वे मार्गावर गेली अनेक वर्षे रो-रो मालवाहतूक सेवा सुरू आहे. यामध्ये मालवाहू ट्रक विशेष रेल्वे वॅगनवर ठेवून त्यांची वाहतूक केली जाते. याच सेवेचा विस्तार करत, कोकण रेल्वेने आता खासगी कारची वाहतूक करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.



## म ह त्त्वा चे

### एकतर्फी प्रेमातून शालेय विद्यार्थ्याचा मुलीवर हल्ला

**सातारा :** एकतर्फी प्रेमातून अल्पवयीन मुलीच्या गळ्याला चाकू लावून तिला संपवण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका माथेफिरू युवकाला जमावाने पकडलं आणि त्याची चांगलीच धुलाई केली. या युवकाने मुलीला ताब्यात घेऊन तिच्या गळ्याला चाकू लावला. त्याचवेळी जमावाने प्रसंगावधान दाखवून त्या मुलीला सुरक्षित सोडवलं. सातारतील बसप्पापेठ करंजे या परिसरात ही घटना घडली असून त्यामुळे एकच खळबळ उडाल्याचं दिसून आलं यावेळी जमलेल्या जमावाने त्या मुलीला सोडण्याची विनंती केली. पण तो युवकाला काही केल्या ऐकत नव्हता. उलट त्या ठिकाणाहून सगळ्यांना जाण्यास तो सांगत होता. ती मुलगीही त्या युवकाला समजाऊन सांगताना दिसत आहे. हे सगळं सुरू असताना समोरच्या काही व्यक्तींनी त्या मुलाचं लक्ष वळवलं. त्याचवेळी मागच्या कंपाऊंडवरून एक तरुण आला आणि त्याने त्या युवकाला मागून पकडलं.

### रेशनच्या धान्याचा काळाबाजार करणारे गोडाऊन सील

**वाशिम :** वाशिम जिल्ह्यातील कारंजामध्ये रेशनचा काळाबाजार होत असल्याचं समोर आला. पुरवठा विभागाने टाकलेल्या छाप्यात 650 बॅग रेशनचा तांदूळ जप्त करण्यात आला. दोन गोडाऊन सील करण्यात आले असून अधिकचा तपास सुरू आहे. हा सर्व तांदूळ रेशन दुकानांमधून काळ्या बाजारात विक्रीसाठी ठेवण्यात आला असल्याचा संशय आहे. विशेष म्हणजे, पांढऱ्या तांदळाचा काळा धंदा करणाऱ्या व्यक्तींचा तपशील घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे संकेत प्रशासनाने दिले आहेत. या प्रकरणी अन्न व नागरी पुरवठा विभागासह पोलिस प्रशासनाकडून संयुक्त तपास सुरू असून, दोषींवर लवकरच गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत.

### घुसखोरी करणाऱ्या चार बांगलादेशी महिला आणि एजंट अटकेत

**नाशिक :** बांगलादेशच्या सीमेवरून डंकी रूटनं कोलकता आणि तिथून मुंबई व सुरतमार्गे नाशिकमध्ये आलेल्या 4 बांगलादेशी महिलांसह एका एजंटला नाशिक पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईमुळं बांगलादेशी घुसखोरीचा गंभीर प्रकार समोर आला आहे. अमृतधाम परिसरात छापा टाकून मायशा शेख, निशान शेख, झुमुर शेख, रिहाना गाझी या चार बांगलादेशी महिलांसोबत नवजीत दास या एजंटला अटक केली. या संदर्भात आणखी दोन संशयित जगदीश मिस्तरी (रा. सुरत) आणि दोन बांगलादेशी व्यक्तींनी या चौघींना नाशिकमध्ये पोहोचवलं असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. पोलिसांनी या संशयितांचा शोध घेण्यासाठी विशेष पथकं रवाना केली आहेत.

# सुनील तटकरेंनीच छावाच्या कार्यकर्त्यांवर हल्ला घडवून आणला

## मनोज जरांगेंचा आरोप, गृहमंत्र्यांकडे कारवाईची मागणी

प्रतिनिधी
■ जालना

लातूरमध्ये छावा संघटनेचे नेते विजयकुमार पाटील आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून झालेल्या बेदम मारहाणीच्या घटनेने राज्यात खळबळ उडवली आहे. या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी थेट अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. सुनील तटकरेंनीच मराठा द्वेषातून छावाच्या कार्यकर्त्यांवर हल्ला घडवून आणला, असे मनोज जरांगे म्हणालेत. तसेच या प्रकरणी गृहमंत्र्यांनी कठोरात कठोर कारवाई करावी, अशी मागणीही मनोज जरांगे यांनी केली आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे हे रविवारी लातूर दौऱ्यावर आले असताना छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्यावर पत्ते फेकत सभागृहात रमी खेळणाऱ्या कृषि मंत्र्याचा राजीनामा घेण्याची मागणी निवेदनाद्वारे केली. छावाचे कार्यकर्ते बाहेर येताच त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना बेदम मारहाण केली. युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण आणि राष्ट्रवादी कार्यकर्त्यांनी घाडगे पाटील यांना मारहाण केली. या प्रकरणावरून अजित पवार यांनी सूरज चव्हाण यांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. या सर्व घडामोडींवर मनोज जरांगे यांनी भाष्य केले आहे.

हा हल्ला तटकरे साहेबांनीच घडवून आणला आहे, अशी आमची शंका आहे. हा घडवून आणलेला, पूर्वनियोजित प्रकार आहे. यामध्ये मराठा समाजाविषयी असलेला द्वेष स्पष्टपणे दिसतो. विजय भैय्या हे शेतकऱ्यांचे लेकरू आहे. ते जर आज मागणी करायला गेलेत तर तुम्ही त्यांना मारता. म्हणजे हे तुम्हाला सोपे जाणार नाही. असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. अजित दादांनी कठोरात कठोर कारवाई करून केवळ पदावरूनच नव्हे तर पक्षातूनच हाकालपट्टी केली पाहिजे, अशी मागणी ही मनोज जरांगे यांनी केली आहे.

मनोज जरांगे पुढे म्हणाले, "हे लोक अजितदादांवरही काळे फासण्याचे काम करत आहेत. अजित पवारांचा राज्यात जनाधार वाढतो आहे, तरुण त्यांच्यामागे उभे राहत आहेत. पण काही नाकर्ते, अतिरेकी कार्यकर्ते जर पक्षाच्या पदांवर राहिले, तर त्याचा फटका थेट अजितदादांना बसतो. असे लोक पदावर ठेवण्याच्या कामाचे नसतात.

# पालकमंत्री शिरसाटांच्या बंगल्यापुढे नशेखोराचा राडा

## मंत्र्यांचा ताफ्याबरोबर बंगल्यात शिरण्याचा प्रयत्न

प्रतिनिधी
■ संभाजीनगर

पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या बंगल्यासमोर त्याचा ताफा येताच एका नशेखोराने बंगल्यात शिरण्याचा प्रयत्न करून गोंधळ घातला. बंदोबस्तावरील पोलिसांनी हुज्जत घातली. या नशोखोराला सातारा पोलिसांनी ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला. हा प्रकार रविवारी मध्यरात्री पैठण रोड, लिंकरोड परिसरात घडला.

सौरभ अनिल भोले (रा. संसार नगर, क्रांती चौक) असे गोंधळ घालणाऱ्या



नशेखोराचे नाव असल्याची माहिती पोलिस निरीक्षक संग्राम ताठे यांनी सोमवारी (दि.२१) दिली.

अधिक माहितीनुसार, पालकमंत्री संजय शिरसाट हे रविवारी रात्री विविध कार्यक्रम आटोपून रात्री पैठण लिंक रोडवरील त्यांच्या बंगल्याकडे निघाले होते. दहाच्या सुमारास ताफा बंगल्याच्या गेटवर येताच आरोपी भोले हा नशेत धुंद होऊन ताफ्यात शिरला. त्याने पोलिसांशी हुज्जत घातली. ताफ्यासोबत बंगल्यात शिरण्याचा प्रयत्न केला. त्याला बंदोबस्तावरील पोलिसांनी पकडले. मात्र, तो पोलिसांना देखील आवरत नव्हता. हुज्जत घालून त्याने गोंधळ घातला. त्याला सातारा पोलिसांनी ताब्यात घेऊन पोलिस अंमलदार आकाश पोलसाने यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला.

# वाटद औद्योगिक वसाहती (एमआयडीसी) विरोधात ग्रामस्थांचा भव्य मोर्चा

प्रतिनिधी
■ रत्नागिरी

रत्नागिरी तालुक्यातील वाटद औद्योगिक वसाहतीचा वाद आता शिगेला पोहचला आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री व उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या विरोधात शिवसेना ठाकरे गटाने दंड थोपटत वाटद औद्योगिक वसाहती विरोधात उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे जिल्ह्यात शिवसेना विरुद्ध शिवसेना असा वाद पुन्हा उफाळून येणार असल्याची चर्चा सुरु झाली आहे.

वाटद औद्योगिक वसाहती (एमआयडीसी ) विरोधात ग्रामस्थांचा भव्य मोर्चा काढण्यात आला. या मोर्च्यात मानवाधिकारचे ॲड. असीम सरोदे यांनी उपस्थित राहून उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या बाबत गंभीर प्रश्न



उपस्थित केले. या मोर्चात आता शिवसेना ठाकरे गटाने उडी घेतली आहे. या एमआयडीसी विरोधात जाहीर पाठिबा देत शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख सहदेव बेटकर यांनी वाटद एमआयडीसीसाठी शेतकऱ्यांची एक इंच जरी जमीन घेतली तर मी आडवा उभा राहीन. तुम्ही उद्योगमंत्री, पालकमंत्री असलात तरी मी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा शिवसैनिक असल्याचे ठणकावून सांगितले.

# छातीत तीव्र वेदानेमुळे छावा संघटनेच्या विजयकुमार घाडगेंना हलवले अतिदक्षता विभागात

प्रतिनिधी
■ लातूर

राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांच्यासमोर छावा संघटनेच्या कार्यकत्यांनी रविवारी (दि.२०) सायंकाळी पत्ते फेकल्याने जोरदार राडा झाला होता. यावेळी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी निवेदन देणाऱ्या छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे पाटील यांना बेदम मारहाण झाली होती. यांच्यावर लातूर येथील अपोलो रुग्णालयात उपचार सुरू असून सुरवातीला त्याच्यावर जनरल वार्डमध्ये उपचार सुरु होते. पण घाडगे त्यांच्या छातीत तीव्र वेदना होत असल्याने त्यांना अतिदक्षता विभागात हलवण्यात आले



असल्याची माहिती त्यांच्यावर उपचार करणारे डॉ. मनोज कदम यांनी दिली.

मारहाण झाल्यानंतर घाडगे यांना अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यावर तेथील एका रुममध्ये उपचार सुरू होते. तथापि सोमवारी दुपारी त्यांना श्वाच्छोश्वासाचा त्रास होत असल्याने व त्यांच्या छातीत दुखत असल्याने खबरदारी म्हणून अतिदक्षता विभागात हलवण्यात आले आहे. त्यांचे डोके भुवयां व डोक्याला मार लागला आहे. शिवाय बरगड्या व पाठीच्या मणक्यालाही दुखापत झाली आहे. मान , चेहऱ्यावर सुज आली असून आम्ही योग्य ते उपचार करीत असल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा विधीमंडळ संभागृहात रमी खेळत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्याने मोठी खळबळ उडाली होती. या घटनेच्या निषेधार्थ छावा शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते लातूर येथे राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांची पत्रकार परिषदेत पोहचले व त्यांच्या अंगावर पत्ते फेकले होते.

# लातूर मारहाण प्रकरणी सुरज चव्हाण यांचा राजीनामा

■ लातूर

राष्ट्रवादी युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी राजीनामा दिला. लातूरमध्ये छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांना मारहाण केल्याच्या घटनेनंतर चोवीस तासात पक्षाने कारवाई केली. या घटनेमुळे राज्यात संताप उसळला, सुरज चव्हाण यांच्या राजीनाम्यासाठी राज्यभरात आंदोलनं झाली. अखेर त्यांचा राजीनामा घेण्यात आला. मात्र, त्यांच्या राजीनाम्यानंतरही कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्यासाठी राष्ट्रवादीवर दबाव कायम. छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी कोकाटे यांचा राजीनामा तातडीने घेण्याची मागणी केली.

छावा संघटनेचे विजय घाडगे म्हणाले, "सुरज चव्हाण हा आमच्यासाठी विषयच नाही. आमच्यासाठी कोकाटे यांचा राजीनामा महत्त्वाचा आहे." त्यांनी कृषिमंत्र्यांना बडतर्फ करण्याची मागणी केली. दरम्यान, अजित पवार यांनी लातूरमधील राष्ट्रवादी काँग्रेस आणि छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये घडलेली घटना गंभीर, दुर्दैवी आणि निषेधार्ह असल्याचे म्हटले. कोणत्याही हिंसेला, असभ्य वर्तनाला किंवा असंसदीय भाषेला ठामपणे विरोध करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सामाजिक जीवनात लोकशाही, शांतता आणि अहिंसा या मूल्यांना प्राधान्य देण्याचे आवाहन त्यांनी केले.

## गायकवाडांचे पुन्हा वादग्रस्त विधान

# तू अन् मी एकटेच आझाद मैदानात भेटू...

## इम्तियाज जलील यांना दिले चॅलेंज



प्रतिनिधी
■ बुलढाणा

मुंबईतील आमदार निवासातील कँटीन चालकास मारहाण केल्याप्रकरणी चर्चेत आलेले, आणि आपल्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे नेहमीच चर्चेचा विषय ठरणारे आमदार संजय गायकवाड यांनी पुन्हा एकदा खळबळजनक विधान करून नवीन वाद ओढवून घेतला आहे. काही दिवसांपूर्वीच हॉटेलमध्ये वेटर आणि कुकला मारहाण केल्याची घटना ताजी असतानाच, आता त्यांनी थेट माजी खासदार आणि एमआयएमचे नेते इम्तियाज जलील यांना चॅलेंज दिले आहे.

संजय गायकवाड यांनी जाहीरपणे म्हटले की, मुंबईतील आझाद मैदानात तू आणि मी एकटे भेटू. तिसरा कोणी मध्ये येणार नाही. हे चॅलेंज देत त्यांनी पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेतली आहे. विशेष म्हणजे, अवघ्या तीन दिवसांपूर्वीच गायकवाड यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद न ठेवण्याचा निर्णय घेतल्याचे जाहीर केले होते. मात्र, त्यांनी त्यांचा शब्द फिरवल्याचे दिसत आहे. त्यांनी दिलेल्या या आव्हानाला इम्तियाज जलील काय प्रतिक्रिया देतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

एमआयएम नेते आणि माजी खासदार इम्तियाज जलील हे रविवारी बुलढाणा दौऱ्यावर होते. त्यांनी बुलढाणा, मोताळा, मलकापूर आणि नांदुरा येथे कॉर्नर सभा घेतल्या. या दौऱ्यादरम्यान माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी स्पष्ट केले की, मी कुणाच्याही आव्हानाला उत्तर देण्यासाठी आलो नाही. मी येथे माझ्या कार्यकर्त्यांना भेटण्यासाठी आलो आहे. मात्र, आमदार संजय गायकवाड यांनी यावर प्रतिक्रिया देताना पुन्हा एकदा इम्तियाज जलील यांना थेट आव्हान दिले आहे. त्यांनी म्हटले, पोलिसांनी विनंती केली म्हणून त्याला बुलढाण्यात पाय ठेवता आला.

# होडावडा पूल पाण्याखाली

## वेंगुर्ले-सावंतवाडी मार्गावरील वाहतूक ठप्प

■ वेंगुर्ले

गेले दोन दिवस सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे वेंगुर्ले तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. नदी-नाले दुथडी भरून वाहत असून, वेंगुर्ले-सावंतवाडी मार्गावरील होडावडा येथील नदीला पूर आल्याने हे पूल दुपारपासून पाण्याखाली गेले आहे. यामुळे दोन्ही बाजूची वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे.

सलग दोन-तीन दिवस पाऊस पडल्यानंतर दरवर्षी या नदी-नाल्यांना पूर येतो. त्यावेळी वेंगुर्ले



तालुक्यात होडावडा येथील पूलावर पाणी येऊन वाहतूक थांबते. असे वारंवार घडत असूनही, सार्वजनिक बांधकाम विभागाने या पुलाची उंची वाढवण्याकडे अजूनही लक्ष दिलेले नाही. त्यामुळे स्थानिक नागरिक आणि प्रवाशांकडून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

**पिंक फ्रॉग मोशन पिक्चर्स प्रायव्हेट लिमिटेड**
(सीआयएन: यू९२४९०एमएच२०२०पीटीसी३४६७३४)
नोंदणीकृत कार्यालय
०२-ए, जॉन गोन्सालविस चाळ, ओशिवरा बी, शिव मंदीरजवळ, ओशिवरा जोगेश्वरी प, मुंबई शहर, मुंबई महाराष्ट्र, भारत ४०००१२.
ई-मेल : asmandassociates@gmail.com

सूचना

सूचना ह्याद्वारे देण्यात येत आहे की कंपनीज (इनकॉर्पोरेशन) नियमावली २०१४ च्या नियम ३०(५) (ए) च्या अनुषंगाने त्यांचे नोंदणीकृत कार्यालय महाराष्ट्र राज्य मधून आसाम राज्यामध्ये स्थलांतरीत करण्यासाठी परवानगी मिळविण्यासाठी क्षेत्रीय संचालक (पश्चिम क्षेत्र) ह्यांच्याकडे अर्ज करणे प्रस्तावित आहे.

कोणीही व्यक्ती ज्याचे स्वारस्य प्रस्तावित बदलामुळे बाधित होणार आहे त्याने त्याच्या हरकती कारणासह क्षेत्रीय संचालक (पश्चिम क्षेत्र), कंपनी कामकाज मंत्रालय, ५ वा मजला, एव्हरेस्ट मरीन ड्राईव्ह, मुंबई ४००००२ ह्यांच्याकडे सादर प्रसिद्धीपासून २१ दिवसांच्या आत सादर करावे.

**पिंक फ्रॉग मोशन पिक्चर्स प्रायव्हेट लिमिटेड करीता**
**सही /-**
**मोमिता जैसी**
**संचालक**
**डीआयएन :** ०८८७२८९०
**ठिकाण :** मुंबई  **दिनांक :** २२/०७/२०२५



# वसई-विरार शहर महानगपालिका

**प्रभाग समिती अे,बोळींज विरार (प.) ता. वसई. जि. पालघर, पिन ४०१३०३**
ता. वसई. जि. पालघर, पिन ४०२३०३ दुरध्वनी : ०२५०२५५०१०२/२५५१५०१ ईमेल :- amca-vvmc.@gab.in

**जा.क्र. वविशम बो-कर/२९५/२०२५-२६**  **दि.२१/०७/२०२५**

**प्रभाग समिती "ओ" बोळींज, विरार (प)**

महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अधिनियम ४६७ प्रकरण ३ मधील १ (१) व १ (२) अन्वये जाहीर नोटीस खालील मालमतेच्या हस्तांतरण संबंधाने वसई-विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय विरार प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपत्ये नोटीस कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत हितसंबंधकाने हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यालय बोळींज येथे लेखी स्वरूपात हरकत नोदवावी अन्यथा करवसुलीच्या महानगरपालिका मध्ये पाचायतची नोंद घेतली जाईल.

| अ क्र | दिनांक | मालमत्ता क्र. | वार्ड क्र. | मालमत्तेचे ठिकाण | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणा-याचे नांव किंवा अभिहस्तांकनकर्त्याचे नांव | खरीदाराचे किंवा अभिहस्तांकनकर्त्याचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०३-०७-२०२५ | VR९९/१०/१२ | ११ | वेलीटीना अपार्टमेंट | महेश हंसराज शहा व अंजना महेश शहा | राकेश जगदीश गुप्ता व प्रियंका राकेश गुप्ता |
| २. | ०३-०७-२०२५ | VR१७ / ६५२ / २१४ | १७ | मंत्री हाईट्स सेक्टर नं.३ ई विंग कॉसमस लिजेंड | विनयकुमार सिंह | चंदाकुमारी बिट्टू शर्मा व बिट्टू शर्मा |
| ३. | ०८-०७-२०२५ | VR२७/७३/१३ | २७ | प्रणाली अपार्टमेंट रूम नं. २०४ | साद सुहास मळे गोतम पुनमचंद जैन | प्रमल रावत व रूमला प्रमल रावत |
| ४ | ०८-०७-२०२५ | VR१४/११०/१६ | १४ | मुंकूद अनत अपार्टमेंट बी-१ वर्तक वार्ड | गणेश धोंडू खांडसकर | उषा शरद वझे |
| ५ | ०८-०७-२०२५ | VR२७/७४/५ | २७ | मनाली अपार्टमेंट, ए १०३ विवा कॉलेज रोड | लक्ष्मीकांत गगाप्रसाद गुप्ता/सतिषकुमार उदयराज | प्रविण चंद्रकांत दुसार |
| ६. | ०८-०७-२०२५ | VR२९/६६/६ | २९ | न्यू प्रशांक को. ऑप. हो. सो, रूम नं. १०३ | निलीमा रमेश कासार | निलेश रमेश कासार |
| ७. | ०८-०७-२०२५ | VR१३ / ७८/२३ | १३ | दत्तात्रेय अपार्ट, ३ रा मजला रूम नं. ३०५ | मिना गंगाराम पाटील | प्रज्ञा अजय सावरे व अजय गणेश सावरे |
| ८. | ०८-०७-२०२५ | VR१३ / ७८/२ | १३ | दत्तात्रेय अपार्ट, रूम नं.जी. ३ मज्जिद जवळ | रामकिशन आर कोरी | प्रज्ञा अजय सावरे व अजय गणेश सावरे |
| ९. | ०८-०७-२०२५ | VR१० / ४४२ / ९६ | १० | ज्योती एमरल्डस को. ऑप. हौ. सो. लि. विराट | दिपक डहाणूकर / रविंद्र एन कांतीराव | शिवशंकर मनिंद्रनाथ साधुका |
| १०. | ०८-०७-२०२५ | VR१७/६७५/३४ | १७ | एक्रोपोलिस सेक्टर नं. ३ बि.नं. ३ व ४ रूम नं.ए. | सनियॅन परलिया व मनोरंजन परलिया | अमन ब्रजेश शर्मा |
| ११. | ०८-०७-२०२५ | VR०९/८६/१८ | ०९ | शिवसृष्टी को. ऑप. हौ.सो १ ला मजला बी-विंग | सुरेश विष्णू देऊरकर/नितीन सु. देऊरकर व मानसी मनिष पाटील | फातीमा विल्यम कोरीया |
| १२. | ०८-०७-२०२५ | VR१७ / ७१६/२५ | १७ | क्रिस्टोन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. रूम नं.सी ३०२ एव्हेन्यु एल-१ | किशोर रायथटा | अरबिंदकुमार व सुमनकुमारी अरबिंद कुमार |
| १३. | ०८-०७-२०२५ | VR१७ / ७२२/१४८ | १७ | पुनम विस्टा रूम नं. सी- ५०६ वाय के नगर | किशोर वर्मा | रूसी बेहराम उमरीगर |
| १४ | ०८-०७-२०२५ | VR२७/६१/१० | २७ | आकाश अपार्टमेंट रूम नं. ए-२०३ | शोभा नारायण कामत/अनंत नारायण कामत | राजू श्रीपती पाटील व राजेश्री राजू पाटील |
| १५ | ०८-०७-२०२५ | VR२७/१६/५ | २७ | पुनित को. ऑ. हौ. सो, ए-६ राम मंदिर रोड | गायत्री राजु दर्जी व राजू छगनलाल दर्जी | चंद्रशेखर गिरीधर जांबावलीकर व सीमा सी. जांबावलीकर |
| १६ | ०८-०७-२०२५ | VR१७/६७७/२२८ | १७ | एकता पार्क्सविले ब्रुकलिक पार्क, बि.नं. ९ रूम नं. जी-८०३ | अजगर सेकुंडर खान | प्रमोद हरीलाल पांडे व ममता प्रमोद पांडे |
| १७ | ०८-०७-२०२५ | VR९७ / ७३५/८६ | १७ | रूस्तजी एव्हेन्यु एल-०९-२-४, ई विंग रूम नं. १००८ | मयुरी आनंद चव्हाण व सुनिता आनंद चव्हाण | सुनिल भिमराव बागुल व सोनल सुनिल बागुल |
| १८ | ०८-०७-२०२५ | VR१७ / ७३५/६० | १७ | एव्हेन्यु एल १-२-४, ई विंग रूम नं. ७०५ | हिना मुस्तफा व मोहमद मुस्तफा कपाडीया | माथुरी पवन पाण्डेय व पवन पाण्डेय |
| १९ | ०८-०७-२०२५ | VR१०/२१३/३७ | १० | युनिक रश्मी शॉपिंग सेंटर १९४ | सुजाता सिल्वेस्ट लोपीस | स्लेविरा सिल्वेस्टर लोपीस |
| २० | ०८-०७-२०२५ | VR१०/२१३/३६ | १० | युनिक रश्मी शॉपिक सेंटर - ११२ | सुजाता सिल्वेस्ट लोपीस | स्लेविरा सिल्वेस्टर लोपीस |

जा.क्र. वविशम बोळींज / मा.कर.२९५ / २०२५-२६
दि.२१/०७/२०२५

**-/ सही**
**सहा. आयुक्त प्रभाग समिती (अ)**
**बोळींज वसई-विरार शहर महानगरपालिका**

# अडसूळ ट्रस्ट बुध्दिबळ स्पर्धेत मनवा, रुचिता, सुशांत, सिध्दांत उपांत्यपूर्व फेरीत

**मुंबई :** आंतरराष्ट्रीय बुध्दिबळ दिनाचे औचित्य साधून आनंदराव अडसूळ चॅरीटेबल ट्रस्ट, नागरिक सहाय्य केंद्र-ज्ञानेश्वर विद्यालय व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे सुरु झालेल्या शालेय मुलामुलींच्या विनाशुल्क बुध्दिबळ स्पर्धेत मानवा कदम, रुचिता निकाळजे, सुशांत उगळे, सिध्दांत कांबळे यांनी लहान गटात तर अनुराग जुवाटकर, रितू जगताप, यश पोकळे यांनी मोठ्या गटात उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. वजिराच्या आक्रमक चालीस घोड्याची उत्तम साथ निर्माण करीत मनवा कदमने वैभवी निळेच्या राजाला नमविले आणि उपउपांत्यपूर्व फेरीचा सामना जिंकला. वडाळा येथील ज्ञानेश्वर विद्यालय सभागृहात रुचिता निकाळजेने उंट व वजिराच्या सहाय्याने तनु सविताच्या राजाला शह देत रुचिताने उपांत्यपूर्व फेरी गाठली. अन्य सामन्यात सुशांत उगळेने श्लोक शिंदेचा, सिध्दांत कांबळेने हयत सय्यदचा, अनुराग जुवाटकरने छायांक उघडेचा, रितू जगतापने तन्वी गायकवाडचा, यश पोकळेने अब्दुल आहाडीचा तर फैझ पठाणने विभास जाधवचा पराभव करून विजयीदौड सुरु ठेवली. मुंबई शहर जिल्हा बुध्दिबळ संघटनेचे सेक्रेटरी व फिडे इंस्ट्रक्टर राजाबाबू गजेंगी, मुख्याध्यापक महेंद्र पाटील, क्रीडा शिक्षक अविनाश महाडिक, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण यांचे स्पर्धेला मार्गदर्शन लाभले आहे.



# परळ येथे भाजपा कार्यालयाचे उद्घाटन जल्लोषात



प्रतिनिधी
■ मुंबई

भाजपा शिवडी विधानसभा प्रभाग क्रमांक २०३ च्या वतीने 'सेवालय' कार्यालयाचा उद्घाटन समारंभ परळ येथे मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी या कार्यालयाचे उद्घाटन भाजपा आमदार प्रसाद लाड यांच्या हस्ते करण्यात आले. आम्ही नेहमी जनसेवेसाठी कार्य करत असतो. या कार्यालयाच्या माध्यमातून पळस एवढी विभागातील अनेक नागरिकांचे समस्या सोडवण्यात येतील. तसेच त्यांच्या पाठीमागे आम्ही भक्कमपणे उभे राहणार. भाजपा महामंत्री सचिन शेट्ये यांचे काम मी अनेक वर्षांपासून पाहत आलो असून त्यांना जनसेवेसाठी शुभेच्छा देतो. हे सेवालय स्थानिक नागरिकांच्या समस्या आणि सेवाभावी उपक्रमांचे केंद्रबिंदू करावे अशी अपेक्षा या कार्यक्रमातून व्यक्त करतो अशी माहिती भाजपा आमदार प्रसाद लाड यांनी या ठिकाणी दिली.

कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे यावेळी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. समाजासाठी काहीतरी देण्याच्या उद्देशाने अनेक युवकांनी आणि कार्यकर्त्यांनी यावेळी रक्तदान करत या शिबिरात भाग घेतला. आम्ही नेहमीच लोकांसाठी काम करत असून यापुढे देखील या शेवाले कार्यालयाच्या माध्यमातून लोकांचे समस्या सोडवणार आहे. आपल्या विभागातील कोणत्याही नागरिकांच्या समस्या असतील त्यांनी या ठिकाणी लिखित स्वरूपात आणून द्यावे आहे त्या नक्कीच सोडवण्यात येतील अशी माहिती भाजपा महामंत्री सचिन शेट्ये यांनी यावेळी बोलताना दिली. यावेळी ज्येष्ठ नेते आमदार कालिदास कोळंबकर यांच्यासह स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फिडे महिला विश्वचषक बुद्धिबळ
# हम्पी उपांत्य फेरी गाठणारी पहिली भारतीय महिला

### वैशाली पराभूत, चिनी खेळाडूने हरवले




वृत्तसंस्था
■ बटुमी

भारतीय ग्रँडमास्टर कोनेरू हम्पीने जॉर्जियातील बटुमी येथे खेळल्या जात असलेल्या FIDE महिला विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. इतक्या अंतरावर पोहोचणारी ती पहिली भारतीय महिला बुद्धिबळपटू आहे. तिने क्वार्टर फायनलमध्ये चीनच्या सॉन्ग युक्सिनला पराभूत करून उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केले.वैशाली रमेशबाबूला तिसऱ्या मानांकित चीनच्या टॅन झोंगीकडून पराभव पत्करावा लागला. यासोबतच या स्पर्धेत तिची मोहीम संपुष्टात आली.शनिवारी रात्री बटुमी येथे झालेल्या दोन सामन्यांच्या क्वार्टरफायनल मालिकेतील पहिला सामना जिंकून आघाडी घेतल्यानंतर, रविवारी झालेल्या क्वार्टरफायनलच्या दुसऱ्या सामन्यात हम्पीने चिनी खेळाडूला बरोबरीत रोखले.

दुसऱ्या क्वार्टरफायनलमध्ये, हरिका द्रोणवल्ली आणि उदयोन्मुख स्टार दिव्या देशमुख यांच्यात टक्कर झाली. तथापि, त्यांच्यापैकी कोण उपांत्य फेरीत पोहोचेल याचा निर्णय सोमवारी होणाऱ्या दुसऱ्या सामन्यानंतर होईल.तत्पूर्वी, हम्पीने माजी विश्वविजेत्या स्वित्झर्लंडच्या अलेक्झांड्रा कोस्टेनियुकला टाय-ब्रेकमध्ये १.५-०.५ असे पराभूत करून क्वार्टरफायनलमध्ये आपले स्थान निश्चित केले होते.

**पहिल्यांदाच चार भारतीय महिला क्वार्टर फायनलमध्ये**

या स्पर्धेत प्रथमच चार भारतीय महिला खेळाडूंनी क्वार्टर फायनलमध्ये प्रवेश केला. कोनेरू हम्पी व्यतिरिक्त, हरिका द्रोणवल्ली, आर. वैशाली आणि दिव्या देशमुख यांनी क्वार्टर फायनलमध्ये आपले स्थान निश्चित केले होते.

# टी-20 विश्वचषक पात्रता फेरीपूर्वी नेपाळ संघ भारतात सराव करणार

### बीसीसीआय सेंटरमध्ये कॅम्प

वृत्तसंस्था
■ नवी दिल्ली

२०२५ च्या टी-२० विश्वचषक पात्रता स्पर्धेपूर्वी नेपाळ संघ भारतात सराव करेल. २० ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत बंगळुरू येथील बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्स येथे नेपाळी संघ सराव सत्रांमध्ये सहभागी होईल. हा उपक्रम भारत सरकारच्या सहकार्याने केला जात आहे, ज्याचा उद्देश भारत आणि नेपाळमधील तरुणांना क्रिकेटद्वारे जोडणे आहे.

टी-२० विश्वचषक पात्रता सामने ८ ते १७ ऑक्टोबर दरम्यान ओमानमध्ये खेळवले जातील. मुख्य स्पर्धा भारत आणि श्रीलंकेत होणार आहे.भारताने यापूर्वी गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये नेपाळ संघाला सेंटर ऑफ एक्सलन्स येथे सराव करण्याची संधी दिली होती. यासोबतच, नेपाळने गेल्या वर्षी जूनमध्ये बडोदा आणि गुजरात क्रिकेट असोसिएशनच्या संघांविरुद्ध त्रिकोणी सराव स्पर्धा देखील केला.

**परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी नेपाळ क्रिकेट संघाची भेट घेतली**

भारताचे परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी जानेवारी २०२४ मध्ये नेपाळमधील क्रिकेटच्या विकासासाठी भारताचा पाठिंबा व्यक्त करण्यासाठी नेपाळ पुरुष संघ आणि क्रिकेट असोसिएशन ऑफ नेपाळ (CAN) च्या प्रतिनिधींची भेट घेतली.मार्च २०२४ मध्ये नेपाळमध्ये होणाऱ्या नेपाळ आणि डीडीसीए (दिल्ली जिल्हा क्रिकेट असोसिएशन) अंडर-१९ संघांमधील सराव सामन्यांनाही भारत सरकारने पाठिंबा दिला

# 'फिडे मास्टर' नितीन पोतवाडला रोचेस फिडे गुणांकन खुल्या बुद्धिबळ स्पर्धेचे विजेतेपद



प्रतिनिधी
■ ठाणे

'फिडे मास्टर' नितीन पोतवाडने आपले निर्विवाद वर्चस्व राखताना रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थ आणि पिनॅकल फिडे इव्हेंट आयोजित रोचेस फिडे गुणांकन खुल्या बुद्धिबळ स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. नितीनने स्विस लीग पद्धतीने खेळल्या गेलेल्या या स्पर्धेत सर्व नऊ फेऱ्यांमध्ये विजय मिळवत पन्नास हजार रुपयांचे रोख बक्षीस खिशात घातले.

दोन हजारपेक्षा जास्त फिडे गुणांकन असलेल्या बुद्धिबळपटूच्या सहभागामुळे स्पर्धेत चांगली चुरस अनुभवयाला मिळाली. दुसऱ्या स्थानासाठी आंतराराष्ट्रीय मास्टर हरियाणाच्या कुशाग्र कृष्णतेर आणि ठाण्याच्या अंकुर गोखलेमध्ये काटे कि टक्कर पहायला मिळाली. नवव्या फेरीअखेर हे दोघेही आठ गुणांसह बरोबरीत होते. पण सरस गुणांमुळे सरशी मिळवत कुशाग्रने आपल्या दुसऱ्या स्थानावर शिक्कामोर्तब केले. कुशाग्रला ३५ हजार रुपयांचे रोख आणि तृतीय स्थानावर राहिलेल्या अंकुरला २० हजार रुपयांचे बक्षीस मिळाले. स्पर्धेत आठव्या फेरीपर्यंत आघाडीवर असलेल्या आंतरराष्ट्रीय मास्टर शरद टिळक यांना शेवटच्या फेरीत पराभूत झाल्यामुळे चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. स्पर्धेतील विजेत्यांना रोटरी क्लबचे माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर मोहन चंदावरकर, क्लबच्या अध्यक्षा ममता वंजानी, सचिव निशा कपिला, ठाणे जिल्हा बुद्धिबळ संघटना आणि रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थचे माजी अध्यक्ष मिलिंद नागरे, धर्मु वंजानी यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे वितरित करण्यात आली.

**स्पर्धेतील संक्षिप्त निकाल :**
**बिगर गुणांकित :** हेतांश गोयल (६ गुण), इझेन विनील ( ६ गुण ), रिशील कायमपूरथ (५.५ गुण).
**सर्वोत्तम महिला बुद्धिबळपटू :** प्रणाली धारिया (७ गुण ), वृषाली देवधर (६.५ गुण), जान्हवी सोनेजी (६ गुण).
**दिव्यांग गट :** यश गोगटे (६ गुण), रुद्र चव्हाण (४ गुण), नितीन सांगळे (२ गुण).



# 'चिंचपोकळीच्या चिंतामणी'चे पाटपूजन

**मुंबई -** चिंचपोकळी सार्वजनिक उत्सव मंडळ यंदा आपला १०६ वा गणेशोत्सव साजरा करीत आहे. गणेशोत्सवाची सुरुवात हि चिंचपोकळीचा चिंतामणीच्या पाटपूजनाने होते. हा पाटपूजन सोहळा काल रविवारी सौ व श्री प्रदिप नारायण हरयाण( उपाध्यक्ष) या दाम्पत्याच्या शुभ हस्ते संपन्न झाला. पूजनाच्या अगोदर मूर्तिकार सिद्धेश दिघोळे यांनी बनविलेल्या शाडूच्या मातीचा मोदक ज्याची पूजा केली. त्याची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीला छत्रपती शिव-शंभू कालीन सोहळ्याचे स्वरूप आले होते. नऊवारी साडी परिधान करून महिला व मावळ्यांच्या वेषात पुरुष सहभागी झाले होते.चिंतामणी भक्तांच्या अलोट गर्दीत हा पाटपूजन सोहळा यशस्वीरित्या संपन्न झाला. या पाटपूजन सोहळ्याने १०६ व्या वर्षाचा गणेश उत्सवारंभ झाला, अशी माहिती मंडळाचे मानदसचिव वासुदेव सावंत व कार्यालय प्रमुख राजेश चव्हाण यांनी दिली.



# मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रमातील तरुणांना आयआयटीचे मिळणार मार्गदर्शन

**मुंबई :** मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या तरुणांना सार्वजनिक धोरण (पब्लिक पॉलिसी) प्रमाणपत्र अभ्यासक्रम देण्यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पस्थितीत नियोजन विभागाने पवई येथील भारतीय प्रौद्योगिक संस्था (आयआयटी) बरोबर सामंजस्य करार केला. 'आयआयटी'बरोबरच्या या अभ्यासक्रमामुळे फेलोशिप कार्यक्रमातील तरुणांच्या क्षमतांमध्ये वाढ होणार असून त्यांना अधिक प्रभावीपणे काम करता येईल, असे प्रतिपादन फडणवीस यांनी यावेळी केले.यावेळी नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा व आयआयटीचे संचालक प्रा. शिरीष केदारे यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम २०१५ पासून सातत्याने अधिक प्रगल्भ आणि समृद्ध होत आहे.

# मुंबई बाहेर गेलेल्या मराठी माणसांना 35 लाख घरे उपलब्ध करणार!

### उपमुख्यमंत्री शिंदे यांची घोषणा




प्रतिनिधी
■ मुंबई

उबाठाच्या नेत्यांनी शिवसेना नेते रामदास कदम आणि गृहराज्य मंत्री योगेश कदम यांच्यावर अधिवेशनात आरोप केले होते. या आरोपांचा उपमुख्यमंत्री शिंदे यांनी कडक शब्दांत समाचार घेतला. काचेच्या घरात राहणाऱ्यांनी दुसऱ्याच्या घरावर दगड मारू नये. असे सांगून मुंबई बाहेर गेलेल्या मराठी माणसांना ३५ लाख घरे उपलब्ध करून देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

गोरेगाव मधील नेस्को येथे "शासन आपल्या दारी" उपक्रमांतर्गत सिद्धेश कदम यांनी आयोजित केलेले विशेष शिबिरात ते बोलत होते. यावेळी शिवसेना नेते गजानन कीर्तिकर, नेते रामदास कदम, खासदार रवींद्र वायकर, प्रवक्ते संजय निरुपम यांच्यासह शिवसेनेचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.ते म्हणाले की, रामदास कदम मला माहित आहेत , त्यामुळे तुम्ही काळजी करु नका. निवडणुका आल्या की काही लोक बदनामीची खेळी खेळतात. निवडणुका येतात आणि जातात पण त्यांनी लक्षात ठेवावे,त्यांच्या पोटात दुखते कारण त्यांनी इतकी वर्ष मराठी माणसांसाठी त्यांनी काही केलं नाही. आपल्या सरकारने मुंबईतील रस्ते काँक्रिटचे केले आहेत. येत्या अडीच वर्षांत संपूर्ण मुंबईचे रस्ते काँक्रिटचे होतील. रस्त्यांचे रिपेअरिंग होणार नाही, त्यामुळे त्यांचा पैसा बंद होईल अशी टीका त्यांनी उबाठावर केली. मराठी माणसासाठी त्यांनी काहीच केलं नाही. बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न होते की ४० लाख घरे मराठी माणसाला मिळायला हवीत. आम्ही हे स्वप्न पुढे नेत आहोत. मुंबईत ३५ लाख घरे उभारण्याचे काम सुरू केले आहे. मराठी माणसाला हक्काचं घर मिळवून देण्यासाठी काम सुरू आहे. जे मराठी लोक मुंबईबाहेर गेले, त्यांना परत आणण्याचे काम आम्ही करत आहोत. मी सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलो नाही, पण प्रत्येकाच्या हातात तो देण्याची माझी इच्छा आहे.

# निरामय हेल्थ फाऊंडेशनतर्फे एनजीओंचे संमेलन!

### आहार, क्षयरोग उपचारांवर चर्चासत्र

■ मुंबई

निरामया हेल्थ फाऊंडेशनतर्फे मुंबईतील माटुंगा येथील पायोनियर हॉलमध्ये 'एनजीओ संमेलन' आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमात मुंबईसह शेजारच्या शहरांमधील ४० हून अधिक सामाजिक संस्थांनी सहभाग नोंदवला. यावेळी आरोग्य व इतर क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते. संमेलनात 'आजीवन आरोग्य आणि आहाराचे परिणाम', टीबी (क्षयरोग) उपचारांवरील नव्याने विकसित धोरणे, तसेच सरकार-एनजीओ भागीदारीतील आव्हाने व संधी यांवर सखोल चर्चा करण्यात आली.

निरायम हेल्थ फाऊंडेशन ही मागील २५ वर्ष समाजातील वंचित घटकांसाठी आरोग्य व पोषण क्षेत्रात काम करीत आहे. संस्थेने २५ व्या वर्षात पदार्पण केले आहे. या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्ताने संस्थेने मुंबई व आजूबाजूच्या परिसरात कार्यरत असणा-या ४० हून अधिक स्वयंसेवी संस्थांचे (एनजीओ) संमेलन आयोजित केले होते. एनजीओ आणि सरकारी यंत्रणांमध्ये अधिक सशक्त भागीदारी निर्माण करून आरोग्य सेवांचे परिणामकारकत्व वाढवण्याचे उद्दिष्ट या कार्यक्रमाचे होते.

कार्यक्रमाला मुंबई महापालिकेच्या मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. दक्षा शहा या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थिती होत्या. या वेळी सावित्रीबाई फुले एकात्म समाज मंडळाचे डॉ. प्रसन्ना पाटील, डब्ल्यूएचओ सल्लागार डॉ. नेहा नलावडे, बालरोगतज्ज्ञ डॉ. अल्का जाधव, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. साफला श्रॉफ, बीएमएन कॉलेजच्या डॉ. विनया वैष्णपायन व आहारतज्ज्ञ डॉ. वीणा यार्डी यांनी आपल्या क्षेत्रातील अमूल्य अनुभव उपस्थितांसमोर मांडले.

निरामय हेल्थ फाऊंडेशनच्या संचालिका शुभलक्ष्मी पटवर्धन यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला. त्यांनी संस्थेचे आरोग्य व पोषण क्षेत्रातील योगदान आणि दुर्बल घटकांसाठी केलेल्या कार्याचा यावेळी उजाळा दिला. या कार्यक्रमामुळे हेल्थकेअर, पोषण आणि एनजीओ समन्वय या क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार असल्याचे पटवर्धन यांनी सांगितले.

# 'एकता मंच'तर्फे आयोजित नशामुक्ती रॅलीला नागरिक, कलाकार, नेत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




प्रतिनिधी
■ मुंबई

भारतात विशेषतः मुंबईसारख्या महानगरांमध्ये तरुणांमध्ये वाढत्या प्रमाणात अंमली पदार्थांच्या व्यसनामुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, एकता मंचचे संस्थापक व अध्यक्ष अजय कौल यांच्या नेतृत्वाखाली, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या सहकार्याने, अंमली पदार्थविरोधी जनजागृतीसाठी भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीला नागरिक, मान्यवर व बॉलिवूड कलाकारांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला आणि सर्वांनी एकजूट होऊन एकच संदेश दिला — नशा नाही, आयुष्य निवडा!

ही रॅली शनिवारी, १९ जुलै रोजी छाचा नेहरू उद्यान, मॉडेल टाऊन (वर्सोवा मेट्रो स्टेशनजवळ) येथून सुरु होऊन ऑर्किड द इंटरनॅशनल स्कूल, यारी रोड, अंधेरी वेस्ट येथे संपन्न झाली. सुमारे ५००० हून अधिक नागरिकांनी हातात फलक, घोषणा आणि संगीतासह सहभाग घेत, आपल्या परिसराला व्यसनमुक्त करण्याचा संदेश दिला. स्थानिक नागरिकांपासून नेतेमंडळींपर्यंत, लोकांसमोर एकसंध आवाजात अंमली पदार्थांविरोधात आवाज उठवण्यात आला.कोळी समाज, ट्रान्सजेंडर गट, विद्यार्थी, जेष्ठ नागरिक, आणि स्थानिक हौसिंग सोसायट्यांचे सदस्य अशा अनेक घटकांनी रॅलीत सक्रीय सहभाग घेतला.रॅलीला सामाजिक कार्यकर्त्या अमृता फडणवीस ,आयआरएस अधिकारी समीर वानखेडे आणि गृहराज्यमंत्री योगेश कदम या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

# वरळीतील सिद्धार्थनगर, प्रेमनगरमधील एसआरए प्रकल्प 27 वर्षापासून रखडला

### शिवकृपा बिल्डरकडून एमएमआरडीने प्रकल्प काढून घेण्याची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई शहर झोपडीमुक्त करण्याचा संकल्प राज्य सरकारने जाहीर केलेला असतानाच वरळी येथील शिवकृपा बिल्डर कडून मागील २७ वर्ष रखडलेला इंदिरानगर प्रेम नगर सिद्धार्थ नगर या वसाहतीचा विकास एमएमआर डी ने करावा, अशी मागणी शिवसेनेचे मुंबई नेते किरण माने यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन केली आहे.

वरळी येथील सीएस.क्रमांक 20 पार्ट, 33,35,61,65 आणि वरळी डिव्हिजन प्लॉट क्रमांक 88 ते 104 या भागातील बी.जी खेर मार्ग वरळी नाका मुंबई येथील पुनर्विकास शिवकृपा बिल्डर कडून गेली २७ वर्ष रखडवण्यात आलेला आहे. त्यामुळे रहिवाशांची प्रचंड निराशा झालेली आहे. एवढेच नव्हे तर बिल्डरने भाड्यापोटी ५७ रहिवाश्यांच्या एसआरएकडे भरलेला दहा कोटी रुपयांचा धनादेश ही वटला नाही त्यामुळे एस् आर ए ची फसवणूक करणाऱ्या शिवकृपा बिल्डरवर अटकेची कारवाई करावी अशी मागणी ही किरण माने यांनी पत्रकारांशी बोलताना केली आहे.

मुंबईतील घाटकोपर येथील रमाबाई आंबेडकर नगर आणि कामाठीपुरा या वसाहतीचा विकास एमएमआरडीए स्वतः राबवित आहेत या धर्तीवर वरळीतील या वसाहतींचा विकासही एमएमआरडीने राबवावा, अशी मागणी किरण माने यांनी केली आहे.

# पालिका निवडणुकीच्या तयारीसाठी रिपाइंची दहिसरमध्ये बैठक



प्रतिनिधी
■ मुंबई

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया उत्तर मुंबई जिल्ह्याच्या वतीने केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार रविवारी सायंकाळी सहा वाजता जिल्हा जनसंपर्क कार्यालय दहिसर ,पूर्व या ठिकाणी उत्तर मुंबई जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी, तालुकाध्यक्ष, वार्ड अध्यक्ष, महिला आघाडी, व कार्यकर्त्यांची मुंबई महानगरपालिका निवडणुकी संदर्भात अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक जिल्हा निरीक्षक कमलेश यादव यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

आगामी मनपा निवडणुकीच्या संदर्भात कार्यकर्त्यांना कामाला लागण्याच्या आदेश देण्यात आले असून उत्तर मुंबई जिल्ह्यातील प्रत्येक वार्डमध्ये वार्ड अध्यक्ष व कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन लोकांच्या समस्या सोडविण्याचे काम करावे करत आहेत तसेच मुंबई महानगरपालिकेमध्ये रिपब्लिकन पक्षाचा महापौर व्हावा या उद्देशाने उत्तर मुंबई जिल्ह्यातील सर्व कार्यकर्ते एकजुटीने कामाला लागले असून उत्तर मुंबई जिल्ह्यातून एकूण 15 प्रभाग हे रिपब्लिकन पक्षाचे बालेकिल्ली असून या ठिकाणी निर्णय मतदाराची संख्या ही रिपब्लिकन पक्षाची मोठ्या प्रमाणात आहे .

उत्तर मुंबई जिल्ह्यातून जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असून रिपब्लिकन पक्षाची ताकद वाढवावी असे प्रतिपादन जिल्हाध्यक्ष रमेश गायकवाड यांनी केले. या बैठकीस तालुका अध्यक्ष दिलीप वावळे, हरिभाऊ कोंडे, संदीप शिंदे, मधुकर गवई तसेच चंद्रकांत पवार जिल्हा उपाध्यक्ष. मुंबई प्रदेशचे सूर्यकांत बानाटे, ओमप्रकाश यादव, गणेश खवरे, मुंबईचे उपाध्यक्ष सोना कांबळे, रमेश डाके, दत्ताराम घुगे, आनंद कांबळे, विनोद बगाडे, राष्ट्रपाल शिरसाठ, चंद्रकांत कांबळे, जितू कांबळे, सुभाष मोरे, आलजी भाई मारू नरेश मारू नजीर, घोलप, अरुण पटेल सतीश ढगे, शिवराज कोंडे रावसाहेब दाहिजें ख ,नाना पारदे हे उपस्थित होते.



**मुंबई:** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त, भाजपा बोरिवली विधानसभा आणि बच्चूभाई शामजीभाई ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने "मोतीबिंदू मुक्त बोरिवली" या संकल्पाने 'डोळे तपासणी आणि मोफत चष्मा वाटप शिबिर' बोरिवली (पश्चिम) येथील पोईसर येथील एस.व्ही. रोड येथील एमपीएस स्कूलमध्ये आयोजित कर्मुअटबले होते. शेकडो नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. यावेळी उत्तर मुंबईचे माजी खासदार गोपाळ शेट्टी, बोरिवलीचे भाजप आमदार संजय उपाध्याय, माजी मंडळ अध्यक्ष महेश राऊत आणि दिनेश झाला हे देखील उपस्थित होते.

# दहीहंडी उत्सावानिमित्त शिवकन्या गोविंदा पथकाच्या सरावाचा शुभारंभ



प्रतिनिधी
■ मुंबई

चेंबूर येथील शिवकन्या गोविंदा पथक मंडळ गेली ७ वर्षांपासून मुंबई आणि पुण्यात दहीहंडी फोडतात या महिला गोविंदा पथकाचा चेंबूर मध्ये सराव सुरु झाला आहे. शिवकन्या गोविंदा पथक मंडळाच्या संचालिका श्रद्धा सुर्वे यांच्या नेतृत्वाखाली सन २०१८ साली १५ ते २० मुलींना घेऊन हे महिलांचे गोविंदा पथक स्थापन झाले होते त्याची आज संख्या ७०च्या वर आहे. आयोजक श्रद्धा सुर्वे यांच्या सोबतीला दीपाली डावल आणि आरती देसाई ह्या सुरवातीला होत्या त्यांच्या चर्चेतून शिवकन्या हे एक सुंदर नाव ठरवण्यात आले.

दरवर्षी शिवकन्या ग्रुप वाढत वाढत गेला तीन चार थर करत करत आता शिवकन्या गोविंदा पथक ५ थराची हंडी फोडण्यात यशस्वी होत आहेत. चेंबूर येथील माजी आमदार प्रकाश भाऊ फातर्पेकर यांच्या हस्ते प्रतीवर्षा प्रमाणे याही वर्षी दहीहंडी सरावाचा नारळ वाढविण्यात आला आहे. १६ ऑगस्ट रोजी गोपाळकाला उत्सव असल्याने शिवकन्या गोविंदा पथक मंडळाच्या संचालिका श्रद्धा सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली चेंबूर येथील रमेश आत्माराम (भाऊ ) प्रधान क्रीडांगण या मैदानात महिला पथक ५ थरांचा सराव करीत आहेत. या पथकातील मुली आणि महिला कॉलेज, नोकरीं, व्यवसाय करून दररोज संध्याकाळी मैदानात सराव कारण्यासाठी जमत असून त्यांना गोपाळकाला उत्सवाची प्रतीक्षा आहे.

## गोव्याहून इंदूरला येणाऱ्या विमानाचे आपत्कालीन लँडिंग

**इंदूर :** गोव्याहून इंदूरला येणाऱ्या इंडिगो विमानाच्या चाकांची हायड्रॉलिक सिस्टीम उड्डाणादरम्यान बिघडली. विमानाचे इंदूरमध्येच आपत्कालीन लँडिंग करावे लागले. विमानतळ व्यवस्थापनाने सांगितले की, पायलटने विमानाच्या खाली असलेल्या कॅरेजच्या खाली जाण्याचा इशारा संदेश पाठवला होता. त्यानंतर विमान सुरक्षितपणे उतरवण्यात आले. विमानात सुमारे १४० प्रवासी होते. सर्वजण सुरक्षित आहेत. इंडिगो विमानाने सोमवारी दुपारी ३.१४ वाजता गोवा विमानतळावरून उड्डाण केले. हे विमान दररोज दुपारी २.४० वाजता गोवा विमानतळावरून इंदूर विमानतळावर उड्डाण करते. इंदूरला पोहोचल्यावर पायलटच्या लक्षात आले की हायड्रॉलिक सिस्टम व्यवस्थित काम करत नाही. यानंतर एटीसी (एअर ट्रॅफिक कंट्रोल) शी संपर्क साधण्यात आला आणि अंडरकॅरेजच्या धोक्याची सूचना देण्यात आली. विमानाने आकाशात ७ ते ८ फेऱ्या मारल्या. एटीसीने अग्निशमन दल आणि धावपट्टीवरील इतर अधिकाऱ्यांना विमानाच्या आपत्कालीन लँडिंगसाठी माहिती दिली, त्यानंतर संध्याकाळी ५.०८ वाजता लँडिंग करण्यात आले.




### आम्हाला तोंड उघडायला लावू नका, अन्यथा कठोर टिप्पणी करावी लागेल...

# राजकीय लढाई निवडणुकीत व्हावी... पण एजन्सीचा वापर का?

## सर्वोच्च न्यायालयाचे 'ईडी'वर ताशेरे

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

सक्तवसुली संचालनालयासाठी (ईडी) सोमवारचा (२१ जुलै) दिवस कायम लक्षात राहील. मागील काही तासांमध्ये ईडीला वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये मद्रास उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाच्या संतापाचा सामना करावा लागला आहे. काही वेळापूर्वी सरन्यायाधीशांनी ईडीला वकिलांना पाठवलेल्या नोटिसांवरून खडे बोल सुनावले. आता आणखी एका याचिकेवर सुनावणी करताना सरन्यायाधीशांनी ईडीला फैलावर घेतलं आहे.

ईडीचा कथित राजकीय फायद्यासाठी वापर केला जात असल्याच्या मुद्द्यावरून सर्वोच्च न्यायालयाने संताप व्यक्त केला. ईडीने कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या पत्नी पार्वती यांच्याविरोधातील दाखल केलेली याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आणि कर्नाटक उच्च न्यायालयाचे आदेश कायम ठेवले



आहेत. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर सिद्धरामय्या यांनी समाधान व्यक्त केलं आहे. ते म्हणाले, "अखेर आम्हाला न्याय मिळाला आणि मुडा प्रकरणाचा शेवट झाला."

सरन्यायाधीश भूषण आर. गवई व न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या बेंचने ईडीच्या याचिकेवर आज सुनावणी केली. ईडीला मुडा (MUDA) घोटाळ्याप्रकरणी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या पत्नी पार्वती यांच्याविरोधात कारवाई करायची आहे. मात्र, कर्नाटक उच्च न्यायालयाने याबाबत ईडीच्या कारवाईस स्थगिती दिली होती. परिणामी ईडीने सर्वोच्च न्यायालयाचं दार ठोठावलं. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने ईडीची याचिका फेटाळली. तसेच त्यांच्या हेतूंवर शंका उपस्थित केली. अतिरिक्त महाधिवक्ते एस. व्ही. राजू यांनी सर्वोच्च न्यायालयात ईडीची बाजू मांडली. यावर सुनावणी करताना सरन्यायाधीश म्हणाले, "श्रीमान राजू, कृपया तुम्ही आम्हाला तोंड उघडायला लावू नका. अन्यथा आम्हाला ईडीविरोधात कठोर शब्दांचा वापर करावा लागेल. दुर्दैवाने महाराष्ट्रात आम्हाला तुमच्याबद्दल वाईट अनुभव आला आहे. तोच प्रकार आता संपूर्ण देशात पसरवू नका. राजकीय लढाई ही मतदारांसमोर लढायला हवी. यामध्ये तुमचा वापर का केला जातोय." यासह सर्वोच्च न्यायालयाने कर्नाटक उच्च न्यायालयाचा आदेश कायम ठेवला आहे.

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयावर आनंद व्यक्त केला. तसेच त्यांनी एक निवेदन जारी केलं आहे. यामध्ये त्यांनी म्हटलं आहे की अखेर न्याय झाला. सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा आदेश कायम ठेवला आणि ईडीची याचिका फेटाळली.

# बांगलादेशात विमान शाळेवर कोसळले, पायलटसह 19 ठार

### दुर्घटनेच्या वेळी वर्ग सुरू होता



वृत्तसंस्था
ढाका

सोमवारी ढाका येथील एका शाळेवर बांगलादेश हवाई दलाचे एक प्रशिक्षण विमान कोसळले. एपी वृत्तानुसार, या अपघातात पायलटसह १९ जणांचा मृत्यू झाला आहे.

या अपघातात १६४ हून अधिक लोक जखमी झाले आहेत. ६० हून अधिक जखमींना बर्न इन्स्टिट्यूटमध्ये रेफर करण्यात आले आहे. किरकोळ जखमी झालेल्या अनेकांवर उत्तरा मेडिकल कॉलेजमध्ये उपचार सुरू आहेत.

जखमींना हातगाडीतून रुग्णालयात नेण्यात येत असल्याचा व्हिडिओही समोर आला आहे. अनेक जखमी मुलांना हेलिकॉप्टरने रुग्णालयात नेण्यात आले.सरकारने एक दिवसाचा राज्य शोक जाहीर केला आहे. अपघाताच्या वेळी शाळेत वर्ग सुरू होते आणि शेकडो विद्यार्थी तेथे उपस्थित होते.

युनूस यांनी रुग्णालये आणि अधिकाऱ्यांना परिस्थिती हाताळण्याचे निर्देश दिले आहेत. त्यांनी जखमींना सर्वतोपरी मदत पुरवण्याबद्दल आणि अपघाताची चौकशी करण्याबद्दलही सांगितले आहे.अग्निशमन सेवेने सांगितले की ही घटना दुपारी १:१८ वाजता घडली

बांगलादेश लष्कराने हवाई दलाच्या एफ-७ बीजीआय विमानाच्या अपघाताची पुष्टी केली आहे. हे विमान चीनमध्ये बनवण्यात आले होते. F-7BGI हे बांगलादेश हवाई दलाचे (BAF) बहुउद्देशीय लढाऊ विमान आहे. हे चीनच्या चेंगडू J-7 लढाऊ विमानाची प्रगत आवृत्ती आहे, जे सोव्हिएत युनियनच्या MiG-21 वर आधारित आहे.

BAF ला २०११ ते २०१३ दरम्यान १६ ते ३६ पर्यंतच्या संख्येत हे लढाऊ विमान मिळाले. अंतरिम (तात्पुरते) उपाय म्हणून थंडरकॅट स्क्वाड्रनमध्ये त्याचा समावेश करण्यात आला.

पान 1 वरुन...

## लोढाला हनीट्रॅपची सगळी माहिती!

त्यामुळे माझ्या जिवाला धोका आहे,असंही त्यानं सांगितलं आहे.आपल्याला 21 जुलै रोजी बालब्रह्मचारी म्हणवणारे रामेश्वर नाईक यांनी व्हाट्सअप कॉलवरुन जीवे मारण्याची धमकी दिली, हा त्याचा पुरावा असल्याचा खळबळ उडवून देणारा दावाही प्रफुल्ल लोढा यांनी केला होता. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी प्रफुल्ल लोढा म्हणून आमच्या जळगावातील जामनेरचा आहे. भाजपचा कार्यकर्ता आहे, गिरीश महाजनचा कार्यकर्ता आहे. त्याच्यावर देखील एक गुन्हा दाखल झाला असल्याचं म्हटलं आहे. तसेच प्रफुल्ल लोढानं गेल्या वर्षी गिरीश महाजन आणि रामेश्वर नाईक यांच्याविरोधात तक्रार दाखल केली आहे. स्थानिक पोलीस या प्रकरणाचा तपास करु शकणार नाहीत, त्यामुळे एसआयटी स्थापन करावी, अशी मागणीही खडसे यांनी केली आहे. विधान परिषदेचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार एकनाथ खडसे यांनी प्रफुल लोढावर दोन ठिकाणी गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आणली आहे. त्यात त्यांनी साकीनाका आणि अंधेरी एमआयडीसी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आले असून दोन वेगवेगळे गुन्हे दाखल असल्याचं म्हटलं आहे.दोन अल्पवयीन मुलींवर बलात्कार करणं, छळणं, फोटो काढणं, ब्लॅकमेलिंग करणं हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसरा गुन्हा हनीट्रॅपच्या संदर्भात अल्पवयीन मुलींना अमिष दाखवणं, फोटो काढणं यासंदर्भात गुन्हा दाखल झाल्याचा गौप्यस्फोटही खडसेंनी केला आहे.

# 15 ऑगस्ट रोजी अमेरिकेत खलिस्तान स्वातंत्र्य रॅली काढणार

वृत्तसंस्था
ओटावा

खलिस्तानी दहशतवादी नेता गुरपतवंत सिंग पन्नू याने १५ ऑगस्ट रोजी अमेरिकेत खलिस्तान स्वातंत्र्य रॅलीची घोषणा करणारा एक व्हिडिओ प्रसिद्ध केला आहे. अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन डीसी येथील भारतीय दूतावासाबाहेर ही रॅली काढण्यात येणार आहे. दोन दिवसांनी येथे खलिस्तानच्या समर्थनार्थ जनमत चाचणी घेण्यात येणार आहे.

व्हिडिओमध्ये पन्नूने भारतीय ध्वज जाळण्याची धमकी दिली आणि म्हटले , "तुम्ही पाकिस्तानवर हल्ला केला आणि ते वाचले. आम्ही भारताचा नाश करू."

१५ ऑगस्ट हा शीख धर्म आणि पंजाबच्या स्वातंत्र्याचा दिवस नाही व्हिडिओच्या सुरुवातीला पन्नू असे म्हणत असल्याचे दिसत आहे की १५ ऑगस्ट हा शीख धर्म आणि पंजाबच्या स्वातंत्र्याचा दिवस नाही. १९५० च्या संविधानात शीख धर्माला हिंदू धर्माचा भाग म्हणून वर्णन केले आहे. जून




१९८४ मध्ये सुवर्ण मंदिरावर झालेल्या हल्ल्यानंतर श्री अकाल तख्त साहिब येथे हा तिरंगा फडकवण्यात आला होता. त्या दिवशी एक रेषा आखण्यात आली होती. एका बाजूला हिंदुस्तानी आणि हिंदू होते आणि दुसऱ्या बाजूला पंजाब आणि शीख होते.

ते म्हणाले - दिल्लीत तिरंग्याखाली हत्याकांड झाले व्हिडिओमध्ये पन्नू पुढे म्हणाले- दिल्लीत या तिरंग्याखाली एक हत्याकांड घडले. ३० हजार शीख शहीद झाले. या हत्याकांडानंतर विधवा वसाहत फक्त शीख समुदायाची आहे. हा आपल्या कपाळावरचा कलंक आहे. तो कलंक पुसण्यासाठी हा तिरंगा आणि भारत जगाच्या नकाशावरून पुसून टाकावा लागेल. १९८४ ते १९९५ पर्यंत पंजाबमध्ये रक्ताची होळी खेळली गेली. संपूर्ण पंजाब हत्याकांडासाठी बलिदान देण्यात आले.

भारतात जनमत चाचणी घेण्याची धमकी दिली आहे. सुमारे ६ महिन्यांपूर्वी, गुरपतवंत सिंह पन्नू याने एक व्हिडिओ प्रसिद्ध केला होता. या व्हिडिओमध्ये त्याने खलिस्तानसाठी म्हणजेच भारतात वेगळ्या देशासाठी जनमत चाचणी सुरू करण्याबद्दल बोलले होते. यापूर्वी ते अमेरिका, कॅनडा, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया आणि युरोप आणि इतर देशांमध्ये शिखांसाठी वेगळ्या देशाची मागणी करण्यासाठी खलिस्तान जनमत चाचणी घेत होते.

## आमदारांच्या डोक्यावर बंदूक !

सरकार विरोधातील आंदोलनं ही अर्बन नक्षलवादी ठरवायचे आणि त्यांच्यावर कारवाई करण्याचं षडयंत्र सरकारचं आहे. त्यामुळं राज्यपालांना देखील आम्ही महाविकास आघाडी म्हणून भेटलो आणि त्यांच्याकडेही हे विधयक परत पाठवण्याची विनंती केली आहे. एकूणच अधिवेशनात आम्ही बघितलं साधारणपणे काही माहिती, व्हिडिओ बाहेर येत होते. मंत्री संजय शिरसाटांचा व्हिडिओ कसा बाहेर आला तो आम्हाला माहिती नाही. तो माध्यमांपर्यत कसा पोहोचला हे आम्हाला माहिती नाही. त्याच्यामागे कोण आहे, हेही आम्हाला माहिती नाही. त्याच्यावरुन एकूण असं चित्र दिसतंय, की भाजपाला आता एकनाथ शिंदे यांची गरज संपलेली आहे, अशी धारणा झालेली आहे. सरकारमध्ये अंदागोंदी सुरू आहे. प्रत्येकजण आपआपल्या खात्यातील वाटा कसा काढता येईल? याच्या पलिकडं महाराष्ट्राकडं बघताना दिसत नाहीत," अशी टीका आमदार सतेज पाटील यांनी केली.

## 'डिजिटल गव्हर्नन्स' ही गरज

यासाठी प्रत्येक विभागाकरिता उद्दिष्ट आणि कालमर्यादा देखील ठरविली जातील. त्यामुळे या सेवा लवकरात लवकर सामान्यांपर्यंत पोहोचणे शक्य होणार आहे. सर्व शासकीय सेवा ऑनलाईन देण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम केल्याने शासकीय सेवा सक्षमपणे लोकांसमोर येतील आणि यामुळे विश्वासार्हता वाढेल, असे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यावेळी म्हणाले. माहिती तंत्रज्ञान विभाग आणि समग्र या संस्थेसोबत झालेल्या करारामुळे होणाऱ्या मुलभूत परिवर्तनास मुख्यमंत्र्यांनी शुभेच्छा दिल्या.

## अहमदाबादमध्ये प्रसिद्ध बिल्डरच्या दारू पार्टीवर छापा

वृत्तसंस्था
अहमदाबाद

रविवारी रात्री उशिरा अहमदाबाद जिल्ह्यातील साणंद येथील ग्लेड गोल्फ रिसॉर्टमध्ये एका हाय-प्रोफाइल दारू पार्टीवर पोलिसांनी छापा टाकला. छाप्यादरम्यान पोलिसांनी १३ तरुण आणि २६ तरुणींना मद्यधुंद अवस्थेत पकडले. रात्री उशिरा सर्वांना वैद्यकीय तपासणीसाठी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले.

यानंतर पहाटे ३ वाजता सर्वांना साणंद पोलिस ठाण्यात आणण्यात आले. साणंद पोलिसांनी या संपूर्ण प्रकरणात गुन्हा दाखल करून सर्वांना अटक केली आहे. शहरातील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक प्रतीक सांघी यांच्या वाढदिवसानिमित्त ही हाय-प्रोफाइल दारू पार्टी आयोजित करण्यात आल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे.

साणंद पोलिसांनी सांगितले की, रविवारी रात्री रेड रिसॉर्टमध्ये दारू पार्टी सुरू असल्याची माहिती आम्हाला मिळाली होती. पोलिसांनी रिसॉर्टवर छापा टाकला तेव्हा तिथे सुमारे १०० लोक उपस्थित होते. यापैकी सुमारे ५० संशयितांना ताब्यात घेण्यात आले. रात्री वैद्यकीय चाचण्या केल्या असता, १३ तरुण आणि २६ तरुणी मद्यधुंद असल्याचे आढळून आले. दारू पिऊन पकडलेले हे सर्व लोक बिल्डर प्रतीक सांघीच्या वाढदिवसाच्या पार्टीत सहभागी झाले होते. साणंदच्या डीएसपी नीलम गोस्वामी यांनी सांगितले की, रात्री उशिरा ४ पोलिस बस आणि एका कारमधून सर्व लोकांना वैद्यकीय तपासणीसाठी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. मोठ्या संख्येने मद्यपींना पकडण्यात आल्यामुळे, रात्री उशिरापासून सकाळपर्यंत पोलिसांची कारवाई सुरू होती.

## न्यायमूर्ती वर्मा यांना आडनावाने संबोधले, वकिलाला फटकारले

### गवई म्हणाले, मर्यादेत राहा... ते अजूनही न्यायालयाचे न्यायाधीश आहेत

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांना त्यांच्या आडनावाने संबोधित केल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश बीआर गवई यांनी सोमवारी एका वकिलाला फटकारले. प्रत्यक्षात, वकील मॅथ्यूज नेदुम्पारा सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती वर्मा यांना फक्त 'वर्मा' असे संबोधत होते.

यावर सरन्यायाधीश म्हणाले, "ते तुमचे मित्र आहेत का? ते अजूनही न्यायमूर्ती वर्मा आहेत. तुम्ही त्यांना कसे संबोधता? थोडी प्रतिष्ठा बाळगा. तुम्ही एका विद्वान न्यायाधीशाबद्दल बोलत आहात. ते अजूनही या न्यायालयाचे न्यायाधीश आहेत." वकिलाने उत्तर दिले, "मला वाटत नाही की त्यांना इतका आदर दिला पाहिजे."

यावर सरन्यायाधीश म्हणाले, 'कृपया, न्यायालयाला आदेश देऊ नका.' न्यायालयाने कॅश प्रकरणात वकील मॅथ्यूज नेदुमपारा यांची याचिका देखील फेटाळून लावली, ज्यामध्ये त्यांनी न्यायमूर्ती वर्मा यांच्याविरुद्ध एफआयआर नोंदवण्याची मागणी केली होती.

खरंतर, १४ मार्चच्या रात्री लुटियन्स दिल्ली येथील न्यायमूर्ती वर्मा यांच्या घराला आग लागली. त्यांच्या घराच्या स्टोअर रूममध्ये जळालेल्या ५०० रुपयांच्या नोटांच्या गठ्ठ्यांनी भरलेल्या पोत्या सापडल्या. न्यायमूर्ती वर्मा त्यावेळी दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश होते. नंतर त्यांची अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली झाली.

## राहुल गांधींविरुद्ध वाराणसी न्यायालयात खटला दाखल होणार

वृत्तसंस्था
नवी दिल्ली



लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरुद्ध वाराणसीमध्ये खटला दाखल केला जाणार आहे. सोमवारी वाराणसीच्या एमपी-एमएलए न्यायालयाने माजी पंतप्रधानांनी दाखल केलेली याचिका स्वीकारली. राहुल गांधींवर अमेरिकेत शिखांविरुद्ध प्रक्षोभक भाषण दिल्याचा आरोप आहे.

ही याचिका तिलमापूरचे माजी प्रमुख नागेश्वर मिश्रा यांनी न्यायालयात दाखल केली होती. वाराणसीच्या मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने २८ नोव्हेंबर २०२४ रोजी त्यांची याचिका फेटाळून लावली. यानंतर त्यांनी एमपी-एमएलए न्यायालयात याचिका दाखल केली, जी न्यायालयाने स्वीकारली. आता पुढील तारखेला न्यायाधीश यजुवेंद्र विक्रम सिंह यांच्या न्यायालयात सुनावणी सुरू होईल.



**नवी दिल्ली :** काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांचा वाढदिवस आज नवी दिल्लीतील काँग्रेसच्या कार्यालयात साजरा करण्यात आला. यावेळी विरोधी पक्षनेते राहुल गांधी, प्रियांका गांधी व अन्य नेते उपस्थित होते.

## केरळचे माजी मुख्यमंत्री, ज्येष्ठ माकप नेते व्ही.एस. अच्युतानंदन यांचं निधन

### वयाच्या १०१ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

वृत्तसंस्था
तिरुवनंतपुरम

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या संस्थापक सदस्यांपैकी एक आणि केरळचे माजी मुख्यमंत्री व्ही. एस. अच्युतानंदन यांचं आज निधन झालं. तिरुवनंतपुरम येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ते १०१ वर्षांचे होते. अच्युतानंदन यांनी २००६ ते २०११ या काळात केरळचे मुख्यमंत्री म्हणून काम पाहिले होते.



व्ही.एस. या नावाने प्रसिद्ध असलेल्या अच्युतानंदन हे १९६४ मध्ये भारतीय कम्युनिस्ट पार्टीपासून स्वतंत्र होऊन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करणाऱ्या ३२ संस्थापकांपैकी सध्या हयात असलेल्या दोन संस्थापक सदस्यांपैकी एक होते. २००६ साली अच्युतानंदन यांच्या नेतृत्वाखाली डाव्या पक्षांनी केरळच्या सत्तेत पुनरागमन केलं होतं. त्यानंतर तेव्हा वयाच्या ८२ व्या वर्षी अच्युतानंदन यांनी राज्याचं मुख्यमंत्रीपद स्वीकारलं होतं.

मागच्या काही काळापासून वाढतं वय आणि आजारपणांमुळे ते सार्वजनिक जीवनापासून दूर तिरुवनंतपुरम येथे आपल्या मुलाच्या घरी राहत होते. प्रकृतीसंबंधींच्या समस्यांमुळे ते बहुतांश वेळ घरीच राहत असत. दरम्यान, आज रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांची प्राणज्योत मालवली.

## गोडबोलेंच्या निधनाने आंबेडकरी चळवळीची हानी - आठवले

वृत्तसंस्था
रायपूर

रिपब्लिकन पक्षाचे छत्तीसगढ राज्य सरचिटणीस राजू गोडबोले यांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीची मोठी हानी झाली आहे.दिवंगत राजु गोडबोले हे छत्तीसगढ मधील रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते होते.त्यांना छत्तीसगढ मधील सामाजिक शैक्षणिक आणि बौध्द धम्म चळवळी बरोबरच रिपब्लिकन चळवळ वाढवण्यात मोठे योगदान दिले आहे, असे सांगत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दिवंगत राजु गोडबोले यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहिली.




छत्तीसगढच्या भिलाई येथील सियान सदन येथे रिपब्लिकन पक्षा तर्फे दिवंगत राजु गोडबोले यांची जाहीर श्रध्दांजली सभा आयोजित करण्यात आली होती. दिवंगत राजु गोडबोले हे रिपब्लिकन पक्षाचे छत्तीसगढ मधील प्रदेश सरचिटणीस होते.छत्तीसगढच्या रायपुर,भिलाई, राजनांदगाव सह पुर्ण छत्तीसगढ मध्ये रिपब्लिकन चळवळ वाढवण्यात त्यांनी मोठे योगदान दिले आहे. या श्रध्दांजली सभेत आठवले यांच्या समवेत छत्तीसगढ रिपाइं प्रदेश अध्यक्ष उषाताई आफले , राष्ट्रीय सचिव विजय प्रसाद गुप्ता,अभिषेक वर्मा, यशवंत ठाकरे,सुनिल रामटेके,गोजुपाल तसेच दिवंगत राजु गोडबोले यांच्या पत्नी शैलिंद्रा गोडबोले, मुले उपस्थित होते.

